शिक्षण संशोधन

# Shikshan Sanshodhan

## Journal of Arts, Humanities and Social Sciences

ISSN (O) : 2581 - 6241

Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Research Journal

IMPACT FACTOR : 5.146

PAPER ID : ICLSGM-H-05


## *Certificate of Publication*

is awarded to

**DR. CHANDRASHEKHAR ATMARAM BHAGAT**

For the research paper / article entitled

वैश्विक प्रसार माध्यमांचा साहित्यावर आणि समाजावर होणारा परिणाम:

Published in Vol - 4, Conference Special Issue - 3, September - 2021.

Certificate for Publication of :

**International Conference on Literature, Society & the Global Media**

10 - 11 September, 2021

*Jointly organized by:*

Dept. of Media Studies, CMS Jain ( Deemed to be University) Bangalore, India.
Scientific Research Association & 'Research Culture Society'.

*CPatel*

The Managing Editor
Research Culture Society and Publication
http://shikshansanshodhan.researchculturesociety.org/
Email: shikshansanshodhan@gmail.com

# Shikshan Sanshodhan

Journal of Arts, Humanities and Social Sciences

ISSN (O): 2581-6241

Monthly Peer-Reviewed, Refereed, Indexed Research Journal

Publication in Hindi, Gujarati, Marathi, Sanskrit and other National Languages


## अंतर्राष्ट्रीय सम्मेलन साहित्य, समाज और वैश्विक मीडिया

10 & 11 सितंबर, 2021

Conference Proceedings / Special Issue





शिक्षण संशोधन

RESEARCH CULTURE SOCIETY & PUBLICATION

Email: shikshansanshodhan@gmail.com

Web Email: editor@ijrcs.org

Cont. No: +91 9033767725

http://shikshansanshodhan.researchculturesociety.org/

INDEX


| PAPER ID | Table of Contents | Page No. |
|---|---|---|
| a) | About the organizing Institutions and Objectives: | 3 |
| b) | Conference Committee | 4-5 |
| c) | Table of Contents | 6 |
| | **Paper/Article Title & Author Name** | |
| ICLSGM-H-01 | "कोटा तथा सीकर जिले के कोचिंग संस्थानों में पंजीकृत राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा (NEET) एवं संयुक्त प्रवेश परीक्षा (JEE) अभ्यर्थियों में तनाव परिस्थितियां एवं उत्तरजीवी उपागम पर जनसांख्यिकीय चरों के संबंध में एक अध्ययन" -- ***श्रीमती शारदा चौधरी*** | 7-14 |
| ICLSGM-H-02 | भारतीय संस्कृति के प्राणभूत नैतिक मूल्य और भारतीय समाज -- ***डॉ. पुष्पा*** | 15-20 |
| ICLSGM-H-03 | वागड़ के जनजातीय समाज के उत्थान में साहित्य और मीडिया की भूमिका -- ***SHANTI LAL DAYAMA*** | 21-24 |
| ICLSGM-H-04 | भविष्य-कूर्मपुराण के सन्दर्भ में सांस्कृतिक मूल्य एवं नैतिक मूल्य -- ***सोनम शर्मा, प्रदीप शर्मा डोबरियाल*** | 25-32 |
| ICLSGM-H-05 | वैश्विक प्रसार माध्यमांचा साहित्यावर आणि समाजावर होणारा परिणाम: -- ***DR. CHANDRASHEKHAR ATMARAM BHAGAT*** | 33-38 |
| ICLSGM-H-06 | पं. दीनदयाल उपाध्याय के एकात्म मानव दर्शन के मूल तत्व -- ***डॉ. रश्मि शर्मा, प्रतिभा उपाध्याय*** | 39-43 |
| ICLSGM-H-07 | ब्लॉगिंग के क्षेत्र में हिंदी साहित्य -- ***Medha Agrawal*** | 44-46 |
| ICLSGM-H-08 | वर्तमान समय : भाषा एवं साहित्य -- ***डॉ. मो. मजीद मियाँ*** | 47-50 |
| ICLSGM-H-09 | ਪਾਲੀ ਭੁਪਿੰਦਰ ਦੇ ਨਾਟਕਾਂ ਵਿੱਚ ਅਸੁਖਾਵੇਂ ਔਰਤ- ਮਰਦ ਸਬੰਧ -- ***ਗੁਰਭੇਜ ਸਿੰਘ, ਡਾ ਲਖਵਿੰਦਰ ਕੌਰ*** | 51-54 |
| ICLSGM-H-10 | वागड़ के जनजातीय समाज में सोशल मीडिया का प्रभाव -- ***मुकेश कुमार निनामा*** | 55-57 |
| | ***** | |

*अंतर्राष्ट्रीय सम्मेलन*
**साहित्य, समाज और वैश्विक मीडिया**
**10 & 11 सितंबर, 2021.**
संयुक्त तत्वावधान में आयोजित : मीडिया अध्ययन विभाग, सीएमएस जैन (डीम्ड टू बी यूनिवर्सिटी) बैंगलोर, भारत
'वैज्ञानिक अनुसंधान संघ' एवं 'अंतर्राष्ट्रीय स्तर वैज्ञानिक अनुसंधान संगठन'

# वैश्विक प्रसार माध्यमांचा साहित्यावर आणि समाजावर होणारा परिणाम:

**डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत**
प्रभारी प्राचार्य, विद्याप्रसारिणी सभेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
लोणावळा, तालुका मावळ, जिल्हा पुणे, पिन 410 201 (महाराष्ट्र राज्य)
ई मेल : bhagatsir.kp@gmail.com

**प्रस्तावना:** वैश्विक प्रसार माध्यमांचा साहित्यावर आणि समाजावर होणारा परिणाम यामध्ये अभ्यासला आहे. भारतीय शिक्षण शास्त्राच्या पध्दती नुसार श्रुति, स्मृति आणि कृति प्रत्येक नागरीकात असेल तर उपनिषदांमध्ये अश्वपती राजाने उल्लेख केल्या प्रमाणे माइया राज्यात कोणी चोर नाही, की कंजुष नाही की दारूडया नाही, कोणी अविद्वान नाही नि कोणी निष्क्रीय नाही, दुराचारी कोणीच नाही. हे घडण्यासाठी साहित्याचा समाजाशी असणारा संबंध सार्थ असावा लागेल. म्हणूनच आजच्या वैश्विक माध्यमांचा उदय, विकास. त्यासाठी वापरली जाणारी साधने, उदाहरणार्थ संगणक, मोबाईल, इंटरनेट आदी यांचा परिचय यात केला आहे. वैश्विक मिडीया आणि त्याचे साहित्याशी असणारे नाते स्पष्ट केले आहे. मिडीया म्हणजे काय, मिडीयाचे प्रकार, मिडीया ही संकल्पना, मिडीयाचा वापर, उपयुक्तता आणि सामाजिकता याचा सविस्तर आढावा यामध्ये घेतला आहे. वैश्विक माध्यमांमुळे समाज जीवनात आलेले परिवर्तन, समाजात आलेले अनेक शब्द, चाली रितीं यावर मिडीयाचे पडलेले प्रभाव आणि भाषिक बदल यांचा थोडक्यात उहापोह या शोधनिबंधात केलेला आहे.

**बीजशब्द:** मराठी साहित्य, गुगल प्रसार माध्यमे (सोशल मिडीया), वैश्विक माध्यमे, ई अध्ययन (ई लर्नींग), दुरशिक्षण प्रणाली, इंटरनेट, माध्यमांची सामाजिकता, वॉटसअॅप, फेसबुक इत्यादी.

### वैश्विक माध्यमांचा उदय:

आधुनिक युग हे संगणक युग आहे. माहिती, तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगात तंत्रज्ञानाची प्रगती ही झपाटयाने होत आहे. या प्रगती मध्ये व्यक्ती ही केंद्र स्थानी असली तरी व्यक्तीगत जाणिवा या लोप पावत आहेत. मानवी मूल्य बिंदुवत होत आहेत. विश्वाच्या अवाढव्य पसा-यात माणूस हा एक नैसर्गिक, जैविक प्रमुख घटक म्हणून त्याला स्थान आहे. माणसाचे जीवन हे आधुनिक साधनांच्या पसा-यात परावलंबी झाले आहे. माणसाने निसर्गावर मात करण्यासाठी अनेक प्रयत्न करून नवनवीन शोध लावले. निसर्ग, यन्त्र, वातावरण, समाज, रूढी, संस्कृती यांचा प्रभाव परस्परांवर मोठया प्रमाणात होत आहे.

मागील काही दशकांपासून मानवी जीवना मध्ये प्रसार माध्यमांचा प्रभाव अतिरिक्त प्रमाणात वाढला आहे. किंबहुना प्रसार माध्यमां व्यतिरिक्त मानवी जीवन हे रिक्त मानले जाते. त्यामुळे आजचा माणूस हा प्रसार माध्यमांचा मिंधा झाला आहे. त्याला आपले स्वतःचे विचार, कृती, अभिव्यक्ती व्यक्त करणे षक्य होत नाही. यामुळेच मानवी बुध्दी कुंठीत झाली आहे. या सर्वातून सामाजिक जीवन अस्ताव्यस्त होत असून समाजव्यवस्थे वरही त्याचा मोठा प्रभाव पडला आहे. प्रसार माध्यमांनी विश्वातील मानवाला बांधुन ठेवले असून जणू काही प्रसार माध्यमे म्हणजेच जीवन दिशा दर्शविणारे मार्ग आहेत असे म्हणावे लागते.

या प्रसार माध्यमांची सुरूवात इंटरनेट पासून झाली. सन 1973 मध्ये सर्व प्रथम इंटरनेटची कल्पना अमेरिकेत उदयाला आली. अमेरिकेतील संरक्षण खात्यात संगणक तज्ञ म्हणून कार्यरत असणा-या व्हिंटसर्फ यांनी इंटरनेटचा शोध लावला. इंटरनेटच्या शोधामुळे गुगलच्या माध्यमातुन हजारो किलोमीटर अंतरा वर असणा-या व्यक्ती, समाज आणि संस्था परस्परां मध्ये बांधल्या गेल्या. भारतात दिनांक 15 ऑगस्ट, 1995 पासून विदेश संचार निगम लिमिटेड या कंपनी द्वारे इंटरनेट सेवा सुरू झाली. इंटरनेट म्हणजे संगणकाचे महाजाल. इंटरनेटमुळे विश्वातील दोन पेक्षा जास्त संगणक जोडले जातात. यालाच वॅन वाईड एरिया नेटवर्क असे संबोधले जाते. वॅन चे भौगोलिक क्षेत्र हे संपूर्ण विश्व असते. त्यामुळे जगातील कोणतेही ज्ञान, माहिती, संदेश काही क्षणात जगाच्या कानाकोप-यात पोहोचू शकतो. आज मितीला जगातील 212 देशातील ऐंशी टक्के लोक नेटवर्क प्रणालीषी संलग्न आहेत. इंटरनेटचा वापर हा विविध माध्यमातुन केला जात असल्यामुळे त्यासर्व माध्यमांना सोशल मिडीया असा सामुहिक शब्द वापरला जातो.

**वैश्विक प्रसार माध्यमे (सोशल मिडीया):**

सोशल मिडीया हा शब्द विविध भाषां मध्ये सहज रूळला असला तरीही मुळ इंग्रजी भाषेत सोशल आणि मिडीया असे दोन स्वतंत्र शब्द आहेत. सोशल अर्थात सामाजिक, समाजातील, सामुहिक या अर्थाने वापरला असून मिडीया हा शब्द माध्यम. विषेशतः संप्रेशण माध्यम म्हणून याचा उल्लेख केला जातो. मिडीया ही संकल्पना थोडक्यात अशी आहे.

Media are the communication oldest or tools used to store and deliver information or data.

याचाच अर्थ मिडीया हे प्रमुख संप्रेशण माध्यम आहे. संप्रेशण या शब्दाचा मराठीतील सरळ अर्थ माहिती देणे व घेणे होय. पुर्वीच्या काळी माहितीची अदान प्रदानता ही केवळ मौखिक किंवा लिखित अशाच स्वरूपात होत होती. उदाहरणार्थ वेद, ऋचा, ओव्या, अभंग यांचे पाठांतर करणे आणि त्यांचे लेखन करून ग्रंथ रूपात संचित करणे. काळानुरूप या मध्ये बदल होउन पुढे कथा, कादंबरी, काव्य, ललित साहित्य हे लिखित साहित्य उदयाला आले. तर ओवी, अभंग, किर्तने, भारूड, लावणी हे सांस्कृतिक मौखिक साहित्य तयार होत गेले. या दोन्हीही साहित्यामुळे समाजामध्ये सांस्कृतिक परिणाम घडत गेले व समाजाची उन्नती होत गेली. गेल्या काही दशकांमध्ये सांस्कृतिक व सामाजिक स्थित्यांतर घडविणा-या माध्यमां मध्ये आकाशवाणी, दुरदर्शन, चित्रपट, ध्वनीफिती त्यांच्या द्वारे त्याच कला लोकांपर्यत पोहोचू लागल्या. आज याच प्रसार माध्यमांचा वेग आणि प्रसार इतका वाढला आहे की, प्रसार माध्यमांच्या साधनां मुळे आख्खे जगच आज माणसाच्या एका मुठीत सामावले आहे. या सर्व साधनांना एकत्रितपणे सोशल मिडीया हे साध्य म्हणून तर मोबाईल, फोन, लॅपटॉप, कॉम्प्युटर, आय पॉड ही साधने म्हणून मानवी जीवन साहित्य आणि समाज यावर कबजा मिळवू पाहात आहे.

वैश्विक प्रसार माध्यमांचा स्थुलपणे अभ्यास करायचा झाल्यास त्याचे तीन प्रमुख प्रकार आहेत. 1. प्रिंट मिडीया (छापील प्रसार माध्यम), 2. ब्रॉडकास्ट मिडीया (प्रसिध्द होणारी माध्यमे), 3. इंटरनेट मिडीया (गुगल, यु टयुब इत्यादी) प्रिंट मिडीया मध्ये विविध विषया वरील पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे यांचे छापील स्वरूपात प्रसिध्दी होत असते. यातुन दररोज घडणा-या घटना वैचारिक लेखन किंवा शालेय लेखन व्यक्त होत असते. परंतु या माध्यमांना एक दिवस किंवा विशिष्ट तास यांची मर्यादा असल्यामुळे त्याचा उपयोग इतक्या मोठया प्रमाणा वर होत नाही. वृत्तपत्रांचे आयुष्यमान जास्तीत जास्त एक दिवस किंवा एक आठवडा असते. तर मासिकाचे आयुश्य एक महिना ते दोन महिने असते. या शिवाय काही छापील ग्रंथ सर्व काळ सर्वत्र उपलब्ध होउ शकत नाहीत. म्हणून प्रिंट मिडीयाचा प्रभाव तितका मोठा पडत नाही. मात्र खुप काळा पर्यत टिकाउ असल्यामुळे प्रिंट मिडीया हे माध्यम उपयुक्त मानले जाते. ब्रॉडकास्ट मिडीया हे आधुनिक युगातील प्रभावी तंत्र मानले जाते. या तंत्रामुळे आकाशवाणी, टेलिव्हीजन, चित्रपट, विविध गाणी, व्हिडीओ गेम, सेल फोन, वेगवेगळया विषया वरील सॉफटवेअर आदी माध्यमांचा वापर यामध्ये होत असल्यामुळे यातुन प्रसिध्द होणारे किंवा व्यक्त

होणारे विचार एकाच वेळेला हजारो - लाखो लोकांवर होत असतात. त्यांचा प्रभावही दृष्य स्वरूपात असल्यामुळे मोठया प्रमाणात होत असतो. आकाशवाणी वरील कार्यक्रम किंवा दुरदर्शन वरील मालिका यातुन घराघरातील समाज मन बदललेले आहे. ही असणारी ब्रॉडकास्ट मिडीयाची जमेची बाजू आहे. या नंतर इंटरनेट मिडीया याचे प्रमुख माध्यम म्हणजे संगणक असल्यामुळे याचा प्रसार प्रचार मात्र खुप मोठया प्रमाणा वर झालेला आहे. इंटरनेटच्या वापरामुळे जगा मध्ये वॉटसअॅप, फेसबुक, टेलिग्राम, टिवटर, इंस्टाग्राम या सोशल मिडीयाच्या हजारो माध्यमांनी व्यक्ती आणि समाज बांधले गेले आहेत. म्हणूनच इंटरनेट हे आधुनिक मिडीयातील वैश्विक प्रसाराचे प्रमुख माध्यम मानले जाते. या माध्यमा द्वारे गुगल, यु टयुब, टंबलर, विविध वेबसाईट, सर्व विषया वरील ज्ञानांचे वेगवेगळे स्त्रोत, सर्व स्तरातील माणसांकरिता मुक्तपणे वापरायला आणि पहायला मिळतात. त्यामुळे सोशल मिडीया लहानांपासून थोरांपर्यत जिव्हाळयाचा बनला आहे. याचा उपयुक्त क्षेत्रा मध्ये वापर केल्या नंतर साहित्य समाज आणि संस्कृती निश्चितच घडण्यास हातभार लागेल.

**माध्यमे आणि साहित्य:**

वैश्विक माध्यमे म्हणून इंटरनेटचा अग्रक्रमांक येत असला तरी वॉटसअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम, टिवटर याही माध्यमांतुन जगातील माहिती ही परस्परां मध्ये संक्रमीत केली जाते. या माहितीचे आधारे विश्वातील अनेक घडामोठी विविध वयातील जाती धर्मातील लोक एकाच वेळेस करीत असतात. इंटरनेट मध्ये लहान मुलां पासून मोठया माणसां पर्यत कार्यक्रम किंवा चर्चा आयोजित करता येतात. याशिवाय कार्यालयीन कामकाज, शिक्षण, मनोरंजन, पर्यटन, खेळ हे व्यवसाय या सर्वासाठीच हे उपयुक्त साधन असल्यामुळे याची व्याप्ती खुप मोठी आहे. या साधनांमुळे साहित्याला मात्र मोठा लाभ झाला आहे. आज पर्यत विशिष्ट वर्गासाठी मार्यादित असणारे अनेक विषय, ग्रंथ, साधनसामुग्री, वेद, उपनिषद, शास्त्रीय ग्रंथ, आयुर्वेद, आरोग्य शास्त्र, कल्पशास्त्र असे दुर्मिळ किंवा दुर्लभ ग्रंथ सर्व वयोगटातील सर्व जाती धर्मातील लोकांना हवे त्या वेळेस इंटरनेट द्वारे प्राप्त झालेले आहेत. रामायण, महाभारत, भगवद्रगीता या सारख्या ग्रन्थांच्या विविध संषोधनपर उप ग्रंथांचाही स्त्रोत यामध्ये निर्माण झालेला आहे. त्यामुळे साहित्य हे केवळ विशिष्ट जात, धर्म देशा पुरते मर्यादित न राहाता वैश्विक स्तरावर गेलेले आहे. अनेक भाषा व धर्मातील विचार ग्रंथ सर्वा करिता मुक्त झालेले आहेत. ही प्रमुख देणगी वैश्विक माध्यमांनी साहित्याला मिळवून दिलेली आहे.

सोशल मिडीया हे आजच्या युगातील प्रमुख माध्यम झाले आहे. यामुळे एक नवा विचार मंच सर्वाकरिता खुला झाला आहे. फेसबुक, वॉटसअॅप, इंस्टाग्राम या माध्यमांतुन जगातील कोणत्याही कोप-यातुन कोणतीही व्यक्ती आपले विचार, भाव व्यक्त करू शकते. चार ओळींची चारोळी किंवा दिर्घ काव्य सहजपणे लाखो लोकां पर्यत पोहोचत असते. याच माध्यमातुन नविन विषयाची माहिती, नवे दृश्टीकोन सामाजिक स्तरावर पोहोचले जातात. एखादा प्रसंग, घटना यांचे चित्रण सहजपणे एका व्यक्ती कडून दुस-या व्यक्ती पर्यत पोहोचविता येतो. याच अर्थाने साहित्य म्हणजे त्या काळातील जीवनानुभवाचे एक महत्वाचे अंग आहे असे जे म्हटले जाते त्याचा अनुभव यातुन आपल्याला मिळतो. साहित्य शास्त्राच्या दृश्टीकोनातुन साहित्य निर्मिती साठी भाषा आणि कौषल्ये ही वैषिशठये साहित्यकाच्या अंगी असावी लागतात. साहित्यकाला आपल्या भोवतालचे जग जाणुन घेण्याची एक कल्पकता असावी लागते. या कल्पकतेतुन तो समाजाचे वर्णनात्मक रूप लोकांसमोर मांडत असतो. तो मांडत असताना समाजामध्ये प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे नविन मूल्ये रूजत असतात आणि म्हणूनच साहित्य हा समाजाचा आरसा म्हटला जातो. तर साहित्यिक हा समाजातील सुसंस्कृत व्यक्ती म्हणून परिचित असतो. सोशल मिडीयाच्या माध्यमातुन आज अनेक कवी, लेखक, विचारवंत हजारो लोकांच्या परिचयाचे झालेले आहेत. त्यातुन अनेकांनी प्रेरणा घेउन नव विचार श्रेणी रूजली आहे. त्यामुळे ख-या अर्थाने शिक्षणाचा विकास या माध्यमातुन होत आहे. या माध्यमांमुळे लोकांचे लक्ष हे जीवन साक्षर करून सार्थक करण्याकडे वळलेले दिसते. त्यामुळेच अनेक ग्रंथ, विचार, विविध भाषांतुन मांडत असल्याचे आपल्याला पहायला मिळते. व्याकरणातील विविध संकल्पना वेगवेगळया भाषेतील नवनवीन लकबी, त्यातील सार्थ शब्द अगदी सहजतेने अन्य भाषेत वापरलेले आपल्याला पहायला मिळतात. परभाषेतील अनेक शब्द वाक्य रचना किंवा म्हणींचा वापर सर्रासपणे पहायला मिळतो. ही विचार प्रक्रिया एखाद्या सिमित प्रदेश, प्रांत, भाषे पुरती मर्यादित न राहाता विविध भाषांमध्ये ते घडताना दिसते. त्यामुळे इंग्रजी, हिंदी, कानडी भाषेतील

शब्द मराठी मधील अनेक मालिकां मध्ये वापरलेले आढळतात. दूरचित्रवाणी, आकाशवाणी यातील कार्यक्रमां मध्ये देखील मराठी भाषेतील विविध प्रांतातील लोकांचे बोली भाषेतील शब्द प्रचलित स्वरूपात प्रसार माध्यमांमुळे एकत्रित आलेले आहेत. यामुळे भाषेतील शब्दकोश, व्याकरण षुध्दता, वाक्य रचना याकडे जास्त लक्ष दिले न जाता भाषा म्हणजे विचार प्रवाहाचे किंवा भावना प्रगटीकरणाचे प्रमुख माध्यम आहे. याचा प्रत्यय येतो. वॉटसअॅप, इंस्टाग्राम ग्रुप वर अज्ञानी, अशिक्षितां पासून जाणकार तज्ञ व्यक्तीं पर्यतचे समूह तयार झाले असून त्यांच्यात सुसंवाद चालु आहेत. म्हणूनच दामोदर खडसे यांनी आपल्या साहित्य, समाज और मिडीया या राष्ट्रीय चर्चा सत्रात असे म्हटले होते की, "साहित्य आणि समाज यातील केवळ नकारात्मक रूप न पाहाता चांगले आणि उपयुक्त सकारात्मक ज्ञान घेणे गरजेचे आहे'. हेच विचार प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा या डॉ. भास्कर शेळके यांच्या ग्रंथातुनही व्यक्त होताना दिसता. सोशल मिडीयाचा वापर साहित्यासाठी जसा उपयुक्त आहे तसाच समाज, संस्कृतीसाठीही उपयुक्त आहे. म्हणून यातील साधने ही योग्य आणि सार्थपणे वापरली गेली पाहिजेत.

इंटरनेट या केवळ एका माध्यमाचा विचार केला तरी आज मितीला सुमारे दहा हजार च्या वरती मराठी वेबसाईटस आहेत. यातुन मराठी भाषेचे समग्र ज्ञान होउ शकते. यातील काही साईटस या केवळ मनोरंजन घडविणा-या आहेत. तर यात्रा इंडिया डॉट कॉम या सारख्या साईटस मधुन जगभरातील घटनांची वर्तमान पत्रांची ताजी माहिती आपल्याला मिळते. या शिवाय मायबोली डॉट कॉम, मराठी डॉट कॉम, वन टु थ्री इंडिया डॉट कॉम या वृत्त वाहिन्या देणा-या साईटस आहेत. ग. दि. माडगुळकर, पु. ल. देशपांडे, अनेक संत यांचे विचार देणा-या इंडियन इंडेक्स डॉट कॉम तसेच लॅग्वेज डॉट बिग टु मी यातुन आपल्याला गझल, मराठी भाषेतील सण, रूढी, परंपरा आणि उत्सव पहायला मिळतात. एनेव्हा डॉट कॉम यातुन ऑक्सफर्डचे इंग्रजी मराठी डिक्शनरीचा मराठी इंग्रजी अवतार पहायला मिळतो. या शिवाय शिक्षणा बददलच्या संदर्भ ग्रंथ देणा-या लहान मुलां करिता इंडियन चाईल्ड डॉट कॉम, वेस्ट इंडियन साईटस डॉट कॉम अशा असंख्य साईटस मधुन मराठी साहित्य समाज आणि रूढी यांचे ज्ञान आपल्याला पहायला मिळते.

सोशल मिडीया या माध्यमामुळे अनेक कवी, कलावंत यांचे प्रत्यक्ष कार्यक्रम (लाईव्ह) सादर करणे व पाहाणे सोईचे व सहज उपलब्ध होतात. या परिणामामुळे सामाजिक बांधिलकीचा भाव मोठया प्रमाणात रूजत असून विविध समूहातील लोक एकाचवेळी त्याचा अनुभव घेउ शकतात. जगातील कोणत्याही कोप-यातुन कोणत्याही परिस्थिती मध्ये साहित्य, संगीत, कलेचा आनंद व्यक्ती घेउ शकते. ही एक प्रकारची सार्वजनिक अभिव्यक्ती सोशल मिडीयामुळे सर्वा करिता खुली झाली आहे. या शिवाय शास्त्रीय ज्ञानाच्या विविध ऑडीओ, व्हिडीओ दुर्गम भागातील दृश्यीकरण सर्वा पर्यत पोहोचते आणि अनुक व्यापक, गंभीर विषय सहजपणे सर्वांना अनुभवता येतात. आज पर्यत भाषा, शब्द, सौंदर्य, त्यातील विचार, ज्ञान आणि समृध्दता मोजक्याच लोकांच्या हातात असल्याचा जो आरोप होत होता त्यातुन साहित्याची मुक्तता झाली आहे. सर्व जाती धर्मातील लोक सोशल मिडीयाच्या माध्यमातुन आपले शब्द, विचार सर्वापर्यत व्यक्त करू शकतात. बौध्दिक क्षमता, शारीरीक क्षमता, आर्थिक क्षमता यातील कोणतीही मोजपटटी या माध्यमांमुळे कोणत्याही व्यक्तीला अडवु शकत नाही. म्हणूनच प्रसार माध्यमांनी साहित्याची भाषा म्हणून स्वतंत्रपणे मांडत असतांना केवळ वृत्तपत्र, आकाशवाणी किंवा बातम्यांपुरती मर्यादित न ठेवता सर्व माध्यमांकरिता खुली केलेली दिसते.

एकूणच आज जगभरात हजारोंनी प्रसार माध्यमे आणि उपकरणे लहान मुलांपासून थोरांपर्यत हातात लाभली असल्यामुळे चिमुकल्याच्या मनातील भाव आणि विचार थोरांपासून जगातील कोणापर्यतही पळात पोहोचवु शकतो. विचार शक्ती, कृती आणि अभिव्यक्ती ही व्यक्तीगत देणगी असल्यामुळे साहित्यातील सृजनशिलता ही त्या व्यक्ती मध्ेय असेलच असे सांगता येत नाही. परंतु केवळ विचारधारेच्या आधारावरती साहित्यिक म्हणून संबोधल्या जाणा-या कंपुतील लोकांना प्रसार माध्यमातुन नवे उदयोन्मुख ख-या विचारांचे स्वतंत्र प्रतिभा असणारे अनेक नव साहित्यिक कवी, कलावंत या जगाला दिलेले आहेत. केवळ टिवटरच्या माध्यमातुन आपल्या कवीता मांडुन जगासमोर खरे कवित्व सिध्द करणारे आज काही लेखक, कवी पहायला मिळतात. हेच प्रसार माध्यमांचे वैश्विक साहित्याशी असणारे खरे नाते होय.

**माध्यमांची सामाजिकता:**

साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध आहे. सामाजिक स्तरावर साहित्याची स्वतंत्रपणे व्याख्या करता येत नाही. साहित्य म्हणजे भाषेच्या साधनेद्वारे केलेली कलानिर्मिती होय. ही कला निर्मिती समाजाच्या उपयुक्तते करिता जेव्हा वापरली जाते त्या वेळेला साहित्याचा समाजाशी असणारा संबंध हा सांस्कृतिक अंगाने व्यक्त होत असतो. कारण साहित्य ही एक व्यक्तीगत निर्मिती असली तरी कोणतीही व्यक्ती ही समाजाचाच घटक असते. म्हणून त्या व्यक्तीचे अर्थात साहित्यिक लेखकाचे समाजाशी असणारे रूढी परंपरागत आचार, विचार, संकेतां सोबत शिष्टाचार आणि धर्म संकल्पना तो सामाजिक जीवनातुन शिकत असतो आणि तेच भाषिक गटांच्या माध्यमां द्वारे लोकां समोर मांडत असतो. म्हणून कला म्हणजे केवळ कल्पना विलास नसुन समाजाला संस्कार करणारी एक पध्दती आहे. समाजाला दिशा देणारी एक समकृती आहे. म्हणून साहित्य, समाज, संस्कृती एकाच परिघातले तिनही घटक आहेत. अनेक साहित्यिकांनी सामाजिक कार्यातुन राष्ट्ीय किंवा राजकीय कार्याला हातभार लावलेला दिसतो. संत साहित्याने गवळीणी, भारूडां द्वारे लोक जागृती घडविली. तर स्वातंत्र्य पुर्व काळात अनेक लेखकांनी कविंनी स्वातंत्र्य गिते आणि लेखन करून समाज परिवर्तन घडविले. पाश्चात्य साहित्यिकांचा विचार करायचा झाल्यास रूसो व व्होल्टेअर या ग्रंथकारांनी फ्रेंच राज्य क्रांती घडविली असे म्हटले जाते. कारण त्यांची विचार शैली, लेखन पध्दती इतकी परिणामकारक होती की लोक सहजपणे त्यांच्या अधिन होत असत. रूसोच्या मते सामाजिक परिवर्तना साठी शिक्षण हा प्रमुख आधार स्तंभ असून ते शिक्षण तीन पध्दतीतुन दिले गेले पाहिजे. ते विभाग म्हणजे निसर्ग शिक्षण, व्यक्ती शिक्षण आणि व्यवहार शिक्षण. निसर्ग शिक्षणात आत्म विकास, वाचा ज्ञान, मेधाशक्ती, स्मृति यांचा विचार जर घडला तर मनोवृत्ती तयार होईल. व्यक्तीगत शिक्षणात आचार, विचार, मानसिक, बौध्दिक विकास, शारीरीक विकास याला महत्व दिले गेले पाहिजे. तर व्यावहारिक शिक्षण हे बाहय शिक्षण विश्वातील अनेक तत्ववेत्यांच्या कल्पना विचारांच्या आधाराने शिक्षण दिले पाहिजे. याच विचारां प्रमाणे साहित्य समाजातील परस्पर संबंध फ्रेंच तत्वज्ञ तेन यांनी अनुकृतीचा सिध्दांत मांडला. साहित्य समाज यांचे परस्पर संबंध वंश आणि युग प्रवृत्ती व सामाजिक परिस्थिती या घटकांवर अवलंबुन असते असे त्यांनी मांडले. याचाच अर्थ मानवी जीवन पध्दतीचा संस्कृतीशी असणारा संबंध हा अमूर्त आहे.

साहित्य, समाज, संस्कृती आधुनिक काळात सोशल मिडीया चा अंतर्भाव करणेत येतो. किंबहुना सोशल मिडीयामुळे साहित्याची विविधांगी रूपे आपल्याला पहायला मिळतात. ही साहित्य निर्मिती जरी सृजनशील नसली तरीही सामाजिक विचार, कृती आणि व्यवहार मात्र बहुतांषी याच माध्यमां द्वारे होताना दिसतात. कारण एकूणच माध्यमांचा व्यक्तीगत होणारा वापर सर्वात मोठया प्रमाणा वर पहायला मिळतो. माहे जानेवारी, 2021 मध्ये सर्वाधिक सोशल मिडीया चा वापरकर्त्यांची आकडेवारी पुढील प्रमाणे: फेसबुक (2.74 अब्ज), यु टयुब (2.29 अब्ज पेक्षा जास्त), वॉटसअॅप (2.00 अब्ज), फेसबुक मेसेन्जर (1.3 अब्ज), इंस्टाग्राम (1.22 अब्ज), टिकटॉक (6890 लाख), क्युक्यु (6170 लाख), डुइंग (6000 लाख). या संख्येचा विचार करता यातील एक दशांश वापर कर्त्यांचा भाषिक विचार केल्यास सोशल मिडीयाचा एकूण असणारा आवाका सहजपणे लक्षात येतो. सोशल मिडीयाचा वापर सामाजिक स्तरावर सर्वच प्रकारातुन पहायला मिळतो. लहान मुलांची होणारी शाळा व्हिडीओ कॉन्फरंसींग अथवा ई लर्नींग अथवा व्हर्च्युयल पध्दतीने आज घेतली जाते. या पध्दतीमुळे विद्यार्थ्यांना स्लाईड शो, क्लीप आर्ट, अॅनिमेशन याद्वारे प्रत्यक्ष अनुभव घेता येतात. अनेक डिझाईन, ड्ॉइन्ग, विविध यंत्रे, सर्व कोनातुन प्रत्यक्ष पहायला मिळत असल्यामुळे ते शिक्षण प्रभावी ठरते. संगणकाचा शिक्षणातील वापर हा यातील अविभाज्य घटक असून अनेक शाळातील शिक्षण हे मोबाईल द्वारे आज उपलब्ध झालेले आहे. विद्यार्थ्यांना येणा-या अडीअडचणी ते ऑनलाईन प्रत्यक्षपणे मांडु शकतात. शिक्षणा प्रमाणेच संपर्क माध्यम म्हणून सोशल मिडीयाचा वापर सर्वत्र केला जातो. करमणुक, खरेदी विक्री, व्यापारा बाबत उत्पादनाची जाहिरात, त्यांची महत्वे, विविध फोटो, प्रसिध्द व्यक्ती यांच्या माध्यमातुन घरात बसुन षिकण्याची संधी सर्वाना उपलब्ध होते. कारखाने व कार्यालये यांच्यातील वाढता सोशल मिडीयाचा प्रभाव हा ई मेल, मेसेजेस, सॉफटवेअर प्रोग्राम्स, नोटस, वेब साईटस, वेब पेज यामुळे व्यावहारिक उपयुक्तता ही मोठया प्रमाणात दिसुन येते, या शिवाय इतर क्षेत्रातही या माध्यमांचा उपयोग केला जातो.

प्रसार माध्यमे ही वैश्विक स्तरावर उपलब्ध असल्याने त्याला साहित्याचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष अंग सहजपणे उपलब्ध होते. उदाहरणार्थ कोणत्याही उत्पादनाची जाहिरात कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त लोकां पर्यत पोहोचेल या हेतुने तयार केली जाते. म्हणून त्या मध्ये वापरले जाणारे साहित्याचे अंग हे काव्यरूप असते. परंतु तीच जाहिरात जेव्हा ऑडीओ, व्हिडीओ स्वरूपातुन केली जाते त्या वेळेला प्रक्षेपणाच्या दृश्टीने प्रभावी संवाद हे भाषिक अंग वापरले जाते. याच प्रकारातुन अनेक उत्पादनांची माहिती पत्रके, प्रसिध्दी पत्रके, कार्यालयीन व्यवहारातील पत्रे, मसुदे, उतारे इत्यादी अनेक प्रकारातुन साहित्याचे व्यावहारिक अंग समाजात आपल्याला पहायला मिळते. आधुनिक मिडीया मुळे भाषिक भिंती आणि प्रांतिक सिमा रेशा नष्ट झालेल्या आहेत. एकच उत्पादन विविध राज्यां मध्ये विक्री करिता ठेवले जात असल्यामुळे देशातील वेगवेगळया भाषां मध्ये त्याचे प्रसारण केले जाते. फेसबुक, टिवटर, वॉटसअॅप या सारख्या संघटनात्मक समूहा मध्ये देशातील किंवा जगातील वेगवेगळे सदस्य एकत्र येत असल्यामुळे देश, प्रांत, राज्य यातील विविध भाषांची अनेक रूपे सहजपणे वापरली जातात. हिंदी, मराठी, गुजराती, बंगाली, कन्नडी इत्यादी भाषांतील अनेक शब्द वॉटसअॅपमुळे किंवा फेसबुकमुळे सर्रासपणे वापरलेले पहायला मिळतात. न्युज चॅनेल, बातमी पत्रे, प्रसिध्दी पत्रके यांच्यातही अनेक शब्द समान पध्दतीने सर्वच भाषांतुन सर्व भाषिक एकत्रपणे वापरत असतात. या शिवाय व्यापार आणि औद्योगिकरण यातील अनेक शब्द जागतिक स्तरा वर समान पध्दतीने वापरलेले दिसतात. उदाहरणार्थ कोरोना महामारीचा कोविड - 19 हा शब्द वैश्विक आणि स्थानिक स्तरावर लहान मोठया माणसापासून षिक्षित अशिक्षितांच्या तोंडी सहजपणे आलेला दिसतो. या अगोदरच्या कालखंडात अनेक महामारी येउन गेलया असल्या तरी मिडीयाचा सर्रास वापर नसल्यामुळे वाचक विचारवंत यांच्या तोंडी काही शब्द येत असतात. विविध भाषांतील प्रसिध्द शब्द, शिष्टाचार सर्व मान्य आचार, राज शिष्टाचार सर्वच प्रांतां मधुन समान पध्दतीने वापरले जाण्याचे प्रमुख कारण म्हणजे सोशल मिडीया होय.

थोडक्यात प्रसार माध्यमांचा वापर हा सामाजिक स्तरा वर मोठया प्रमाणात होत असला तरी ब-याचदा त्याचे दुष्परिणामही पहायला मिळतात. लहान मुलांना सहजपणे किंवा आवश्यक नसणारे आचार विचार यु टयुब व अन्य चॅनेल मधुन नकळतपणे त्यांच्या समोर येतात. तरूणांच्या व्यवसायातील असणारे न्युनगंडत्वाची भावना सोशल मिडीयाच्या प्रभावातुन वाढत चालली आहे. नैतिकता, मानवीयता, चारित्र्य संपन्नता, राष्ट्ीय भावना, ज्ञानपिपासु व्यक्ती यांचाअभाव होत असून क्षणिक दुर्बुध्दी कडे वळणारा सामुहिक कल झटकन झालेला दिसतो. सोशल मिडीया हे जरी आव्हानात्मक असले तरी त्या बददलचा आपण दुराग्रह करून न घेता यथायोग्य पध्दतीने वापर केल्यास सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्ीय उन्नती सहजच घडुन येईल व हेच प्रसार माध्यमांचे वैश्विक श्रेय मानावे लागेल. जगभरातील अनेक बातम्या, घटना प्रत्येक व्यक्तीच्या डोळयासमोर दिसत असताना त्यांनी स्वत्वातले बदल घडुन आणुन सामाजिक, राष्ट्ीय प्रगती केली तरच ख-या अर्थाने त्याची उपयुक्तता व प्रयोजन जागतिक स्तरा वर स्तुतीप्रिय राहील. साहित्यातील अनेक नविन लेखक, कवी, कलावंत याच माध्यमांमुळे जगाला परिचित होत आहेत. जग माणसाच्या हातात अगदी जवळ आलेले आहे. त्याचा सर्वाथाने उपयोग करून घेणे हेच मानवी जीवनाचे खरे श्रेय ठरेल.

## संदर्भ यादी:

1. डॉ. किषोर चव्हाण, इनसाईड पब्लिकेशन, नाशिक, माहिती संप्रेशण तंत्रज्ञान, 2 आवृत्ती, फेब्रुवारी, 2006, नाशिक.
2. बर्वे मिनाक्षी, नुतन प्रकाशन, पुणे, 1990, संगणक: शिक्षण व षिक्षक, प्रथम आवृत्ती.
3. वसंत पाटणकर, लोक वांड्मय गृह, मुंबई. साहित्य, समाज आणि संस्कृती, प्रथम आवृत्ती, माहे जुलै, 1998.
4. विनोबा भावे, परंधाम प्रकाशन, पुणे, शिक्षण विचार. माहे जानेवारी, 1977.
5. डॉ. भास्कर शेळके व डॉ. मिलींद कसबे, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथम आवृत्ती.
6. रसिका आगाशे, दैनिक महाराष्ट् टाईम्स, दिनांक 9 एप्रिल, 2017, मिडीया म्हणजे काय रे भाउ 1.
7. सोनाली जोशी, लेख, (संदर्भ: नेट) सोशल मिडीयाचा वापर, 2020.

Indian Social & Research Foundation, Akola

# KALA MAHAVIDYALAYA MALKAPUR, AKOLA

*(Accredited by NAAC with "B" Grade)*

*Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati*

In Collaboration with Dr. Manorama and Prof. Haribhau Shankarrao Pundkar Arts, Commerce and Science College, Balapur (M.S.) & Vidarbha Sahitya Sangh, Akola. Department of Marathi, English & I.Q.A.C

**Organized One Day International Interdisciplinary E-Conference**

## CERTIFICATE OF PARTICIPATION

This certificate is being awarded to DR CHANDRASHEKHAR ATMARAM BHAGAT for having actively participated in the **One Day International Interdisciplinary E-Conference On "Benefits of Life Values in Contemporary Social System"** On 30th September 2021

G. S. Pande

Hon. Dr. D.H. Pundkar
President
I. S. & R. F., Akola Principal Dr. M. and Prof. H. S. Pundkar A. C. S. College, Balapur (M.S.)

Dr. Prakash Wankhade
HOD Marathi Manorama & Prof. Pundkar A.C.S. College, Balapur, Akola

Dr. Rajesh Olambe
HOD English Manorama & Prof. Pundkar A.C.S. College, Balapur, Akola

Seema Rothe Executive Chairman Vidarbha Sahitya Sangh, Akola

Dr. Dipali Gawande
HOD Marathi Kala Mahavidyalaya, Malkapur, Akola

Asst. Prof. Pravin Ugale
HOD English
IQAC-Coordinator Kala Mahavidyalaya, Malkapur, Akola

Dr. Gitali S. Pande
Principal & Convenor Kala Mahavidyalaya, Malkapur, Akola

51

RESEARCH NEBULA
AN INDEXED, REFEREED & PEER REVIEWED JOURNAL

J-Gate
INDEXED

ISSN 2277-8071

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

DOI PREFIX 10.22183 JOURNAL DOI 10.22183/RN IMPACT FACTOR 7.399

ONE DAY

## INTERNATIONAL INTERDISCIPLINARY E-CONFERENCE

On

# BENEFITS OF LIFE VALUES IN CONTEMPORARY SOCIAL SYSTEM

**30th September, 2021**
**Organized by**

ISRFA

DEPARTMENT OF MARATHI & ENGLISH
**KALA MAHAVIDYALAYA MALKAPUR, AKOLA. (M.S.)**
In Collaboration with

DEPARTMENT OF MARATHI & ENGLISH
**DR. MANORAMA & PROF. HARIBHAU SHANKARRAO PUNDKAR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, BALAPUR, AKOLA (M.S.)**

&

**VIDARBHA SAHITYA SANGH, BRANCH AKOLA (M.S.)**

Special Issue on 30th September, 2021
www.ycjournal.net

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

One Day International Interdisciplinary E-Conference On
BENEFITS OF LIFE VALUES IN CONTEMPORARY SOCIAL SYSTEM
On 30th September, 2021 @
K.M. MALKAPUR, D.M & P.H.S. P. COLLEGE, BALAPUR, &V. S. S., BRANCH AKOLA

DR. CHANDRASHEKHAR ATMARAM BHAGAT

Lonavala, District Pune

# समकालीन समाज व्यवस्थेत संतसाहित्यातील जीवनमूल्यांची उपयोगिता

***ABSTRACT***

*संतसाहित्यात व्यक्तिगत जीवनाला किंबहुना मानवाला अनन्य साधारण महत्व आहे. जीव हाच ईश्वर असे मानले असून 'देह देवाचे मंदिर' असे म्हटले जाते. मूल्यांच्या संदर्भातील अनेक उक्ती संतसाहित्यात आपल्याला वाचायला मिळतात. काही प्रमूख मूल्यांचा येथे आपण विचार करणार आहोत. भूतदया हे त्यातील एक प्रमूख मूल्य होय. मानवा मध्ये भूतदया असावी असे संतांनी म्हटले आहे. माणूस हा कृपाळू व दयाळू असला पाहिजे. मूल्यशिक्षणाचे धोरण, विचार आणि परंपरा याचा अभ्यास केल्यास भारतीय जीवन पध्दती मध्ये जीवन मूल्य ही मूळातच अस्तित्वात होती. ती सामाजिक स्तरावर असल्यामुळे शालेय अभ्यासक्रमात त्यांचा अंतर्भाव करणेची गरज वाटत नव्हती. मात्र पाश्चात्य अभ्यासक्रमाच्या अनुकरणीय वृतीमुळे काही दशके देशीय विद्याथ्र्यांचे नुकसान झाले हे मान्यच करावे लागेल आणि म्हणून संतसाहित्यातील जीवन मूल्ये ही समकालीन समाज व्यवस्थेला वळण देणा-या ख-या मूल्यांच्या शिकवणीची गरज आहे हे आपल्याला मान्य करावे लागेल.*

***KEYWORDS :*** मूल्य, सामाजिकता, संतसाहित्य, समकालीन, उपयोगिता, प्रबोधन युग

**संशोधन पध्दती:**

शोध निबंधात लिहित असतांना विशिष्ट प्रकारची संशोधन पध्दती अवलंबली जाते. संशोधनाच्या ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि प्रायोगिक या तीन पध्दती आहेत. या शोध निबंधा मध्ये ऐतिहासिक संशोधन पध्दतीतील तुलनात्मक अभ्यास करून समकालीन समाज व्यवस्थेत संतसाहित्यातील जीवनमूल्ये कशी उपयुक्त आहेत याचा शोध घेतला आहे. ही पध्दती शैक्षणिक तत्वज्ञान संशोधनाशी निगडीत किंवा मिळतीजुळती अशी संशोधन पध्दती आहे.

**मूल्य स्वरूप व संकल्पना:**

मूल्य हा शब्द पाश्चात्य भाषेतून मराठी भाषेत आलेला आहे. युरोपातील प्रबोधन काळ म्हणजेच मानवतावादी संकल्पनेचे जागतिक आंदोलनच म्हटले जाते. या काळात जगात मानवाला अग्रस्थानी धरून विश्वात होणारे बदल, परिवर्तन, सुधारणा, प्रगती इत्यादी घटकांचा विचार केला गेला. प्रबोधन युग हे चोदावे ते सोळावे शतकातील होय. या शतकात मानवी जीवनाकडे बघण्याचा नवादृष्टिकोन उदयाला आला. मानवतावादी विचारश्रेणीत, 'शिक्षणामुळे माणसाचे मोल वाढते' हा विचार पुढे आला. यामुळे 'मोल' शब्दाचा अर्थ केवळ 'मूल्य' न राहाता माणसाला शिक्षणामुळे मिळणारा दर्जा, श्रेणी; व्यक्तीची पात्रता, गुणसंपन्नता, विद्वत्ता इत्यादी समानार्थी शब्द रूढ झाले. मूल्य या शब्दाला याच अर्थानी इंग्रजी मध्ये व्हॅल्यु / Value हा शब्द प्रचलीत आहे.

मानवी जीवन हे अमूल्य असून मानव हा विश्वाचा अंशात्मक घटक मानला जातो. त्यामुळे मानवा मध्ये असणारे सर्व गुणावगुण हे विश्वाशी बांधील आहेत. या करिता माणसाने विश्वाची काळजी घ्यावी. विश्वाच्या पसा-यात माणसाला आपले स्वतःचे मोल वाढवायचे असेल तर त्याला अंतरिक जाणीव व्हायला पाहिजे. माणसाने केवळ बाहय गोष्टीकडे न पाहता स्वतः मध्ये अंतरिक बदल घडवून आणले पाहिजेत. भारतीय विचारश्रेणी नुसार विश्वाला चालविणारी एक अदभूत शक्ती असून तिला, नियंता किंवा भगवंत, परमेश्वर अशी अनेक संबोधने नीतिशास्त्रात वापरलेली आहेत. याच अर्थाने भारतीय विचारा नुसार मूल्य म्हणजे 'चांगले असे' म्हटले जाते. यालाच सत्व, इष्ट, भले, जीवनाला उपयुक्त, मानवी सदगुण, सदवर्तन, सदविचार, सात्विक वृत्ती अशा अनेक संज्ञा वापरल्या जातात. संतांच्या साहित्यात मूल्याचा अर्थ भावनिक स्थिरता उत्तम असून ज्याचे मानसिक आरोग्य सुद्दढ राहील असे जीवनसार म्हणजे मूल्य होय.

संतांचा मूल्य मांडण्याचा हेतू हा मानवी जीवन, समाज आणि संस्कृती समृध्द करणे हा होता. मूल्यांमुळे मानवी जीवन

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

आणि पर्यायाने समाज जीवन अर्थपूर्ण बनते. याच अर्थाने डाॅ. मुळावकर यांनी, 'मूल्यशिक्षणः सुसंवाद' या पुस्तकात मांडलेली व्याख्या ही अतिशय बोलकी आहे. ते म्हणतात की,

"मूल्य म्हणजे व्यक्तीमत्व विकासाला पोषक ठरणारी व व्यक्तीमत्वातून आविष्कृत होणारी स्वमान्य व समाजमान्य स्थलकालनिरपेक्ष विकसनशिल सुसंघटित अशी मार्गदर्शक तत्वे" थोडक्यात पिंडी ते ब्रम्हांडी आणि सत्य, शिव, सुंदर याची अनुभुती देणारी जीवन पध्दती म्हणजे मूल्यवान जीवन होय.

**मूल्यांचे प्रकार:**

मूल्य ही संकल्पना समाजहितार्थ तत्व असे मानल्यास त्याचे वर्गीकरण विविधांगी करता येते. नीतिशास्त्र, धर्मशास्त्र, सौंदर्यशास्त्र, अर्थशास्त्र अशा विविध शास्त्र आणि विभागांच्या आधारे अनेक मूल्ये मानली जातात. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेने 1979 साली 83 मूल्यांची सर्व समावेशक यादी तयार केली आहे तसेच भारतातील सर्व धर्मियांची प्रमूख चाळीस मूल्ये डाॅ. एन. एल. गूप्ता यांनी मांडली आहेत. त्या मूल्यांच्या वेगवेगळया व्याख्या असून भारतीय पाश्चात्य स्वतंत्र मूल्य आहेत. परंतू मूल्यांचे वर्गीकरण करायचे झाल्यास स्थूलपणे खालील प्रमाणे करता येईल.

- वैयक्तीक मूल्यः स्वच्छता, कर्तव्यदक्षता, विज्ञाननिष्ठा, भूतदया, खिलाडू वृत्ती, स्वावलंबन, श्रमनिष्ठा, शुचिता (शुध्दता किंवा मांगल्य), निर्भयता, शिस्तप्रियता.
- सामाजिक मूल्यः समता, सर्वधर्म सहिष्णुता, विज्ञाननिष्ठा, सत्यप्रियता, मानवता, निसर्गप्रेम, बंधुभाव, न्यायप्रियता, आदरभाव, अहिंसा, परस्पर सहकार्य.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मूल्यः राष्ट्रभक्ती, आंतरराष्ट्रीय सामंजस्य, राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व.

**समकालीन समाज व्यवस्था:**

समकालीन समाज व्यवस्थेत आजच्या एकविसाव्या शतकातील जीवन पध्दती अपेक्षित असली तरीही मूल्य ही कालातीत असल्यामूळे ती सर्वकाळ सर्वत्र लागू होतात. युरोपियन राज्य क्रांतीने जगाला स्वातंत्र्य समता, बंधूता ही तत्वे दिली. त्यामुळे समाज जीवन उंचावले. आजच्या जीवनात सुखासिनता वाढली आहे. माणसांच्या हातात यंत्रे आणि साधने प्राप्त झाली आहेत. कमी वेळात आणि कमी श्रमात लोक जगविख्यात होऊ लागले आहेत. अनेकांचे आचार, विचार, प्रवृत्ती, कलागुण, नैपुण्य हे सर्वाना मुक्त व उपयुक्त ठरत आहे. एकविसाव्या शतकाच्या उंतरठयावर लहान मुलांच्या हातात लॅपटाॅप, मोबाईल, इंटरनेटची साधने आली. बैठया जागेत सर्व सोई सुविधा उपलब्ध झाल्या. माणसाचे कामानिमित स्थलांतर आणि प्रयाण वाढले. जीवनमान बदलले. प्रगतीच्या रेटयात सामाजिक जीवन पध्दती भावनिक जीवन श्रेणी, एकत्रकुटुंब पध्दती, राष्ट्रीय सम्यकता, व्यक्तिगतएक्य यांच्या भिंती धुसर होऊन 'मी'त्वाला चालना मिळाली. स्वत्व गमावलेला आजचा माणूस सोई, सुविधांनी समृध्द असून सदगुण, सदविचार, लोकविरहित भावनाषून्य जीवन जगत आहे. त्यामुळे जीवन मूल्यांची उपासना ही काळाची गरज ठरली आहे. आज मानवी जीवनासमोर जगात भेडसावणा-या समस्यांमध्ये एकाकीपणा, नैराश्य, भयाणता, परस्परातील आपलेपणा नष्ट झाल्यामुळे वाढणारे प्रश्न, आत्महत्या, बलात्कार, अमानुषपणा, विक्षिप्तपणा हे दुर्गुण सहजपणे व्यक्त होताना दिसतात. माणसातले माणूसपण आटून दिखाऊपणाला समाज भूलतो आहे. भ्रष्टाचार, व्यभिचार, अत्याचार हे शब्द पदोपदी कानावर पडत आहेत. या परिस्थितीतून मानवजातीला बाहेर काढून ख-या अर्थाने मानवत्वाची जडणघडण करण्याची काळाची गरज आहे.

देशातील, राष्ट्रातील हरवत चाललेले माणूसपण परत मिळविण्यासाठी तज्ञ परीक्षकांनी, अभ्यासकांनी संविधानातील मूल्य व्यवस्थे नुसार व्यक्तिगत, सामाजिक व राष्ट्रीय मूल्यांचा जोपासलेला आराखडा तयार केला आहे. यातूनच मूल्यशिक्षण ही संकल्पना उदयाला आली. वास्तविक मूल्यशिक्षणातील हेतू हा सुस्कारीत व चारित्र्य संपन्न आदर्श नागरीक घडावा असा असला तरी आज त्याची सिध्दता होताना दिसत नाही. हे घडावे म्हणून महाराष्ट्र शासनाने शालेय अभ्यासक्रमात खालील दहा प्रमुख मूल्यांची निवड करून विद्यार्थ्यां वर त्याचे संस्कार करण्याचा प्रयत्न केला आहे. ती दहा मूल्य म्हणजे 1. संवेदनषीलता, 2. वक्तशिरपणा, 3. निटनेटकेपणा, 4. स्त्री पुरूष समानता, 5. श्रमप्रतिष्ठा, 6. वैज्ञानिक दृष्टिकोन, 7. सर्वधर्मसहिष्णुता, 8. सौजन्यशिलता, 9. राष्ट्र भक्ती, 10. राष्ट्रीय एकात्मता.

नव्या पिढीतील मुलांचा बौध्दीक, नैतिक व सौंदय दृष्टिकोन वाढून राज्य, राष्ट्र, व्यक्ती यांचा नक्की विकास होईल अशी धारणा केली जाते. एकविसाव्या षतकातील पिढी ही सुजाण आणि सक्षम तसेच सधन आणि जागृत असल्यामुळे ख-या अर्थाने गुणसंपन्न व्हावे हीच यातून अपेक्षा आहे. तसे घडले तरच विज्ञान युग अवतरेल.

वरील मूल्यशिक्षणाचे धोरण, विचार आणि परंपरा याचा अभ्यास केल्यास भारतीय जीवन पध्दती मध्ये जीवन मूल्य ही मूळातच अस्तित्वात होती. ती सामाजिक स्तरावर असल्यामुळे शालेय अभ्यासक्रमात त्यांचा अंतर्भाव करणेची गरज वाटत नव्हती. मात्र पाश्चात्य अभ्यासक्रमाच्या अनुकरणीय वृत्तीमुळे काही दशके देशीय विद्यार्थ्यांचे नुकसान झाले हे मान्यच करावे लागेल आणि म्हणून संतसाहित्यातील जीवन मूल्ये ही

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

समकालीन समाज व्यवस्थेला वळण देणा-या ख-या मूल्यांच्या शिकवणीची गरज आहे हे आपल्याला मान्य करावे लागेल.

**संतसाहित्यातील जीवनमूल्ये:**

संतसाहित्य हे जीवनमूल्यांनी ओतप्रोत भरलेले साहित्य आहे. संतसाहित्याचा कालखंड हा जरी मध्ययुगीन कालखंड असला तरी तत्कालिन सामाजिक परिस्थितीत घसरत जाणारी नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती होती. अशा परिस्थितीत सतांनी लोकांना व समाजाला तारक शक्ती देऊन व्यक्तिगत, देशी, राष्ट्रीय मूल्य मानवतावादासह समाजात रूजवली. हे संतसाहित्याचे सगळयात मोठे कार्य म्हणावे लागेल.

**संतसाहित्यातील व्यक्तीगत मूल्ये:**

संतसाहित्यात व्यक्तिगत जीवनाला किंबहुना मानवाला अनन्य साधारण महत्व आहे. जीव हाच ईश्वर असे मानले असून 'देह देवाचे मंदिर' असे म्हटले जाते. मूल्यांच्या संदर्भातील अनेक उक्ती संतसाहित्यात आपल्याला वाचायला मिळतात. काही प्रमूख मूल्यांचा येथे आपण विचार करणार आहोत. भूतदया हे त्यातील एक प्रमूख मूल्य होय. मानवा मध्ये भूतदया असावी असे संतांनी म्हटले आहे. माणूस हा कृपाळू व दयाळू असला पाहिजे. संत नामदेव महाराज म्हणतात:
सर्वाभूती दया सर्वभावे करूणा । जेथे मी तू पणा मावळला ।।
तीर्थावळी अभंग 18 वा

सर्वावर भूतदया दाखविणारे मन असावे. माणूस हा कृपाळू, दयाळू असला पाहिजे. त्याच्या मनात भूतदया असली पाहिजे. प्रत्येक भूताला त्याने भगवंत मानले पाहिजे. परंतू माणूस नेमका या विरूध्द वागतो. माणसाच्या अशा वागण्याचा संत एकनाथ धिक्कार करतात. ते म्हणतात: आवडी खावया मासा । अथवा स्वर्गाचिया आशा । जे करिती पशु हिंसा । तयां पुरूषां अधःपतन । एकनाथ गाथा, अध्याय 5 वा, ओवी 233 पशु हिंसे बददल भूतदया बाळगणे गरजेचे आहे. ही भूतदया माणसानी कशा स्वरूपात बाळगायला पाहिजे या करिता संत ज्ञानेश्वर माउली म्हणतात: तैसी आघवियांचि भूतमात्री । एकपणे जया मैत्री । कृपेशी धात्री । आपणचि जो । 148 । आणि मी हे भाष नेणे । माझे काहींचि न म्हणे । सुख दुःख जाणणे । नाही जया । 149 । तेवींचि क्षमेलागी । पृथ्वीसि पवाडु आंगी । संतोशा उत्संगी । दिधले घर । 150 । ज्ञानेश्वरी भावार्थदिपिका अध्याय 12 वा ओवी 148 - 150 त्यामूळे माणसे जोडली जातील. एकसध शक्ती होईल. भूतदयेची शक्ती सर्वाना उपयूक्त ठरेल. भूतदयेचे हे सामथ्र्य माणसाला थोर बनविणारे आहे. भूतदये प्रमाणेच संतसाहित्या मध्ये शुध्दतेचा, निर्मळतेचा अनेक ठिकाणी अंगीकार केलेला दिसतो. संतांच्या मते, शुध्दता किंवा निर्मळता ही मनावर अवलंबून असते. माणसाचे मन निर्मळ असावे, त्याचे अंतःकरण शुध्द असावे. संत तुकाराम महाराज म्हणतात साबणाने बाहय शुध्द होईल. परंतु अंतरिक शुध्दीसाठी माणसाला नामच उपयोगी पडते. संत ज्ञानेश्वर महाराजांनी आत्मशुध्दी साठी असे म्हटले आहे की,: म्हणे शुचित्व गा ऐसें । जयापाशीं दिसे । आंग मन जैसें । कापुराचे । 462 । ज्ञानेश्वरी भावार्थदीपिका अध्याय 13 वा ओवी 462 माणसाचे मन कापरा प्रमाणे शुध्द असावे असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. असे मन असेल तर माणसातील मांगल्य, आनंद इतरांनाही जाणवतो आणि तीच खरी माणसाची ओळख आहे. संत नामदेव महाराजांनी लिहिलेल्या तीर्थावळीच्या अभंगात अंर्तबाहय शुध्दीचे असे वर्णन केले आहे: उत्तमातुनि उत्तम सत्य वाग्स्नान । यापरते पावन आणिक नाही ।। काया वाचा मने हे दृढ धरिजे । हेळाचि तरिजे भवसागर ।। बाहेरी भीतरी शुध्द सर्वकाळ । हे दुजे निर्मळ शुध्द स्नान ।। वरील प्रमाणे कर्तव्यदक्षता, श्रमनिष्ठा, स्वावलंबन, निर्मळता, शिस्तप्रियता इत्यादी इतर अनेक व्यक्तिगत मूल्ये संतसाहित्यात पहायला मिळतात.

**संतसाहित्यातील सामाजिक मूल्ये:**

संतसाहित्यात अनेक सामाजिक मूल्ये अभ्यासायला मिळतात. यातील प्रमूख म्हणजे नैतिकता, समानता, बंधूभाव, सर्वधर्मसहिष्णुता याचा थोडक्यात परिचय आपण इथे करून घेणार आहोत.

संतांच्या मते प्रत्येक व्यक्तीने नैतिकता पाळली पाहिजे. समाजातील प्रत्येकाने नैतिकतेने आचरण करणे गरजेचे आहे. सामाजिक जिवनात नैतिकता जर सांभाळली नाही तर समाजाला नुकसान सोसावे लागते. एखाद्या व्यक्तीला समाजाने किंवा लोकांनी मोठे केलेले असते. अशा व्यक्तीने स्वार्थी वृत्ती ठेऊन वागले तर समाजाचा विनाशच होतो. समाजाने दिलेले मोठेपण हे केवळ मोठेपण नसुन माणसातील जन्माने, शिक्षणाने आई, वडिल, गुरू, समाज या सर्वाच्या ऋणामुळे तो मोठा झालेला असतो. अशा व्यक्तीने जर नैतिकता पाळली नाही तर सर्वच नष्ट होऊन जाते. म्हणून संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात: विमुख होईल गुरूभक्ती । आदर न करील अतिथी । संतोषु नेदील ज्ञाती । आपुलिये । 106 । ऐसा स्वधर्मक्रियारहितु । आथिलेपणें प्रमतु । केवळ भोगासक्तु । होईल जो । 107 । तया मग अपावो थोर आहे । जेणे ते हातीचे सकळ जाये । देखा प्राप्तही न लाहे । भोग भोगू । 108 । ज्ञानेश्वरी भावार्थदीपिका अध्याय 3 रा ओवी 106 - 108 सामाजिक व्यक्तीने समाज रक्षणा साठी नैतिकता पाळणे गरजेचे आहे. त्यांनी जर तसे वागले नाही, नियमांनी आचरण केले नाही तर त्याच्या प्रमाणेच इतरही अनाचार करू लागतील. मग धर्म,

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

निती राहाणार नाही. यथा राजा तथा प्रजा असे घडेल. म्हणून संत एकनाथ महाराज म्हणतातः जे जे श्रेष्ठ आचरिती । ते ते कर्म इतर करिती । यालागी यमनियम प्रजापती । आचारे अनहकृती लोक संग्रहार्थ ।। समाजाचे नेतृत्व करणारे, धुरिणत्व करणारे, राज्यकर्ते अशा लोकांनी स्वतःला अशा कडक नीतीनियमांचा पाश घालून घ्यावा असा उपदेश ते यातून करतात.

नैतिकते प्रमाणेच सामाजिक ऐक्याचाही समानतेचा उपदेश संत आपल्या ओव्यां मधून करतात. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या काळात चातुवर्ण्य व्यवस्था अस्तित्वांत होती. अशा वेळी जातीच्या भिंती भक्कम असताना अठरा पगड जातीच्या लोकांना त्यांनी एकत्र घेउन वर्ण, धर्म, जाती न मानता सर्वासाठी भक्ती मार्ग खुला करताना ते म्हणतातः तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शुद्र अंत्यजादि इया । जाती तंवचि वेगळालिया । जंव न पावती माते । ज्ञानेश्वरी भावार्थदीपिका । अध्याय नववा । । ओवी 460 । यातून ज्ञानेश्वर यांनी जणू काही स्त्री वर्ग हा पाचवा समानतेने वागण्यासाठी एक वर्ग आहे असे प्रतिपादन केले. असे समानतेचे विचार संत एकनाथ महाराज पुढील ओवीतुन देतातः निजरूपे सर्व समता । समचि देख सर्वा भूतां ।। वैष्णव सेवा अत्यंत कठीण । तेथे जाती नाही गा प्रमाण ।। सर्व भुती समत्वे भजता । हेचि श्रेष्ठ साधन तत्वता । येणे पूर्ण ब्रम्ह लाभे हाता । हे साधे अवस्था नरदेही ।। समानतेने वागणारा माणूस हा सर्व श्रेष्ठ नरदेह होय आणि याच वागणुकीतून सामाजिक समानता सर्वत्र प्रस्थापित होईल म्हणून संतांनी त्याचा अनेक ठिकाणी उल्लेख केलेला आहे. संत नामदेव महाराजांनी आपल्या गाथे मध्येः
सोवळे ओवळे उच नीच वर्ण । नाही येथे गुण दोष काही ।। तसेच काळ वेळ नसे नाम संकीर्तनी । उच्च नीच योनी हेही नसे ।। आणिः कहां करू जाती कहां करू पाती । राजाराम सेउ दिन राती । अशा प्रकारे जातीपातीला विरोध करून वरील सर्व संतांच्या विचारांनी चार्तुवर्णासह स्त्रीसमानतेचा एक नवा वर्ण प्रस्थापित केला. यामुळे तत्कालिन समाज सुधारणा ख-या अर्थाने मानवतावादी विचार पुढे आला.

**संतसाहित्यातील वैज्ञानिक मूल्येः**

संतांनी सामाजिक मूल्यांमध्ये सगळयात महत्वाचे मांडलेले मूल्य म्हणजे वैज्ञानिकता होय. वैज्ञानिक मूल्यांमध्ये आधुनिक विज्ञानात माणूस म्हणजे काय, तो कशाचा बनलेला आहे वगैरे चे सुसंबध ज्ञान असेल पण म्हणून मानवी जिवनाचे सर्वोच्च ध्येय काय असावे, मानवी जिवनाचे हेतू काय त्याची उत्तरे यातून शोधता येत नाहीत. मनूश्य जीवनाचे अस्तित्व, कार्यशिलता, ध्येये आणि मूल्ये ही साध्य करण्यासाठी आजचे विज्ञान हे अपुरे असल्यामुळे त्याच्या समोर अनेक निसर्गातील गुढगोष्टी स्पष्ट झालेल्या नाहीत. मात्र संतांनी अनेक वैज्ञानिक गोष्टी या अगोदरच स्पष्ट केल्या आहेत. उदाहरणार्थः दिहाचिया दुपारी । चांदु जैसा अंबरी । तैं असणें चांदचिवरी । जाणावे की । अमृतानुभव प्रकरण 5 वे ओवी 45 याचा अर्थ अमावस्येच्या दिवशी चंद्र आकाशात दिसतो. हे ज्ञानेश्वरांनी मांडलेले वैज्ञानिक सत्य आहे. तसेच चंद्रादि सुसीतळें । घडलीं जयाचेनि मेळें । सूर्य जयाचेनि उजाळें । कडवसोनि । अमृतानुभव प्रकरण 2 रे ओवी 23 वी चंद्र हा चांदण्यांच्या मेळात राहाणारा म्हणजेच ग्रह आहे. तर सूर्य हा स्वयंप्रकाशित असल्यामुळे तारा आहे. हे विज्ञान येथे स्पष्ट होते. चांगदेव पासष्टी मध्ये परमाणूचिया मांदिया । पृथ्वीपणें न वचेचि वायां । तैंवी विश्वस्फूर्ति इया । झांकवेना जो ॥ चांगदेव पासष्टी, ओवी 6 वी पृथ्वी वरील सर्व घटक हे अणू आणि परमाणूंनीच व्याप्त आहेत असे म्हटलेले आहे. म्हणून संत एकनाथ महाराज म्हणतातः अणू रेणूसीही लोटांगण घालिता पूर्ण ब्रह्म प्राप्ती । या सारखी अनेक वैज्ञानिक स्पष्टता करणारी मूल्ये आपल्याला यातून पहायला मिळतात.

**संतसाहित्यातील राष्ट्रीय मूल्येः**

संतसाहित्या मध्ये मानवतावादाचे जसे वर्णन प्रत्येक ठिकाणी आपल्याला पहायला मिळते तसेच राष्ट्र आणि विश्वबंधुत्व ही राष्ट्रीय मूल्ये देखील अनेक ठिकाणी दिसतात. विश्व बंधूत्व हे मूल्य ज्ञानेश्वरांच्या प्रत्येक ओवी मध्ये दिसते. आपणचि विश्व जाहला । तरी भेदभावो सहजचि गेला । म्हणोनि द्वेषु ठेला । जया पुरूषा । ज्ञानेश्वरी भावार्थदीपिका अध्याय बारावा ओवी 191 तसेच संत नामदेव महाराज म्हणतातः नाचूं कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ॥ याच अर्थाने अवघे विश्वचि माझे घर मानून संतांनी नवमूल्यांचे शिक्षण सर्व सामाजाला दिलेले आहे. पण याची अनुभूती कोणाला येउ शकते तर संत तुकाराम महाराज म्हणतात त्या प्रमाणेः अज्ञानाची पूजा । कामिक भावना । तयाचिया ध्याना । देव कैचा ।। मानवी जिवनातील चिरंजन मूल्यांची नोंद घेतली तरच माणसाला देवाचा अनूभव येउ शकतो आणि तोच खरा मानवतावादी मनुष्य होय. अशा ख-या मानवाचे जीवन निस्सिम मूल्यांच्या आधारे श्रेष्ठ व्यक्तीमत्वा कडे वाटचाल करते. म्हणून प्रत्येक माणसाने संतांनी सांगितलेली मूल्ये आचरणात आणायला हवी. तर समाज, राष्ट्र ख-या अर्थाने उन्नती कडे वाटचाल करेल. हीच मूल्य शिकवण संतसाहित्यातून आपल्याला पहायला मिळते.

**निष्कर्षः**

समकालीन समाज व्यवस्थेत अनेक अडचणी आणि समस्या आहेत. या समस्यांचे मूळ मानव आहे. माणसाने आपले आचार, विचार, संस्कार जर निती, नियम, कायदा याला अनुसरून केले तरच खरी मानवतावादी समाज रचना उदयाला येईल. मग राज्य आणि राष्ट्र आपोआपच श्रेष्ठ ठरेल. यासाठी 450 वर्षा पुर्वीची संत वचने, अभंग, काव्य रचना माणसाचे डोळे उघडे करणारी आहे.

आजच्या माणसाला दररोज नव्या समस्यांना, अडचणींना तोंड द्यावे लागते. या समस्या मग वैयक्तिक असो किंवा सार्वजनिक, अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, अंधःश्रध्दा, अतिरेकीपणा इत्यादी. या सर्वा करिता आपण संत विचाराने वागलो तर या समस्याच राहाणार नाहीत याची ग्वाही संतसाहित्यातून मिळते.

संदर्भ ग्रंथ:

1. (Gupta N. L., Concept Publishing Company, New Delhi, Human Value in Education, First Edition, 2000.
2. डॉ. मुळावकर संतोष व सौ. मुळावकर कल्पना, श्री विद्या प्रकाशन, मूल्यशिक्षण सुसंवाद. प्रथम आवृती, पुणे - 2000
3. डॉ. क्षमा लिमये, विद्या विकास पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मूल्यशिक्षण पुस्तिका. नागपुर, 1998
4. डॉ. नातु गो. ना., सुकृत प्रकाशन, शोध अनंताचा - पुणे, 2016 दिनांक: 25.9.2021

e-Certificate

# RET ACADEMY FOR INTERNATIONAL JOURNALS OF MULTIDISCIPLINARY RESEARCH (RAIJMR)

Dear Author/Research Scholar,

डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत

This is to certify that your Research Paper/Article titled

"संतांचे मराठीतील वांङमय आणि आधुनिक विज्ञान"

has been published after reviewed and editorial process in our **Referred & Peer Reviewed** Print issue of IJRSML (ISSN: 2321-2853) (Impact Factor 6.156) International Refereed, Reviewed and Indexed Research **Print** Journal. **Vol.** 9, **Issue:** 3 for the Month of **March:** 2021.

Our best Wishes for your future.

**Place: Mehsana (Gujarat)**

**Date of Issue: 04/03/2021**

RET ACADEMY FOR INTERNATIONAL JOURNALS OF MULTIDISCIPLINARY RESEARCH RAIJMR.COM

**Associate Editor(s)**
**(RAIJMR)**

**Editor-in-Chief**
**(RAIJMR)**
**www.raijmr.com**
**ret@raijmr.com**

# संतांचे मराठीतील वांङ्.मय आणि आधुनिक विज्ञान

डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत
प्राचार्य,
विद्या प्रसारिणी सभेचे कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय
लोणावळा तालुका मावळ, जिल्हा पुणे (महाराष्ट्र राज्य)

## १.प्रस्तावना

संत वांङ्.मयातील विज्ञान हा विषय शोध निबंधा करितानिवडला आहे. या विषयात संत वांङ्.मयाचा बाराव्या शतका पासून सोळाव्या शतका पर्यतचा कालखंड अंतर्भूत केला आहे. आधुनिक विज्ञानाचा परिचय अधुनिक विज्ञान आणि संत वांङ्.मय यांचे परस्पर सहसंबंध उदाहरणासह स्पष्ट केले आहेत. देशात औद्योगिक क्रांती झाल्यानंतर आधुनिक विज्ञानाची एक नवीन लाट उदयाला आली. त्यामूळे जुने ते त्याज्य आणि नवे ते हवे हवे असे समाजमनात रूजु होऊ लागले. आज एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात एक नवीन जाणीव स्पष्टपणे दिसते आणि ती म्हणजे आज भौतिक प्रगतीचा वेग झपाटयाने वाढत आहे. विज्ञानाची प्रगती उत्तरोत्तर काळात वेगाने होणार आहे. परंतु या प्रगती बरोबरच संत वांङ्.मय आणि संतांची कामगिरी समाजातून विस्मृतीआड जात असल्यामूळे एकूण मानवी जीवन दयनीय, अगतिक होत चालले आहे. एकीकडे समृध्दीची शिखरे गाठली जात असतांना दुसरीकडे मानवी जीवनातील शांती समाधानाचा ऱ्हास होताना दिसतो. म्हणूनच सुखशांती, समाधान, आनंद मिळविणेसाठी संत तत्वांचा बोध आणि विज्ञानाचा शोध याची सांगड यामध्ये घातलेली आहे.

विज्ञान म्हणजे काय, विज्ञानाची परिभाषा, संतांनी मांडलेले विज्ञान, विश्वोत्पत्ती, जिवोत्पत्तीची संत आणि आधुनिक विज्ञानाची मांडणी सप्रमाण विवेचनासह यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**बीजशब्द :** संत वांङ्.मय, विज्ञान, आधुनिक विज्ञान, मराठी साहित्य, वैज्ञानिक क्रांती

## २.संत वांङ्.मयाचा कालखंड

संत वांङ्.मयातील विज्ञान या विषयावर लिहिताना पारंपारिक अथवा प्रचलित विचार न करता आधुनिक विज्ञान आणि संत वांङ्.मय यांचा विचार मी येथे केला आहे. संतांचे वांङ्.मय म्हणजे कवी मुकुंदराज ते संत तुकाराम महाराज यांचा कालखंड यात अंतर्भूत आहे. इसवी सन ११८८ मध्ये कवी मुकुंदराज यांनी 'विवेकसिंधु' व 'परमामृत' हे दोन महत्वपुर्ण ग्रंथ रचले. इसवी सन बाराव्या शतकात देवगिरी येथे यादवांची कारकिर्द सुरू झाली. यादव काळात मराठी भाषेला विशेष उत्तेजना मिळाली. त्यामूळे ज्ञानेश्वरादी संत कवींनी आणि महानुभावीय कवींनी गद्य पद्य वांङ्.मयीन लेखन प्रवाह सुरू केले. यात ज्ञानेश्वर समकालीन नामदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, जनाबाई, गोरा कुंभार, सावतामाळी, विसोबा खेचर, नरहरी सोनार, बंका महार, चोखामेळा, परिसा भागवत, राका. कुंभार, कान्होपात्रा, सेना न्हावी इत्यादी संतकवी होते. रामदेवराव जाधवांच्या कालखंडात हेमाडपंत हा फडणवीस होता. त्याने काही ग्रंथ मराठी भाषेत लिहिले.

यादवांच्या राजवटीत अल्लाउद्यीन खिलजीची स्वारी झाल्यामूळे इसवी सन १३१८ मध्ये देवगिरी चे राज्य बुडाले आणि पुढील काळात बादशाही सुरू झाली. नंतर दक्षिणेत बहामनी राजांचा उदय झाला. या काळात संत एकनाथ, दासोपंत आणि पुढे शिवशाही सोळाव्या शतकात संत रामदास, संत तुकाराम, कवी मुक्तेश्वर, केशवस्वामी, रंगनाथ स्वामी, श्रीधर स्वामी, कवी विठठल गलंड, कवी नागेश आणि अखेर पंडीती काव्याचा उदय झाला. संत काव्याची ही परंपरा म्हणजे सुमारे चारशे वर्षाच्या प्रदिर्घ कालखंडातील मराठी साहित्यातील महत्वपुर्ण वांङ्.मय निर्मिती असल्यामूळे याची ओळख, 'संत वांङ्.मय' म्हणून प्रचलित आहे.

संत वांड्.मयाचा कालखंड हा मराठीच्या इतिहासातील महत्वाचा टप्पा आहे. मराठी भाषा, संस्कृती आणि समाज जीवनाला वळण देणारा हा प्रमुख कालखंड असून संतपूर्व कालखंडात संस्कृत प्राकृत भाषांचा वापर सर्वत्र होत होता. लिखित भाषेचे स्वरूप किमान कार्यालयीन तरी संस्कृत व मोठी भाषेत होत होते. संतांनी मराठी भाषेला दोन्ही स्तरावर सन्मान प्राप्त करून दिला. संतांनी संस्कृत वांड्.मयाचा साज, प्राकृतचा डौल आणि देशी बोलीला लेखनाचे स्वरूप मराठीला प्राप्त करून दिले. महाराष्ट्राला ख-या अर्थाने त्यांनी उदयोन्मुख बनवले. संत वांड्.मय हे मराठी वांड्.मयाच्या इतिहासातून वजा केले तर प्रारंभीचा संस्कृत कालखंड आणि संतोत्तर पंडीती शाहीरी आणि थेट आंग्लभाषीक — अनुवादीत रूपांतरीत वांड्.मयाचा प्रभाव महाराष्ट्रा वर दिसतो. पण त्यात समाज संस्कृतीचे एकांगी दर्शन घडते. समृध्दता आणि वैचारिक प्रगल्भता फारच थोडी जाणवते. म्हणून संत वांड्.मयाचे विशेष महत्व आहे.

**३.संतांनी उल्लेख केलेले विज्ञान शब्द**

संत वांड्.मय हे चारशे वर्षा पूर्वीचे वांड्.मय असल्यामूळे या वांड्.मयात विज्ञान आहे का १ असा प्रश्न अनेकांना पडतो. त्याचे उत्तर दयायचे झाले तर निश्चितच 'होय' असेच येईल. त्याचे प्रमुख कारण म्हणजे संतांनी अनेक ठिकाणी विज्ञान हा शब्द वापरला असून, नुसता विज्ञान हा शब्द वापरून ते थांबले नाहीत, तर आधुनिक विज्ञानातील अनेक शब्द त्यांनी त्या काळात रूढ केले होते. उदाहरणार्थ अवकाश, तंत्रज्ञान, उर्जा, कंपने, विज, अणू, परमाणु, चिदाणु, अर्क, विमान, नाग (शिसे), जिवाणु, विषाणु, कृमी, ग्रहण, सौरमास, चांद्रमास इत्यादी.

संतांनी वापरलेला विज्ञान हा शब्द आज ज्या पध्दतीने रूढ झालेला आहे तशाच अर्थाने संतांनीही त्याचा उपयोग केलेला दिसतो. अनेक संदर्भामध्ये विज्ञान म्हणजे 'विशेष ज्ञान' असा अर्थ स्पष्टपणे मांडलेला आहे. संतांनी मांडलेल्या विज्ञान शब्दाच्या संज्ञा खालील प्रमाणे :

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये विज्ञानाची ओळख करून घेणेकरिता आधी ईश्वराचे यथार्थ ज्ञान करून घ्यावे लागेल असे म्हटले आहे. ईश्वराचे स्वरूप कळले तर विश्वाची बुध्दी, जाणीव तर्कानी ज्ञान करून घेता येईल. यालाच त्यांनी मूळ ज्ञान असे संबोधुन या सूक्ष्म ज्ञानाच्या पसा-याकरिता आपण जे समजाउन घ्यायचे ते म्हणजे विज्ञान, त्याची व्याख्या ते अशी मांडतात.

जाणीव जेथ न रिघे । विचार मागुता पाउली निघे । तर्क आयणी (बळ) नेघे । आंगी जयाच्या ।। अर्जुना, तया नाव ज्ञान । **येर प्रपंच हे विज्ञान** । तेथ सत्यबुध्दि ते अज्ञान । हेही जाण ।। (ज्ञानेश्वरी अध्याय ७ ओवी ५६)

अज्ञानाचा नाश करून प्रपंचाचा उध्दार करणारे ते विज्ञान असे ज्ञानेश्वरांनी या व्याख्येत म्हटले असून विज्ञान हे सत्याच्या जवळचे आहे आणि जाणिवेच्या पलिकडचे आहे. यालाच आधुनिक विज्ञानकर्ते विज्ञान हे 'अभ्युपगमनसिध्द' असे म्हणतात.

संत रामदासांनी विज्ञान शब्दाचा अर्थ दासबोधातील नवव्या दशकात गुणरूप दशकातील सातव्या समासात असा मांडला आहे,

विज्ञानासारिखें अज्ञान । आणी मुक्तासारिखे बंधन । निश्चयासारिखे अनुमान । मानुचि नये । (दासबोध दशक ९, समास ७, ओवी ४७)

यामध्ये ज्ञानी ज्ञानातुन मुक्त झाला तरी अज्ञानरूपी विज्ञानात तो गुंतलेलाच राहातो. यातुन सुटका करून घेणेसाठी ते बाराव्या विवेक वैराग्य नावातील दशकात तिस-या भक्ती निरूपण समासात असे म्हणतात.

विज्ञानी राहिले ज्ञान । ध्येये राहिले ध्यान । सकळ काही कार्यकारण पाहोत सांडिले । (२९)

बाहय भौतिक प्रपंच विज्ञानात माणूस अडखळला की त्याचा ज्ञानमार्ग खुंटतो. याकरिता समर्थांच्या शिष्या श्री वेणाबाई कृत पंचीकरण या काव्यामध्ये त्यांनी विज्ञानाची ओळख अगदी सोप्या शब्दात अशी करून दिली आहे.

अंतरात्मांश पिंडि जिवात्मा बोलिजें ।। तयाचा विचार ।। कारण शीव ।। तो चैतन्य आणि निरोधरूप ।। चैतन्यी ज्ञान ।। **निरोधिं विज्ञान ।।**

त्याच पुढे स्पष्टीकरण म्हणतात

तया आपणास ईश्वरी संज्ञा ।। तेणे स्वानुभावे ।। स्तब्ध निरोधिता निश्चळत्व घेउन ।। विज्ञानता पावली ।।

म्हणजेच चैतन्य ही ईश्वरीय शक्ती असून मूळमायेचा विस्तार म्हणजेच विज्ञान विस्तार होय. हाच विचार निवृत्तीनाथ महाराज आपल्या 'गाथापंचक' या ग्रंथातून असा मांडतात,

विश्वाचा चाळकु सूत्रधारी एकु ।। विज्ञान व्यापकु ज्ञानगम्य ।। १ ।। ते रूप साजिरे कृष्ण घनश्याम ।। योगीचा परम जणु ज्याचा ।। २ ।। शिवोशिवोत्तम नाम आत्माराम ।। जनवनसम गोष्टवेषे ।। ३ ।। निवृत्ती चाळक सर्वत्र व्यापक । आपस्ये एक सर्वत्र असे ।। ४ ।। (अभंग ११४)

विश्वाचा चालक एक असला तरी विश्व पसारा भूलवणारा श्रीकृष्ण रूपा प्रमाणे आहे. त्यामुळे विज्ञान हे व्यापक आणि ज्ञानगम्य आहे. पण ते दिसत नाही. कारण,

जेवी का घटमात्रास । सबाहय व्यापक आकाश । तेवी सकल प्रपंचास । चिदाभास व्यापक ।। ७७ ।। ऐसें जें कां शुध्द ज्ञान । ते ज्ञेय प्राप्तीचे कारण ।। ज्ञेय पावलिया ज्ञान । हारपे जाण वृत्तीसी ।। ७८ ।।

प्राणीमात्रात किंवा जिवातील जे चैतन्य किंव आत्मतत्व आहे तेच शुध्दज्ञान आहे. ते ज्या वृत्ती मध्ये विरून जाते त्या वृत्तीसह ज्ञेय लोपते असे म्हणतात. यालाच विज्ञान असे त्यांनी म्हटले आहे. ज्या प्रमाणे मीठ पाण्यात मिळसताच मीठाचे अस्तित्व राहात नाही. त्या प्रमाणे ज्ञेयप्राप्ती झाल्यानंतर अज्ञान राहात नाही. म्हणून ते 'विज्ञान' होते. याचे सोपे उदाहरण संत एकनाथ आपल्या चतुश्लोकी भागवताच्या सृष्टी पर्वात असे देतात.

सृष्टीची उत्पत्ती स्थिती शांति । ज्ञान विज्ञान अद्वयभक्ती । आपुले मत यथास्थिती । प्रजापती उपदेशिला ।। ५१ ।।

**४.यातच पुढे ते तप सामर्थ्याची ज्ञानाची व्याख्या अशी मांडतात**

विषयवासनेवीण । वृत्तींशी जें विवेक स्फुरण । त्या नाव बोलिजे ज्ञान । सत्य जाण स्वयंभु । चिद्रुपे वृत्तीचे स्फुरण । त्या नाव बोलिजे ज्ञान । तेचि स्वयें होई आपण । या नाव 'विज्ञान' विधायता ।

ज्यात 'मी' पणाची स्वसिध्दता आहे ते विज्ञान भावार्थ रामायणाच्या बालकांडा मध्ये आजच्या विज्ञाना प्रमाणे समांतर असणारी परिभाषा त्यांनी मांडली आहे. विज्ञान म्हणजे लौकीक ऐश्वर्य असे स्पष्टपणे खालील ओवीतुन व्यक्त होते.

जनक राजा पृथिवीचे ठायी । राज्य करोनि तो विदेही । ज्ञान विज्ञान त्यासी सर्वही । परीपुर्ण पाही पुर्णत्वे ।। ५१ ।।

वरील व्याख्यां प्रमाणेच अनेक संतांच्या वांङ्मया मध्ये विज्ञान हा शब्द आपल्याला पदोपदी वाचायला मिळतो. त्या विज्ञान शब्दाचा अर्थ लौकीक ज्ञान असाच सर्वत्र आहे. गुरूचरित्रातील २६ व्या अध्यायात देखील आपस्तंबी असे थोर । शाखा असे मनोहर । यज्ञादि कर्मे आचार । विज्ञान असे तयात ।। ६२ ।।

असे म्हटले असून समर्थ रामदासांनी देव अंतरात्मा सगुण । सगुणे पाविजे निर्गुण । निर्गुणज्ञाने विज्ञान । होत असे । (दशक १४ ओवी १३)

विज्ञाना सारिखे अज्ञान आहे. दिसते, भासते पण नष्ट होणारे आहे ते सर्व विज्ञान आधुनिक विज्ञानाची परिभाषा किंवा विज्ञान हा शब्द लॅटीन सायन्शिया (Scientia) शब्दा पासून सायन्स हा शब्द तयार झाला असून याचा मूळअर्थ देखील ज्ञान असा असून त्याची व्याख्या Science is a system base body of knowledge म्हणजेच ज्ञानाची सुत्रपणे केलेली मांडणी म्हणजे विज्ञान असे म्हटले जाते. वरील विज्ञानाची परिभाषा आणि संतांचे दाखले समान असून विज्ञानातील काही शोध हे आधुनिक वाटत असले तरी त्याचेही अनेक उल्लेख संत वांङ्.मयात आपल्याला पहायला मिळतात.

थोडक्यात विज्ञान म्हणजे ज्ञानाची व्याप्ती जिथे ज्ञान संपते ते विज्ञान. विज्ञान हे 'विश्वव्यापक' असूनही न दिसता विश्वातील पसारा तर वाढत चालला आहे. विज्ञानाची विधायकता म्हणजे जणू काही राज्य सूरळीतपणे चालले आहे पण प्रत्येक गावात — घरात राजा काही जात नसतो. तो विदेही राहतो. हेच विज्ञान होय.

**५.संत वांङ्.मयातील विज्ञानाचे स्वरूप आणि संकल्पना**

देशाला ईस्ट इंडिया कंपनीने आधुनिक वैज्ञानिक परंपरेची ओळख करून दिली. १९४२ मध्ये दिल्लीत सि. एस. आय. आर. ची स्थापना झाली. १९५० मध्ये प्रथम राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेची उभारणी पुण्या मध्ये झाली. तेव्हा पासून देशात वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांती वाढत होती. पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री आणि इंदिरा गांधींच्या कालखंडात परमाणु उर्जा, कृषी, चिकित्सा, इलेक्ट्रॉनिक्स, दुरसंचार, अंतरिक्ष, परिवहन आणि संरक्षण इत्यादी क्षेत्रांमध्ये मोठे बदल झाले. या बदलांमूळे विज्ञान तळागाळात पोहोचले. सन १९७० मध्ये भारतात इलेक्ट्रॉनिक्स विभागाची स्थापना झाली आणि देशात पेजर, संगणक, मोबाईल, इंटरनेट, सेल्युलर इत्यादी वैज्ञानिक उपकरणांचा सर्वत्र वापर होऊ लागला. वैज्ञानिक विचार धारेतील विज्ञानाच्या चार प्रमुख शाखा जगभरात प्रसिध्द होत्या. त्या म्हणजे (१) जिव विज्ञान, (२) खगोल विज्ञान, (३) गणित विज्ञान (४) भौतिक आणि रासायनीक विज्ञान. याच्या शाखा, उपशाखांचे विविध विषयांवर लेखन, संशोधन झाले. नवीन शोधांनी मानवी जिवनात आमुलाग्र बदल घडविले. याचा परिणाम साहित्यावर स्पष्टपणे झालेला दिसतो.

वैज्ञानिक साहित्या बददलचा मराठी साहित्यातील संशोधनाचा शुभारंभ स्थूलमनाने जावडेकरांपासून झाला असे म्हणता येईल. १९८३ मध्ये मुंबई विद्यापीठातून त्यांनी 'आधुनिक मराठी वांङ्.मयाचा विज्ञान विषयक साहित्याचा चिकित्सक अभ्यास अर्थात महाराष्ट्रातील वैज्ञानिक क्रांती', या विषयावर स्वतंत्रपणे प्रबंध लिहिला. या प्रबंधामध्ये त्यांनी आधुनिक विज्ञानाचा परामर्श आणि वांङ्.मयाचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. यामध्ये संत वांङ्.मयाचा उल्लेख नसला तरीही अध्यात्म्य आणि विज्ञान या बददलचे विचार पहायला मिळतात. या नंतर डॉ. वि. एच. दाते, श्री तात्यासाहेब केळकर, संत साहित्य आणि सामाजिक विचार हे गं. बा. सरदार यांचे लेखन प्रसिध्द झाले. वि. रा. करंदीकर, टि. जी. जोशी यांनी सोशल अॅन्ड पॉलीटिकल थॉट ऑफ रामदास या विषयावर केलेले लेखन, तर डॉ. मेघनाद साहा यांनी संत साहित्यातील मानसशास्त्र यावर केलेले लेखन उल्लेखनीय मानावे लागते. या सगळयांना प्रमाणभूत असणारे डॉ. रा. द. रानडे यांनी संत हे अध्यात्म्यवादी म्हणून प्रसिध्द असले तरी त्यांचे साक्षात्कार हे विज्ञानाच्या कसोटी वर सिध्द झालेले पहायला मिळतील. असे प्रतिपादन केले. त्यांच्या मते, ''मानवी स्वसंवित हेच विश्वातील सारभुत तत्व आहे. अंतिम सत्य तत्व आहे. असे तत्वज्ञानी सांगत आले आहेत. बर्कले पासून सर्व विज्ञानवादी तत्वज्ञान्यांनी स्वसंवित हेच विश्वाचे केंद्र किंवा नाभी होय असे मानले आहे. गीतेने स्वसंवित देऊन तिच्या ऐवजी ईश्वरी स्वसंवित या तत्वाची परतत्व म्हणून स्थापना केली.'' याचाच अर्थ संतांनी मानवी जीवनात शांती, आनंद निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. ही शांती सिध्द करण्यासाठी साधन आणि सोपानांचा अवलंब केला. याचेच वर्णन श्री प्रभाकर पाध्ये यांनी आपल्या सौंदर्यानुभव या ग्रंथात केलेला आहे. ते म्हणतात ''संज्ञा हा उर्जेचा अवतार आहे, सारे विश्वच उर्जेचा विलास आहे. आपण ज्याला जड द्रव्य (मॅटर) म्हणतो तीही उर्जाच आहे. जीव हा देखील उर्जाच आहे.''

या ग्रंथां प्रमाणेच संत साहित्यातील विज्ञानां मधील शोध घेणारे अनेक ग्रंथ मराठी साहित्यात निर्माण झाले आहेत. प्रकाशाची अक्षरे हा चांगदेव पासष्टी आणि नव विज्ञान हा प्रभाकर अडसुळे, व. दि. कुलकर्णी यांचा प्रमुख ग्रंथ आहे. या ग्रंथात ज्ञानेश्वरांच्या चांगदेव पासष्टीचे आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीकोनातुन विवेचन केले आहे. चांगदेव पासष्टी म्हणजे पुंज सिध्दांता नंतरचे जे शास्त्र आहे त्याच्या जवळ जाणारा हा ग्रंथ आहे. आधुनिक विज्ञान उलगडुन दाखवणारा हा एक मौलिक ग्रंथ आहे. या ग्रंथाप्रमाणे ज्ञानेश्वर आणि विज्ञान, तुकाराम आणि सामाजिक विज्ञान, संत आणि वैज्ञानिक सिध्दांत, संतांचे तत्वज्ञान आणि विज्ञान असे विविध विषया वरील ग्रंथ पहायला मिळतात. ग. वि. तुळपुळे यांनी संत साहित्यातील ईश्वरी साक्षात्काराचे व त्यांच्या साधन मार्गाचे मानसशास्त्रीय दृष्टया चिकित्सक विश्लेषण केलेले आहे. डॉ. विद्यासागर पंडीत यांनी आधुनिक काळा प्रमाणे, 'ओवी गाऊ विज्ञानाची' या ग्रंथातून विज्ञाना वरच्या ओव्या लिहिलेल्या आहेत. असाच प्रयत्न वा. दा. गाऊगीळ यांनीही या पुर्वीही केलेला असून त्यामध्ये विज्ञानाधिष्ठीत बुध्दीवादाचा पुरस्कार करण्याचा त्यांचा हेतू दिसून येतो. विज्ञान आणि आध्यात्म या विषयावर आणि संतांनी लिहिलेल्या ग्रंथातील वैज्ञानिक दृष्टीकोन अनेक लेखकांनी सविस्तरपणे मांडलेले आहेत. त्यातील प्रमुख संत आणि विज्ञानाचे परस्पर संबंध उलगडुन दाखविणारे दाखले पहायला मिळतात.

**६.संत वांङ्‌मयातील विश्व आणि जीव निर्मितीचे विज्ञान**

सृष्टीच्या निर्मितीचा विचार हा दोन पध्दतीने येथे आपल्याला पाहाता येतो. एक म्हणजे संत साहित्यात असलेल्या पारंपारिक तत्वज्ञानाच्या आधारा वर मांडलेली उपपत्ती आणि आधुनिक विज्ञानाच्या आधारे विश्व निर्मितीचे मांडलेले महास्फोट सिध्दांत (Big Bang Theory) आणि जिव निर्मितीचा उत्परिवर्तन सिध्दांत होय. यातील विश्वोत्पत्तीचा सिध्दांत हा सर्वश्रुत आहे. या सिध्दांतात प्रोटॉन आणि ॲन्टी प्रोटॉन यांच्या द्वारे महाप्रचंड वस्तुमान तयार झाले. त्यांच्या पासून क्वॉर्क्स आणि ॲन्टी क्वॉर्क्स बनले. प्रोटॉन्स मधील मूळच्या सुप्त शक्तीमूळे प्रोटॉन व ॲन्टी प्रोटॉन यांच्या हलक्या वस्तुमानाच्या दो—या तयार झाल्या. त्यातुन इलेक्ट्रॉन्स आणि पोझिट्रॉन्स तयार झाले. प्रोटॉन्स, इलेक्ट्रॉन्स यांच्यात प्रक्रिया होऊन न्युट्रॉन्स बनले. त्यातुन फोटॉन्स इलेक्ट्रॉन्स यांनी पोकळी भरून काढली. त्या प्रक्रियेतुन न्युक्लीय म्हणजेच अणू तयार झाले. त्यांची नावे डेटेरियम, हेलियम, बेरेलियम, लिथियम इत्यादी आहेत. यातील हायड्रोजन व हेलियम पासून ढग तयार झाले. ढगांना जोरात गती प्राप्ती होऊन ते अवकाशात फिरू लागले. त्यालाच आज दिर्घिका असे म्हणतात. त्या दिर्घिका म्हणजेच आकाशगंगा (Galaxy) होत. यातुन पुढे अनेक ग्रह तयार झाले. हाच महास्फोट सिध्दांत होय. अणूपासून विश्वाची निर्मिती झाली सांगणारा हा प्रमुख वैज्ञानिक सिध्दांत असला तरी अगदी असेच वर्णन विश्वोत्पत्तीचा क्रम सांगणारे समर्थ रामदास दासबोधा मध्ये अशा प्रकारे करतात.

आकाशापासून वायो होतो । हा तो प्रत्यये येतो । वायोपासून अग्नि जो तो । सावध ऐका ।। वायोची कठीण घिसणी । तेथे निर्माण जाला वन्ही । मंद वायो सीतळ पाणी । तेथुनि जाले ।। आपापासून जाली पृथ्वी । ते नाना बीजरूप जाणावी । बीजापासून उत्पत्ति व्हावी । हा स्वभावचि आहे ।। (दासबोध दशक ११, समास १ ओवी १ ते ३)

यामध्ये वायु पासून अग्नी निर्माण झाला. पण तो वायु किती जोरात होता तर दहयात रवी घूसळावी अशी कठीण घसणी होते असा उल्लेख करतात. त्यातूनच कर्दम अग्नी आणि त्यातुन पुढे पाणी, पाण्या पासून पुढे पृथ्वीची उत्पत्ती झाली. असे यामध्ये समर्थ रामदासांनी म्हटले आहे. ही रचना महास्फोटाच्या वरील क्रमाप्रमाणेच आहे. अशीच रचना संत एकनाथांनीही आपल्या कपिल गीतेतील एकोणीसाव्या श्लोकात मांडली आहे,

माया ब्रम्हीची शक्ति जाण । तेही ब्रम्हेसी असे अभिन्न । वेगळी नव्हे अर्थक्षण ।। सदा सुलीन ब्रम्हेसी । जेवी शुरांची शौयशक्ती पुर्ण । शुराहुन नव्हे भिन्न ।। तेवी ब्रम्ही मायाशक्ति जाण । असे सुलीन सर्वदा । माया ब्रम्ही असता जाण । शोभेविण नव्हे सर्जन । मायाक्षोभक काळ पुर्ण । काळास्तव जन जन्मती ।।
(एकनाथी भागवत, अध्याय २४, ओवी ४८०)

वरील एकनाथी भागवतातील वर्णना प्रमाणे संत तुकारामाच्या अभंग गाथेतील सृष्टी उत्पत्तीच्या विकासा बाबत माया शक्ती ही अव्यक्त विश्व व्यक्त रूपास येते. ही सत्व, रज, तम अशा त्रिगुणात्मक अवस्थेत

असल्यामूळे विश्व अव्यक्त स्थितीत असते असे म्हटले आहे. ईश्वर माया शक्ती मध्ये स्पंदने निर्माण करतो आणि या तीन गुणातील समता ढळते. त्यामूळे जगातील सजीव सृष्टी काळा बरोबर विकसीत होत जाते. यालाच, 'काळे खोदला हा अवघा आकार । उत्पत्ति संहार घडामोडी ।।' (तुकाराम गाथा, अभंग ५४१) जगाची निर्मिती आणि संहार या घडामोडीत जगास आलेला आकार काळ अखंड खात असतो. हा आधुनिक त्रिमितीय विश्वाचा सिध्दांत संत तुकारामांनी मांडलेला आहे.

कवी श्रीधर यांनी विश्व निर्मितीचा हा सिध्दांत आपल्या अधिक सोप्या ओव्यांमधून मांडलेला आहे,

जै पंचभुते नव्हती समग्र । शशिमित्र नव्हते तै । नव्हता मायामय विकार । केवळ ब्रम्हमय साचार ।। तेथे झाले स्फुरण जागर । अहं ब्रम्ह म्हणोनिया ।। ते ध्वनि माया सत्य । तेथोनि झाले महतत्व ।। मग त्रिविध अहंकार होत । शिवइच्छेकरूनिया ।।

जेव्हा विश्वात पंचमहाभुतेही नव्हती तेव्हा ब्रम्हाला स्फुरण पावले. शिवाच्या इच्छेने विश्वाची निर्मिती झाली. वरील संत आणि विज्ञानातील वर्णनातील प्रमुख साम्य म्हणजे इलेक्ट्रॉन, प्रोट्रॉन, न्युट्रॉन हे विज्ञानातील तीन घटक आणि संतांनी मांडलेले ब्रहम, माया, शक्ती किंवा त्रिविध अहंकार हा तिनांचा मेळ आहे

विश्वोत्पत्तीचे हे संतांचे आणि आधुनिक विज्ञानाचे सिध्दांत ज्या प्रमाणे मांडलेले आहेत त्याच प्रमाणे विश्व निर्मिती नंतर जीव निर्मिती कशी घडली याचेही अनेक सिध्दांत संत वांङ.मयात मांडलेले पहायला मिळतात. जीव सृष्टीचा आरंभ हा आधुनिक विज्ञाना प्रमाणे डि. एन. ए. पासून झालेला आहे. यालाच संत वांङ.मय 'हिरण्यगर्भ' असे आहे. या पासून पिंड देह तयार होतो. या सर्वाची उपपत्ती विविध सिध्दांतातुन आपल्याला पहायला मिळते.

विश्वात पृथ्वीची निर्मिती झाली असली तरी त्या क्षणाला जीवाची उत्पत्ती घडली नव्हती. जीवाच्या उत्पत्तीला पाण्याची गरज आहे. म्हणूनच पृथ्वीवर जीवसृष्टी आहे असे म्हणता येते. समर्थ रामदासांनी दासबोधा मध्ये :

त्या निरा मध्ये जीव असती । पाहो जाता असंख्याती । त्या विशाल जीवांची स्थिती । कोण जाणे ।। जेथे जीवन तेथ जीव। हा उत्पत्तिचा स्वभाव । पाहता याचा अभिप्राय । उदंड असे ।। पृथ्वी गर्भी नानानीरे । त्या नीरामध्ये शरीरे । नाना जिनस लहान थोरे । कोण जाणे ।। (दासबोध दशक १६, समास ८ ओवी १६ ते १८)

आधुनिक विज्ञाना प्रमाणे प्रोट्रॉन, न्युट्रॉन आणि इलेक्ट्रॉन यांच्या अणूच्या संयोगाने मुलद्रव्य निर्माण झाली. त्यावर विद्युत परमाणुंचा संयोग होऊन धातु व अधातु तयार झाले. यातूनच निरिंद्रिय रसायने तयार झाली. त्या रसायनां वर नैसर्गिक क्रिया होऊन सेंद्रिय रसायने तयार झाली. ही रसायने म्हणजे सजीव निर्मितीचे मूळघटक मानले जातात. जीवाला आवश्यक असणारी जीवन द्रव्ये यातूनच आरंभी तयार झाली असावी असे वैज्ञानिकांचे मत आहे. त्यामूळे जीव निर्मितीच्या मूळे मुलद्रव्यां मध्ये कार्बन, हायड्रोजन, ऑक्सीजन, नायट्रोजन आणि फॉस्फरस ही प्रमुख मुलद्रव्य मानली जातात. या मुलद्रव्यांच्या अणूपासून सजीवाची निर्मिती झाली असे मत आहे. जीवोत्पत्तीच्या सिध्दांता नुसार अमिबा पासून मानवा पर्यतची उत्क्रांती ही एक पेशीय प्राण्यां पासून बहु पेशीय प्राण्यांपर्यत जीवोत्पत्ती झाली असे म्हटले जाते. परंतु हे घडत असतांना त्या पेशी मध्ये असणा—या जनूकावर होणारे परिणाम हेच मानवी उत्क्रांतीला कारणीभूत आहेत असे सिध्द झाले आहे. मानवी जनूक हे पुढील पिढी मध्ये आपल्याकडे साठवलेले ज्ञान संक्रमीत करीत असतात. परंतु त्यातील काही ज्ञान नष्ट किंवा लुप्त होते तर काही ज्ञान त्यापुढील पिढीत प्रकट होते. सजीवांच्या जनूकां वर होणा—या निसर्गातील क्ष किरण, अतिनिल किरण, रासायनिक द्रव्ये किंवा उष्णता याचा होणारा परिणाम होय. यालाच विज्ञानात काळ, अवकाश, परिमितीच्या प्रभावामुळे विविध जीवजाती जन्माला येतात असे म्हटले जाते. जनूकातील घडणा—या या बदलांना उत्परिवर्तन असे म्हणतात. उत्परिवर्तनाच्या सिध्दांतामूळे सजीवाच्या उत्क्रांतीचा सिध्दांत मागे पडला आणि आधुनिक जैविक क्रांती घडून आली.

थोडक्यात अनेक पेशीं पासून बनलेला जीव हा पेशी केंद्रकात असलेल्या गुणसुत्रामूळे तयार होतो असे सिध्द झाले आहे. गुणसुत्रे ही प्रथिनांनी बनतात. प्रथिनांचा मुलाधार हा डि. एन. ए. आहे. थोडक्यात मानवी देह हा मुलद्रव्ये डि. एन. ए. — जिन्स — प्रथिने — गुणसुत्रे — पेशी — असंख्य पेशी — सजीव या क्रमाने तयार होत असतो.

सजीवाचा मूळ गाभा हा डि. एन. ए. आहे. डि. एन. ए. चे वर्णन विज्ञानात अतिशय सूक्ष्म, उबदार, उष्णता वर्धित करणारा, चंचल, पेशींचा निर्माता, दोन मण्यांच्या माळेला पिळ दिल्या नंतर दिसणारा वाटोळया आकाराचा सुत्रात्मा असे म्हटले आहे. याचेच प्राचीन ग्रंथात उल्लेख हिरण्यगर्भ म्हणून केला जातो. हिरण्य गर्भाचे वर्णन मराठी वांङ्.मयातील कवी मुकुंदराज यांनी विवेकसिंधु असे केले आहे.

हिरण्यगर्भ देह प्रभूचे लिंग देह । आणि सकल जीवसमूळ । अंशभेद जाणावे निःसंदेह । येकरूप । जैसे लोहाग्नीचे विस्फुल्लिंग । लोहो पीटिता उठती अनेक । ना ना ते गंगेचे तरंग । न होती गंगातीत । तैसे हिरण्य गर्भाचे अंश । प्रसिध्द जीवकोश । आत्मा पावे गर्भवास । संगे जयाचेची । (विवेकसिंधु उत्तरार्ध. प्रकरण ९, ओवी क्रमांक ११ व १२)

या वर्णना मध्ये हिरण्यगर्भ अग्नीच्या ठिणग्यांप्रमाणे दिसत असून तो प्रकाशमय आहे असे वर्णन केले आहे. विज्ञानात दोन माळांना पिळ घातल्यावर तो जसा दिसतो असे म्हटले आहे त्याच प्रमाणे मुकुंदराजांनी माळेला आडव्या स्वरूपात धरल्यावर दिसणा—या रूपाला गंगेच्या तरंगां प्रमाणे म्हटले आहे. याला प्रसिध्द जीवकोश असे म्हटले आहे. जो गर्भवासातून तयार होतो. येथे केवळ जीव शब्द वापरला नाही तर जीवाचा कोश असा शब्द जोडला आहे. डि. एन. ए. मधून विज्ञाना नूसार जेनेटिक ब्ल्यू प्रिंट मिळतात. जेनेटिक ब्ल्यू प्रिंट द्वारा शरिराचा पूर्ण आराखडा मिळतो म्हणून याचा उल्लेख मुकुंदराज असा करतात,

लिंगदेहाचा अभिमान तेजसु । तो तरी विष्णूचा अंशु । तेयांसी येक्य हा भर्वसा जाणिवेसु । कार्यकारणन्याये ।। (विवेकसिंधु, उत्तरार्ध, प्रकरण ९, ओवी १४)

वरील ओव्यांचा सरळार्थ सहज समजणारा असून पेशी समूळा पासून जीव बनतो आणि हे जीव म्हणजे भुमी वरील प्रथम असल्यामूळे यांना प्रभूचा लिंग देह असे वर्णन केले आहे. यातूनच विश्व पुढे निर्माण होत जाते. त्यामूळे डि. एन. ए. चे वर्णन हे आधुनिक विज्ञानाशी केवळ तंतोतंत जुळणारे नसुन ते प्रत्यक्ष आधुनिक जैवतंत्रज्ञानाचे सिध्दांत सांगणारे आहे. या प्रमुख सिध्दांतां प्रमाणे अनेक वैज्ञानिक पुरावेही सप्रमाण पहायला मिळतात.

**७.संत वांङ्.मयातील वैज्ञानिक उल्लेखाच्या ओव्या**

संतांनी विज्ञानातील विविध दाखले आपल्या अनेक ओव्यातुन अगदी सहजपणे मांडलेले आपल्याला पहायला मिळतात. संत ज्ञानेश्वरांनी ''शुक्र — शोणितांचा सांधा, मिळता पाचांचा बांधा, वायुतत्व दशधा, एकचि झाले'' यातील शुक्र शोणित हे स्त्री — पुरूषांतील बिजांडात असतात याचा उल्लेख आढळतो. पेशींचा उल्लेख केलेला आहे. ''पृथ्वीये परमाणुंचा उगाणा घ्यावा, तरी हा भुगोलचि काखे सुवावा, तैसा विस्तारू माझा पाहावा, तरी जाणावे माते'' यातील भुगोल हा शब्द ज्ञानेश्वरीतुन आपल्याला पहायला मिळतो. समर्थ रामदासांचे गणित शास्त्रा वरील ज्ञान हे अतिशय वाखणण्या सारखे आहे. त्यांनी दासबोधात ''च्यारी सहस्त्र सातसें साठी । इतुकी कलयुगाची रहाटी । उरल्या कलयुगाची गोष्टी । ऐसी असे ।। ७ ।।, च्यारि लक्ष सत्ताविक सहस्त्र । दोनिसे चाळीस संवछर ।'' यातील पहिल्या चार शब्दांतील संख्या चार अधिक सात अधिक सात अशी होते. पुढील तीन ओवी मध्ये ४,७६० वर्षे ही कलियुगाची कालगणना आहे. परंतु याचाच दुसरा अर्थ म्हणजे चौथ्या समासात सातवी ओळ आणि सहावे दशक असाही एक अर्थ त्यामध्ये त्यांनी मांडलेला आहे. अशीच रचना त्यांच्या मनाच्या श्लोका मध्ये दिसून येते. मनाच्या श्लोकातील सहावा श्लोक हा ''नको रे मना क्रोध हा खेदकारी ।'' असा वर्णन केलेला आहे. यातील क्रोध हा शब्द भारतीय परंपरे नुसार षडरिपुं वर नियमन करणारा असल्यामूळे श्लोकाचा क्रमांक सहावा दिलेला आहे. म्हणजे आधीच्या तीन, चार, पाच श्लोकांत जे दुर्गुण त्यांनी मांडले आहेत ते ज्याला टाळता येतील त्याला या सहाव्या श्लोकाचा ख—या अर्थाने उपयोग होतो. म्हणून याचा क्रमही सहाच आहे. षडरिपुंचा दर्शक श्लोक

आहे. यात समर्थांनी मांडलेले गणित शास्त्र वाखणण्या सारखेच आहे. आधुनिक मानस शास्त्रात १९५० पासुन उदयाला आलेले आहे. पण समर्थांनी केलेली मन चिकित्सा ३५० वर्षा पुर्वीची आहे. त्यांनीच रचलेले मारूती स्तोत्र या मधील विज्ञान म्हणजे यातील महत्व शक्ती ही, 'आणो पासोन ब्रम्हांडा एव्हडा होत जात असे', तर 'भेदिले शून्यमंडळा' म्हणजे पृथ्वीच्या कक्षे बाहेर शून्य मंडळात भेदून जाणारी उर्जा शक्ती ही मरूत शक्ती आहे. याच प्रमाणे संत तुकाराम यांनी मांडलेल्या अभंगातही वैज्ञानिक वर्णन पहायला मिळते. दुध, दही, ताक, पशूंचे पालन, त्यामध्ये कारण घृतसार हा पूरक व्यवसाय त्यांनी त्या काळी दर्शविला होता. म्हाइंभट यांनी आपल्या लीळाचरित्रात कृष्ठरोगावर अमरी वनस्पती 'तेणे प्रतिबांधैल: परि: अधिक नव्हे' हे प्रतिजैविक (अँन्टीसेप्टीक) सांगितले आहे. सेना न्हावी यांनी, 'तरी न मिळे त्यासी । करिता धुम्रपान । न भेटे नारायण' असे सांगितले व तुकारामांच्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या ओवीतून इको फ्रेंडली वातावरणाचे धडे देण्यात आले आहेत. कवी व्यंकट यांनी, 'कतकनाममात्रे जलशूध्दी न यास्तव' म्हणून निर्मळीच्या बियांनी पाणी शूध्द करण्याचे तंत्र सांगितले आहे.

सारांश : विज्ञान नक्की कधी पासून अवतरले म्हणायचे तर मराठयांचा पराभव करून शनिवार वाडया वर पहिला ध्वज फडकविणारा ब्रिटिश साम्राज्या पासून ही तोफांची औद्योगिक क्रांती झाली आणि नवी चाके विदेशात सफर करू लागली. तेव्हा देशात घडयाळे, कारखाने आले तेव्हा पासून वैज्ञानिक क्रांती झाली असे म्हणायचे.

देशाला काळया अंधारात फिरंग्यांनी आपला ध्वज उतरवुन देउ केलेल्या स्वराज्या पासूनचा वैज्ञानिक उष:काल मानायचा का १ का अगदी काल परवा संगणकाने भारतात पावले ठेवली अणि नंतर आपण अणू चाचणी ही स्वत:च्या बळावर घेउन जगाला विज्ञान यादीतील स्वातंत्र्याचे नगारे पिटले तेव्हा पासून युग अवतरले म्हणायचे का १ एकूण अनेक टप्प्यांवर आपण विज्ञान युगाचे पुरस्कार केलेले आहेत, करतो आहोत हे अगदी उत्तमच आहे आणि अपरिहार्यपण आहे. पण त्याच प्रमाणे या ही गोष्टीचा विचार करायला लागेल की शेतक—यांच्या भाजीच्या देठाला हात लाउन न देणारी राजसत्ता आजच्या युगात श्रेठत्वाचे झुकते माप का देत आहे. विज्ञानाचे फोलपण तर ते ठरवत नाही ना. मानवी संसाधने, भौतिक साधने, मानवी जीवना समोर हात जोडुन उभी असतांना सामाजिक क्रांतीची भयाची चिंतेची वाढ विज्ञानाने केली आहे का. मी पणा इतका मोठा होतो आहे की, व्यभिचाराला पितृत्वाचा शाप सुध्दा डागाळतो आहे. माणूस मोठा होऊन मानवी मुल्यांचा —हास झपाटयाने होत आहे. शेवटी षडरिपुंच्या चिंधडया उडवुन माणूस हैवानत्वा कडे भराभर पाउले टाकत आहे का. समाज, नातेसंबंध संस्कृतीचा पायपोस न ठेवता अक्राळ विक्राळ विमनस्क कृतीतील मानवी जीवनाचा धावता आदेश या विज्ञानाचे फलित होणार असेल तर तत्वज्ञानातील संत परंपरा तेव्हाही श्रेष्ठ मानावी लागेल. संत परंपरेतील कपोलकल्पीत भ्रामक कल्पना या मनाला उभारी देऊन जीवनाच्या वाटेला वळण देण्याइतपत त्या समर्थ होत्या. म्हणूनच माणूसकीला काळीमा फासुन अणवस्त्रापासून विश्व नष्ट करू पाहाणारा महाराक्षस त्यातुन कदापीही जन्म घेणारा नव्हता. उलट विचारांच्या भक्कम पायावर स्वत्वाचा अभिमानी माणूस ख—या अर्थाने उभा राहिला होता. आजच्या आंधळया ई भक्ती वर आणि नेट — शी भक्ती वर स्त्री शक्तीची चाळण आणि विदुषकीकरण करत नव्हता. अशा परिस्थितीत सत्याचा स्विकार करून आत्मोध्दाराचा मार्ग आज तरी माणसाने स्विकारावा. अन्यथा एक वेळ मानवाला विश्व नाशाला सामोरे जायला वेळ लागणार नाही. दुस—या महायुध्दात जपान, जर्मनी हे देश बेचिराख झाले. त्यांचे सर्व वैभव जमिनदोस्त झाले. त्यांच्या भु प्रदेशाची तुलना करता आपल्या राज्याचा विस्तार सुध्दा थोडा अधिक आहे. पण त्या देशांचे उत्तमोत्तम पुनरूत्थान झालेले आहे. या मागील खरेगम्य केवळ औद्योगिकरण, उद्योगशिलता हे नसुन प्रत्येक व्यक्तीतील लोकमानसात राष्ट्रीयत्वाची नव्या उभारणीची मनात असणारी चैतन्य शक्ती होय. महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात अनेक वैज्ञानिक संस्था, संशोधन संस्था, कारखाने जोमाने सुरू झाले. पण काहीवर्षातच शहरांनी बकाल किळसवाणे रूप धारण केलेले आहे. याची कारणे वैज्ञानिक सत्यातुन मिळणार आहेत का १ नितीतत्व विचार आचारांचे पथदर्शन संतांनी घडविले. त्या मार्गाने समाजाने वाटचाल केली असती तर आज मागे वळण्याची खितपत पडण्याची आणि आर्थिक कमतरतेमूळे गरीबी, दारिद्रय, चिंता आणि भयाचे वातावरण दिसले नसते. अखेर समृध्दी ही केवळ दिखाउ उत्पादना वर लौकीक वस्तुंवर आणि भौतिक सुखातुन दिसून चालणार नाही. तर माणसाच्या माणूसकी, सज्जनता आणि कष्टाळुपणातुनच दिसून येते. या करिता संत विचारांची कास धरून राष्ट्राची उभारी करणे गरजेची आहे. तरच खरे वैज्ञानिक क्रांती युग अवतरेल हे निश्चित.

Vol. 9, Issue: 3, March: 2021
(IJRSML) ISSN: 2321 - 2853

## संदर्भ ग्रंथ

१ जावडेकर मुरलीधर मनोहर, महाराष्ट्रातील वैज्ञानिक क्रांती, प्रकाश जावडेकर, प्रकाशक सिंधुदुर्ग – मालवण, मे, १९९२
२ मोने मोरेश्वर सखाराम, मराठी साहित्य व व्याकरण, चित्रशाळा प्रकाशन, आवृत्ती दहावी, १९५०
३ बावकर रमेश (लेखक), परब्रम्ह ज्ञान विज्ञान संहिता, प्रका. बावकर, पुणे, प्रथम आवृत्ती माहे जुन, २००१
४ वर्तक प. वि. (लेखक), वास्तव रामायण, वर्तक प्रकाशन, पुणे, आवृत्ती पाचवी, २००२
५ बेलसरे के. वि. (संपादक व अनुवादक), श्री समर्थ रामदास स्वामी विरचित सार्थ दासबोध, प्राचार्य दांडेकर, धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रसारक वांङ.मय प्रकाशन मंडळ, पुणे – ३०, पुण्यशताब्दी आवृत्ती, १९८१ – १९८२
६ साखरे नाना महाराज (संपादक), का. अ. जोशी, भाषांतरकार बापट, सार्थ श्री एकनाथी भागवत, श्री संत वांङ.मय प्रकाशन मंदिर पुणे, आवृत्ती दुसरी, १९६६
७ अडसुळे प्रभाकर, व व. दि. कुलकर्णी, प्रकाशाची अक्षरे, मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००२
८ काळे कल्याण, डॉ. रा. शं. नगरकर (संपादक), संत साहित्य अभ्यासाच्या काही दिशा, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथम आवृत्ती, जुन, १९९२, पुणे
९ जोशी प्र. न., विज्ञान उदय आणि विकास, सन पब्लिकेशन, आवृत्ती तिसरी, १९७९
१० बेणारे गोपाळराव (संपादक), सार्थ ज्ञानेश्वरी सरस्वती ग्रंथ भांडार, पुर्नमुद्रण, २००४
११ दैनिक प्रहार, 'ज्ञानेश्वरीची वैज्ञानिकता' संपादक प्रियांका गायकवाड, दिनांक २९ जुलै, २०१६
१२ दैनिक महाराष्ट्र टाईम्स, धर्म, विज्ञान संघर्ष – एक विचारांची उत्क्रांती, फादर फ्रांन्सिस दिब्रिटो, दिनांक १ नोव्हेंबर, २०१४
१३ दैनिक तरूण भारत, समर्थ रामदास स्वामी आणि लिखित साहित्यातील चिन्ह संकेत, संपादक अरूण फडके, दिनांक २ फेब्रुवारी, २०१९.
१४ अंतरजाल, संत साहित्य आणि विज्ञान कालगणना, श्री अक्षय भोसले, वारकरी संप्रदाय, युवा मंच, महाराष्ट्र, दिनांक १६ जुले, २०१४

M.S.P. MANDAL'S

# YESHWANTRAO CHAVAN COLLEGE

AMBAJOGAI DIST BEED

ON THE OCASSION OF CELEBRATION OF GOLDEN JUBILEE YEAR 2021-2022

## A NATIONAL LEVEL WEBINAR

ORGANISED BY

DEPARTMENT OF COMMERCE AND LIBRARY

## INTELLECTUAL PROPERTY RIGHTS

SATURDAY 28 AUGUST 2021

# CERTIFICATE

THIS IS PRESENTED TO

Mr./Miss./Mrs./Dr. DR CHANDRASHEKHAR ATMARAM BHAGAT of

College VPS COLLEGE OF ART'S SCIENCE AND COMMERCE LONAVALA in

recognition of all his/her valuable presence in National Level Webinar Organized by Faculty of Commerce and Department of Library under 'Student and Faculty Development Programme' of Internal Quality Assurance Cell.

DR. INDRAJEET BHAGAT
HOD. COMMERCE

MR. SUNIL BHOSALE
LIBRARIAN

PROF. DHARMARAJ TANDULJEKAR

Made for free with Certify'em

3

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

March-2021

Special Issue 263 (A)

## अनुवादित मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा




अतिथी संपादक -
डॉ. वनमाला गुंडरे (रेड्डी)
प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई,
ता. अंबाजोगाई, जि. बीड.

विशेषांक कार्यकारी संपादक
डॉ. दिलिप भिसे व डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई,
ता. अंबाजोगाई, जि. बीड.

मुख्य संपादक : डॉ. धनराज धनगर (येवला)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | अनुवाद आणि मराठी भाषा व साहित्य : काही संदर्भ | डॉ . गणेश मोहिते | 07 |
| 2 | अनुवाद लेखनाचे तंत्र आणि स्वरूप | डॉ. किरण वाघमारे | 14 |
| 3 | अनुवाद आणि मराठी अनुवादीत साहित्य | डॉ. साहेबराव शिंदे | 19 |
| 4 | अनुवाद : संकल्पना, स्वरूप व प्रक्रिया | डॉ. रामकिशन दहिफळे | 23 |
| 5 | अनुवाद संकल्पना : प्रकार व प्रक्रिया | डॉ. लक्ष्मण गित्ते | 26 |
| 6 | अनुवादित साहित्य : समस्या आणि उपयोजन | डॉ. मोहन कांबळे | 29 |
| 7 | अनुवादाचे स्वरूप | प्रा.रा.ज.चाटे | 32 |
| 8 | अनुवादित साहित्य आणि तौलनिक साहित्याभ्यास | डॉ. भरत जाधव | 35 |
| 9 | भाषांतर युग : एक चिंतन | डॉ. राजाभाऊ धायगुडे | 41 |
| 10 | अनुवाद : संकल्पना प्रकार | डॉ. संजय खाडप | 45 |
| 11 | अनुवादीत मराठी लघुकथा | डॉ. छत्रभुज सोळंके | 47 |
| 12 | अनुवादित साहित्य लेखन | डॉ. विठ्ठल केदारी | 49 |
| 13 | भाषांतर युग | डॉ. जगदीश शेवते | 52 |
| 14 | अनुवादित साहित्य : स्वरूप आणि समीक्षा | डॉ. बालाजी रुद्देवाडे | 56 |
| 15 | अनुवादाचे प्रकार आणि उपयोगिता | डॉ. म. ई. तंगावार | 59 |
| 16 | अनुवाद प्रक्रिया : भाषा आणि संस्कृती विकासाचा मार्ग | प्रा. दीपक सूर्यवंशी | 61 |
| 17 | अनुवाद : संकल्पना आणि स्वरूप | डॉ. गजानन जाधव | 65 |
| 18 | अनुवादाचे स्वरूप व रोजगाराच्या संधी | डॉ. संतोष देशमुख | 69 |
| 19 | अनुवाद : लेखन प्रक्रिया, स्वरुप आणि चिकीत्सा | डॉ. वर्षा गायकवाड | 73 |
| 20 | अनुवादित साहित्य लेखनासमोरील आव्हाने | डॉ. संदीप वाकडे | 77 |
| 21 | दहशतवादी जगताचे वास्तववादी चित्रण करणारी कादंबरी- 'द ब्रेडविनर' | डॉ. ताहेर पठाण | 81 |
| 22 | भाषांतर संकल्पना : प्रकार व प्रक्रिया | डॉ. अनिल बांगर | 86 |
| 23 | भारतीय भाषेतील अनुवादित कादंबऱ्यांचे समीक्षात्मक लेखन | प्रा. वंदना सोनवले | 89 |
| 24 | अनुराधा पाटील यांच्या कवितांचा हिंदी अनुवाद | प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर | 94 |
| 25 | अनुवादित साहित्यांची समृद्ध परंपरा आणि 'द अल्केमिस्ट' | प्रा. बाळू मोहन तिखे | 99 |
| 26 | अनुवाद प्रक्रियेतील प्रमुख प्रश्न व समस्या | डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. सचिन रुपनर | 103 |
| 27 | महात्मा बसवेश्वरांच्या 'वचन' साहित्याचा मराठी अनुवाद : एक अभ्यास | उमाकांत चलवदे | 109 |
| 28 | स्टीव्ह जॉब्ज : अधिकृत चरित्र | प्रा. महारूद्र जगताप | 112 |
| 29 | 'पिंजर' -एक अस्वस्थ मनाची संवेदना | डॉ. सोपान सुरवसे | 116 |
| 30 | 'विकारविलसित अथवा शेक्सपिअरकृत हॅम्लेट' नाटकाचे भाषांतर | प्रा. डॉ. सुभाष आहेर आणि योगेश शेळके | 119 |

| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 31 | मराठी अनुवादित कन्नड 'वचन' साहित्य | डॉ.रवींद्र बेम्बरे | 122 |
| 32 | अनुवाद लेखन व ज्ञानात्मक भाषाज्ञान | डॉ. अर्चना चव्हाण | 126 |
| 33 | तौलनिक साहित्याभ्यासातील अनुवादित साहित्याचे महत्त्व | डॉ. जयश्री बाबर | 130 |
| 34 | अनुवादित साहित्यामुळे साहित्याला लाभलेली समृद्धता | डॉ. चंद्रशेखर भगत | 134 |
| 35 | अनुवादित साहित्य : स्वरूप आणि संकल्पना | डॉ. युवराज भामरे | 139 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

REPRINT COPY

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue – 263 (A) : अनुवादित मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
March-2021

# अनुवादित साहित्यामुळे मराठी साहित्याला लाभलेली समृध्दता

डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत
विद्या प्रसारिणी सभेचे कला, विज्ञान,
आणि वाणिज्य महाविद्यालय, लोणावळा, तालुका मावळ, जिल्हा पुणे
फोन नंबर ९२२६८५२५५२
ई मेल आयडी :bhagatsir.kp@gmail.com

**प्रास्ताविक :**

अनुवादित साहित्य ही संकल्पना भारतामध्ये १९ व्या शतका पासून रूजू झाली. १८५७ मध्ये भारतातील काही मोठया शहरांमध्ये विद्यापीठे व महाविद्यालयांची स्थापना करण्यांत आली. त्या काळात भारतातील तरूण आंग्ल साहित्याच्या संपर्कात आले. तेव्हा पासून इंग्रजी भाषेचे विविध ज्ञानभाषेत भाषांतर करण्याची परंपरा सुरू झाली. म्हणून भाषांतर, रूपांतर, अनुवाद या समांतर संकल्पना मानल्या जातात. वास्तविक भाषांतर म्हणजे बोलणारा, लिहिणारा आणि ऐकणारा हया तिघां मध्ये असणारा एक दुवा आहे. याच अर्थाने अनुवाद म्हणजे एका भाषेतील विचार आशयासह दुस–या भाषेत मांडणे होय. परंतु अनुवादाला अन्य भाषांमध्ये भाषांतर असे म्हटले जाते. भाषांतराचे प्रमुख दोन प्रकार आहेत. छायानुवाद आणि भावानुवाद'. मूळ शब्दाप्रमाणे शब्दश: अर्थ घेऊन भाषांतर करणे म्हणजे छायानुवाद. उदा. मराठीतील 'मामा' या शब्दाचा छायानुवाद करायचा झाल्यास, 'मदर्स ब्रदर' तर भावानुवाद म्हणजे आशयासह भाषांतर करणे होय. मराठीतील मामा या शब्दाचा भावानुवाद, 'अंकल' असा होतो.

मराठी साहित्यामध्ये १९ व्या शतका पासून भाषांतरीत रूपांतरीत वांङमय मोठया प्रमाणात झालेले आढळते. सुरूवातीला प्राचीन संस्कृत अरबी आणि फारसी ग्रंथ मराठीतुन अनुवादित झालेले दिसतात. पुढे ग्रीक भाषेतील इसापनीतील कथा, होमरच इलीयर्ड असे अनुवाद झाले. त्या नंतर १८७२ मध्ये इंग्रजी, बंगाली, हिंदी, मराठी अशा प्रांतिक भाषेतील अनुवाद झाले. यामध्ये कृष्णशास्त्री चिपळूणकर, परशुराम तात्या गोडबोले, गणेश शास्त्री लेले, महादेव शास्त्री कोल्हटकर, विनायक जनार्दन किर्तने, महादेव कुंटे इत्यादींनी अनुवादित लेखन म्हणजे मराठी साहित्यातील अनुवादित साहित्याची पायाभरणी होय. हीच परंपरा घेऊन पुढे मामा वरेरकर, शरद बाबु, दुर्गा भागवत, विद्याधर पुंडलिक, विजय तेंडुलकर, ना. सी. फडके विं. दा. करंदीकर व आधुनिक काळातील पु. ल. देशपांडे इत्यादींचे अनुवादित लेखन उत्तम दर्जाचे पहायला मिळते. या परंपरेमूळे आजच्या काळात कथा, कादंबरी, नाटय याचे अनेक अनुवादकार मोठया प्रमाणात दिसून येतात. भारतीयेतर भाषांमध्ये आज उत्तम अनुवाद संस्कृती रूजलेली दिसते. अनेक कथा कादंब–यांचे जर्मन, रशियन, ईटली, फ्रेंच या भाषांमध्ये दर्जेदार व साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या स्वरूपातील मराठी साहित्य वाचायला मिळते. एकूणच अनुवादित साहित्यामूळे मराठी वाचकांना जागतिक साहित्य विश्व हे सर्वश्रेष्ठ असल्याचे जाणवु लागल्यामूळे मराठी साहित्याला समृध्दता प्राप्त झालेली दिसते.

**अनुवादित साहित्य, स्वरूप आणि संकल्पना :**

अनुवाद ही अतिशय व्यापक संज्ञा असून एका भाषेतील मजकूर, संहिता मूळ भाषेच्या अर्थासह त्याचे स्पष्टीकरण दुस–या भाषेत मांडणे होय. वास्तविक यामध्ये एका भाषेचा अर्थ दुस–या भाषेत होत असल्यामूळे स्थूलमनाने त्याला भाषांतर असे म्हणता येत असले तरी भाषांतरात त्या साहित्याचा, संस्कृतीचा किंवा सौंदर्याचा

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue – 263 (A) : अनुवादित मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
March-2021

अनुभव प्रत्यक्षपणे दुस—या भाषेत उतरण्यासाठी अनुवादित भाषेची प्रतिमा, प्रतिके, संस्कृती आणि शैली बरहुकूम उतरणे आवश्यक असते. याच अर्थाने डॉ. कल्याण काळे यांनी मांडलेल्या व्याख्ये नुसार, ''भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर, त्याचा आशय आणि अभिव्यक्तिजन्य अनुभवांसह दुस—या भाषेत उतरविण्याची प्रक्रिया म्हणजे भाषांतर होय''.[२] परंतु भाषांतर करणे आणि अनुवाद करणे म्हणजे दोन भाषां मध्ये जी अस्पष्ट सिमा रेषा आहे ती सिमा रेषा म्हणजे आधुनिक काळातील अंतरराष्ट्रीय स्तरा वरील साहित्याचे होणारे भाषिक रूपांतर होय. म्हणून अनुवादाची व्याख्या, ''पूर्वसिध्द मजकूराचे स्पष्टीकरण पण विवरण अथवा विस्तार म्हणजे अनुवाद होय''.[३] याशिवाय अनुवादाचे स्पष्टीकरण करणारी व्याख्या डॉ. प्र. ना. परांजपे यांनी मांडलेली आहे. त्यांच्या मते, ''अनुवाद म्हणजे मौखिक किंवा लिखित भाषेच्या माध्यमातुन एकदा व्यक्त झालेल्या आशयाची त्याच भाषेचा किंवा दुस—या एखाद्या भाषेच्या माध्यमातुन पुन्हा केलेली मौखिक किंवा लिखित अभिव्यक्ती होय''.[४]

थोडक्यात मूळ भाषेतील साहित्याचा दुस—या भाषेत अनुवाद करतांना दोन्ही भाषांची शैली, संस्कृती, अनुभव आणि सामाजिक जाणठेऊन, रूढी – परंपरा, निसर्ग, इतिहास यांचे भान ठेऊन भाषेच्या सहाय्याने मूळभाषेतील अनुभव अनुवादित भाषेतील वाचकांना करून देणे.त्याच प्रमाणे मूळ लिखाणातील भार्वार्थाचा —हास न करता त्या भाषेच्या सौंदर्यासह अनुवाद घडविणे म्हणजे अनुवादित साहित्य होय. साहित्यानुवाद करणे ही अतिशय किचकट प्रक्रिया असून मराठी भाषेच्या समृध्दीकरिता अनुवाद या प्रक्रियेने मोलाची भर टाकली आहे.

**अनुवादित साहित्याची परंपरा :**

अनुवादित साहित्याचा आरंभ १८२४ ते १८५७ या कालखंडापासून मानला जात असला तरी ख—या अर्थाने संत साहित्यातील ज्ञानेश्वरांनी लिहिलेला अमृतानुभव अर्थात ज्ञानेश्वरी हा खरा भावानुवादीत प्रथम असणारा ग्रंथ आहे. संस्कृत श्रीमदभगवत गीतेचा ज्ञानेश्वरी हा प्राकृत मराठीतील पहिला अनुवादित ग्रंथ होय. परंतु रूपांतर, भाषांतर आणि अनुवाद याची परंपरा भारतीयेतर भाषांपासून मानली जात असल्यामूळे इंग्रजी शिक्षणापासून अनुवाद ही संकल्पना मराठी भाषेत मानली जाते.

मराठी साहित्यामध्ये अनुवादित साहित्याच्या पहिल्या कालखंडाला 'शास्त्री युग' म्हणून ओळखले जाते.[५] या काळात कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी रासेल च्या ग्रंथांचे भाषांतर केले. तसेच अरेबियन नाईटस, सॉक्रेटिस चे चरित्र, पद्यरत्नावली हा काव्यग्रंथ भाषांतरीत केला. त्यांची सोपी भाषा व खुबीदार मांडणी यामूळे हे ग्रंथ खुप गाजले होते. त्यांचे समकालीन परशुराम गोडबोले यांनी मोल्स्वर्थ व कँडी यांच्या कोषांचे काम केले होते. संस्कृत नाटकाची त्यांनी भाषांतरे केली. तत्कालीन क्रमिक पुस्तकं त्यांनी निर्माण केली. कृष्णशास्त्री राजवाडे यांनी 'मालतीमाधव', 'मुद्राराक्षस' या संस्कृत नाटकांची रूपांतरे केली. यामध्ये त्यांचे काव्यालंकाराचे प्रभुत्व दिसून येते. गणेश शास्त्री लेले यांनी संस्कृत गद्य पद्यांची भाषांतरे करून मराठी साहित्य समृध्द बनवले व कोलंबस याचे चरित्र हा ग्रंथ लिहून मराठी साहित्यात मोलाची भर टाकली. रघुनाथ शास्त्री गोडबोले यांचा इंग्रजीचा फारसा अभ्यास नसतांनाही, 'भारत वर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोष' व प्राचीन मराठी कवितेतील शब्दांचा हंसकोश निर्माण करून मोलाची भर टाकलेली दिसते. कृष्णशास्त्री गोडबोले यांनी मराठी भाषेचे नवीन व्याकरण हा उत्तम दर्जाचा ग्रंथ लिहिला. यामध्ये संस्कृत, प्राकृत पूर्वभाषा, अर्वाचिन भाषा आणि फारसी भाषा यांचा प्रत्यय येतो. त्याच प्रमाणे ज्योतिषशास्त्र वेद – पुराण भुमिती इत्यादीं वरील ग्रंथही लिहिले. महादेव शास्त्री कोल्हटकर यांनी अनेक संस्कृत नाटके मराठीत उतरवली. शेक्सपिअर च्या 'अथेल्लो' नाटकाचे भाषांतर

केले. विनायक किर्तने यांनी 'जयपाळ' हे नाटक इंग्रजी नाटकाच्या आधारे लिहिले. याच काळात घाशीराम कोतवाल, मुक्तमाला इत्यादी कादंब–याही गाजलेल्या दिसतात. हंसराज हे या काळातील प्रमुख भाषांतरकार होते. त्यांनी अनेक विषयांवरील लिखाण केले. शास्त्री कालखंडात मराठी नाटके, कथा, कादंब–या संस्कृत किंवा इंग्रजीतून भाषांतरीत आणि रूपांतरीत झालेल्या दिसतात. परंतु इंग्रजी भाषेचे किंवा इंग्रजेतर भाषांची मर्यादा मात्र यात जाणवते.

दुस–या कालखंडा मध्ये आधुनिक साहित्याचा अंतर्भाव करता येईल. यामध्ये भारतीय भाषांतील अनेक पुस्तके विविध भाषांतुन अनुवादित झाली. बंगालीतील शरद बाबु रविंद्रनाथ यांचे साहित्य, मामा वरेरकर, गोपीनाथ तळवलकर यांनी बंगाली भाषेचा अनुवाद केलेला आढळतो. मृणालीनी गडकरी, विलास गिते, रंजना पाठक यांची आजही बंगालीतुन मराठीत अनुवादित केलेली पुस्तके वाचकांना आकर्षित करतात. तर चंद्रकांत पाटील यांच्या सारख्यांनी हिंदीतुन मराठीत अनुवादित केलेली पुस्तके विशेष गाजलेली आहेत. राम पटवर्धन यांचे 'पाडस' हा मार्जोरी किनन रॉलिंग्ज या लेखिकेच्या द इयर लिंग या पुस्तकाचा अनुवाद आहे. दुर्गा भागवत यांनी अनुवादित केलेल्या जातककथा, बाणाची कादंबरी तसेच पाली भाषेतील 'जातकद्वकथवण्णना' या पाली भाषेतील ग्रंथाचा इंग्रजी भाषेतील अनुवाद अतिशय खडतर पध्दतीने पुर्ण केला. या शिवाय पुंडरिक चंद्रापीड, वैशंपायन महाश्वेता आणि कादंबरी या पात्रांची रचना अतिशय वैशिष्ठयपुर्ण पध्दतीने अनुवादित केलेली आढळते.

मराठीतील ज्ञानपीठ विजेते कवि विं. दा. करंदीकर यांनी अरिस्टॉटल चे काव्यशास्त्र तसेच अमृतानुभवाचे अर्वाचिनीकरण हे सुरेख पध्दतीने अनुवादित केलेले आहे. शेक्सपिअर च्या किंग लिअर नाटकाचा 'राजा लिअर' हा अनुवादही अतिशय लयबध्द व मूळ प्रतिमेचे अनुभव देणारा अनुवाद आहे. पु. ल. देशपांडे यांच्या अनेक अनुवादित साहित्यामूळे मराठी साहित्य परंपरा ख–या अर्थाने समृध्द झालेली दिसते. त्यांनी मराठीत आणलेली ती फुलराणी, तीन पैशाचा तमाशा, राजा ओयदीपौस, सुंदर मी होणार, अंमलदार अशी रूपांतरीत नाटके इत्यादी अनुवादित रूपांतर क्षेत्रातील नाविन्यपुर्ण कामगिरी मानली जाते. कथा लेखनाच्या बाबतीत सदानंद रेगे यांची स्टाईन बेग, मायकोव्हस्की, वॉल्ट व्हिटमन अशी अनेक पुस्तके मराठीचे समृध्दपण वाढवतात. नाटय क्षेत्रातील विजय तेंडुलकर व गिरीश कर्नाड यांनी चौघीजणी, आंधळी, लिटल वुमन यांचे अनुवाद करून सुंदर कादंब–या व पाश्चिमात्य चित्रपटांचा अनुभवही मराठीला करून दिलेला आहे. विद्याधर पुंडलिक यांनी अनुवादित केलेली चार्ल्स डिकन्सच्या, 'अ टेल ऑफ टू सिरीज' चा अनुवाद विशेष उल्लेखनीय आहे. विद्याधर पुंडलिक यांची अनुवादित कामगिरी खुप मोलाची व मोठी मानली जाते. शेक्सपिअरच्या नाटकांपासून गुजरातीतील कवि मीरा, सुरदास, कबीर यांच्या काव्यकृतींचाही अनुभव मराठी रसिकांना त्यांनी दिलेला आहे. जी. ए. कुलकर्णी, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर यांच्या प्रमाणे नव्या दशका मध्ये डॉ. विणा मूळे, ह. अ. भावे, मंगेश पाडगावकर, शांता शेळके, ह. ना. आपटे यांनीही अनुवादाची परंपरा जपली असून मराठी साहित्याला एक उत्तम दर्जा प्राप्त करून दिलेला आढळतो.

**अनुवादित साहित्याचे योगदान :**

मराठी साहित्यामध्ये अनुवादित साहित्याची परंपरा सुमारे तीन शतकांची दिसून येते. सुरूवातीचे साहित्य हे संस्कृत, अरबी, फारसी अशा भाषांतुन सुरू झाले असले तरी पुढे देशीय भाषा हिंदी, गुजराती, बंगाली, तमिळ, तेलगु या भाषांमधून होत गेले आणि ब्रिटीश कालखंडा नंतर इंग्रजी, फ्रेंच, रशियन भाषांमध्ये कथा, कादंबरी, काव्य यांचे भाषांतर व रूपांतर उच्चशिक्षित नविपिढी करतांना दिसून येते. ही अनुवादाची परंपरा

E-ISSN : 2348-7143
March-2021

विसाव्या शतका पासून जोमाने अंतरराष्ट्रीय स्तरावर वाटचाल करीत असल्याची जाणीव आज स्पष्टपणे दिसते. आजच्या अनुवाद प्रक्रियेमध्ये मराठी भाषेमध्ये अनेक नामवंत लेखक व साहित्य विविध जागतिक भाषांतील कथा, कादंबरीतील वर्णन संस्कृती आणि मूळ आशयासह हुबेहुब उतरवितांना दिसतात. अनुवादकांचा दर्जात्मक विचार केला तरी आजही अनेक चांगल्या प्रकारचे ग्रंथ वाचकांना वाचायला मिळतात. यामूळेच अनुवाद संस्कृती सर्वत्र रूजतांना दिसते. असे असले तरीही मराठी साहित्यातील अनुवादकांची काही तत्वे पाळणे आवश्यक वाटतात. काही सर्वश्रेष्ठ पुस्तकांचे अनुवाद ब–याचदा झालेले दिसत नाहीत. प्रकाशक, लेखक, जाणकार यांच्यातील समन्वय ब–याच वेळेस केवळ आर्थिक स्वरूपाचा वाटत असल्यामूळे अनुवादित साहित्यातुन सांस्कृतिक, वैचारिक देवाण घेवाण होताना दिसत नाही.

मराठीत आजही जास्तीत जास्त खपाचा विचार करून अनुवादित पुस्तके लिहिण्या कडे व निर्माण करण्याकडे कल दिसून येतो. परिणामी मराठी साहित्य विश्व जगातील श्रेष्ठ साहित्याने समृध्द असले तरीही अनुवादित साहित्याची संख्यात्मकता तुलनेने फार कमी आहे. ठराविक लेखकांचे विशिष्ठ अनुवादकांचीच पुस्तके अनेकदा पाहायला मिळतात. स्वाभाविकच विविध देशांतील पुस्तकांचे अनुवाद वाचकां पर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. चिन, फ्रांस देशातील किंवा अन्य देशातील अनेक वांङ्मयाचे अनुवाद होणे गरजे आहे. या शिवाय साहित्य प्रकारां मध्येही वैविध्यपुर्णता येणे काळाची गरज आहे. कथा, कादबंरी, नाट्य, चरित्रे, आत्म चरित्रे यांची अनुवादित रूपांतरे होत असली तरी विज्ञान, अध्यात्म आणि शास्त्रीय ग्रंथांची अनुवादित रूपे मर्यादित स्वरूपाची झालेली आढळतात. मराठीतले अनुवाद: एक लेखाजोखा, या लेखा मध्ये संजय भास्कर जोशी[६] यांनी वर्णन केल्या प्रमाणे आजवर ''एकूण सुमारे ११० लेखकांना साहित्यासाठीचा आंतरराष्ट्रीय पातळीवरचा सर्वोच्च सर्वोच्च मानला गेलेला नोबेल पुरस्कार मिळाला आहे. त्यात सर्वाधिक बारा वेळा हा पुरस्कार फ्रेंच साहित्यिकाला तर अमेरिकेला नउ वेळा, इंग्रजीला नउ वेळा, स्वीडन व जर्मनीला प्रत्येकी आठ वेळा आणि ईटलीला सहा वेळा हा पुरस्कार मिळाला आहे. ....... पण या नोबेल विजेत्या लेखकांची मात्र अगदीच कमी पुस्तके अनुवादित झालेली दिसतात. शिवाय भारतीय भाषातल्या साहित्यिकांचा अनुवाद त्यापेक्षाही कमी आहे.''

एकूणच अनुवाद प्रक्रिया ही केवळ भाषांतर नसून दोन भाषांतील अंतर, त्यांची शैली, वर्णनासह मूळभाषेतून त्याचे प्रतिरूप उभे करण्याचे सामर्थ्य असते. ही प्रक्रिया ख–या अर्थाने मौखिक, लिखित अभिव्यक्ती असल्यामूळे मूळभाषेतील सामाजिक वास्तव, त्यातील स्त्रोत किंवा मूळगाभा हा अनुवादित भाषेत केवळ जसाच्या तसा उतरून चालत नाही., तर त्यामध्ये वस्तुनिष्ठता आणि बिनचूकपणा असावा लागतो. याच अर्थाने अनुवाद हे शास्त्र नसून त्याला कला मानले जाते. साहित्य कलेतून समाजाची उभारणी होत असल्यामूळे अनुवादकाच्या माध्यमातुन दोन राष्ट्रांतील समाजाची संस्कृती, परंपरा, रिती रिवाज हुबेहुब उभे करण्याचे सामर्थ्य या कलेतुन सिध्द होते. मात्र गरज आहे की अशा निस्पृह शैलीदार अनुवादकांची. कारण खरा अनुवादक हा दोन भाषांना जोडणारा केवळ दुवा नसून तो भाषेतील सौंदर्यासह जिवनानुभव देणारा कलावंत असतो.

थोडक्यात मराठीतील अनुवाद परंपरेचा आढावा घ्यायचे ठरवल्यास अनुवादित संस्कृती रूजतांना दिसते. अनुवाद हे महत्वाचे सांस्कृतिक कार्य उत्तम प्रकारे मराठी भाषेत होत आहे. मराठी अनुवाद ग्रंथसूची या ग्रंथात डॉ. विणा मुळे यांनी याचे विश्लेषणात्मक परिक्षण मांडले असुन ते दिलासा देणारे आहे. हा ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेला आहे. त्यातील आकडेवारी नुसार गेल्या काही शतकात भाषांतरीत कादंब–यांची आकडेवारी ३८ टक्के असुन भारतीय भाषां पेक्षा अन्य भाषांची भाषांतरे ही ३२ टक्के झालेली

Reviewed Copy

E-ISSN : 2348-7143
March-2021

आहेत. या शिवाय इतर अनेक अनुवादाची टक्केवारी त्यात दिलेली असुन मराठी साहित्याची परंपरा अनुवादित साहित्यातुन दिवसेंदिवस समृध्दच होत आहे असे स्पष्टपणे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ :**

१ मराठी विश्वकोश, खंड १२ वा (संपादक), तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रकाशन महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
२ कल्याण काळे, अंजली सोमण (संपादक), भाषांतर मीमांसा, प्रतिमा प्रकाशन, पुणे – ३०, प्रथमावृत्ती, १९९७ (पृष्ठ क्रमांक १५)
३ कल्याण काळे, अंजली सोमण (संपादक), भाषांतर मीमांसा, प्रतिमा प्रकाशन, पुणे – ३०, प्रथमावृत्ती, १९९७ (पृष्ठ क्रमांक ९)
४ प्र. ना. परांजपे, 'मराठी वांङ्मय कोशः खंड चौथा', संपादक विजया राजाध्यक्ष, प्रकाशक, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई – ४०० ०१४ (पृष्ठ क्र. ३२)
५ कै. मोरेश्वर सखाराम मोने, मराठी साहित्य व व्याकरण, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, आवृत्ती दहावी (पृष्ठ क्रमांक ४८)
६ संजय भास्कर जोशी, साप्ताहिक साधना, संपादक विनोद शिरसाठ, वर्ष ६७ /अंक २६ वा, साधना प्रकाशन, पुणे, अंक ३१ जानेवारी, २०१५ (पृष्ठ क्रमांक १८ )

Review Copy

Bhartiya Shikshan Sanstha's

# SHRI DNYANESH MAHAVIDYALAYA, NAWARGAON

Dist. Chandrapur (MS)

www.dmvn.ac.in

(NAAC Re-accredited with Grade 'A')

# Certificate

**Two Day National Level E-Conference**

**on**

**Research in the Humanities: New Trends, Motives, Scope and Applications**

**(21 and 22 March 2022)**

**This Certificate is presented to**

DR BHAGAT CHANDRASHEKHAR ATMARAM

**of** VPS COLLEGE OF ARTS SCIENCE AND COMMERCE LONAVALA

**for his / her active participation in the e-conference.**

| Dr S S Bakare<br>Principal | Dr G S Kortalwar<br>Coordinator | Mr D R Kshirsagar<br>Coordinator | Dr A T Mungmode<br>Coordinator |
|---|---|---|---|

March- 2022

E-ISSN : 2348-7143



INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue -290

**Guest Editor**
**Dr. Suresh S. Bakare**
**Principal, Shri Dnyanesh Mahavidyalaya,**
**Nawargaon, Dist. Chandrapur**
**Maharashtra, India.**

**Executive Editors**
**Dr. Gajanan Kortalwar (Head, Dept. of Marathi)**
**Mr. Durgesh Kshirsagar (Assist. Prof. English)**
**Dr. Asteek Mungmode (Head, Dept. of Economics)**
**Shri Dnyanesh Mahavidyalaya,**
**Nawargaon, Dist. Chandrapur**
**Maharashtra, India.**

**Chief Editor : Dr. Dhanraj Dhangar**

RESEARCHJOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

March-2022
E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

**Peer Reviewed, Referred & Indexed Journal**

**Issue - 290**

**Guest Editor**
Dr. Suresh S. Bakare
Principal, Shri Dnyanesh Mahavidyalaya,
Nawargaon, Dist. Chandrapur
Maharashtra, India.

**Executive Editors**
Dr. Gajanan Kortalwar (Head, Dept. of Marathi)
Mr. Durgesh Kshirsagar (Assist. Prof. English)
Dr. Asteek Mungmode (Head, Dept. of Economics)
Shri Dnyanesh Mahavidyalaya,
Nawargaon, Dist. Chandrapur
Maharashtra, India.

**Chief Editor : Dr. Dhanraj Dhangar**

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : **1**

***Cover Photo (Source)** : Sinhgad College of Commerce, Chandivali, Mumbai-400072, India.

© All rights reserved with the authors & publisher **Price : Rs. 1000/-**

**Published by –**

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

E-ISSN : 2348-7143
March-2022

# Editorial....

*Shri Dnyanesh Mahavidyalaya, Nawargaon organized Two Day National E-Conference on 'Research in the Humanities: New Trends, Motives, Scope and Applications' (21 and 22 March 2022). The subject experts, and academicians tried to discuss the issue during the conference. In addition to this, the scholars, and professors from various colleges have tried to write some research papers related to the subject. It is seen that some of them are very scholarly and have with the disciplined manner. We also observed that some papers were written without any preparation and references; but they have certainly tried to present something with a central theme. Therefore, all such papers are included in this issue.*

**Role of Organization the Conference:**

*Today, there is a lot of research in various disciplines of humanities, not only in the in different universities but also in autonomous and research institutes in India. It is equally true that the research process must be continued in the field of knowledge, from which the production of knowledge will continue to increase. But considering the ranking of various universities in India globally, it is clear that we are lagging behind in the quality research and its application. We see, the number of scholars in various disciplines conducting research in the field of humanities is increasing day by day. Along with this, many research projects are completed every year. Considering the condition of contemporary research, it is observed that its quantity is increased but the quality is decreasing day-by-day. Therefore, the widening gap between quantity and quality is a matter of concern in the field of knowledge.*

*What exactly are the reasons for this? In fact, to find out these reasons is the subject of research. Do the researchers today, have a mature view of study and the approach to the problems required for quality research? Is the today's research limited only for the sake of degree, qualification, salary increase, and CAS? Of course not. That's why, it was important for all of us to discuss and to come together with some innovative ideas on this subject. In this conference, we tried to get the answer of some questions like- What should be the motivation for research in Language, Literature and Social Sciences? What should be its nature, scope and application? The conference was organised to find out the answer of the questions like- What should be the motive of research in humanities? What is its nature, scope and application? Some of the questions are still unanswered. The topic must be discussed in detail with the view of informing those who are doing research or looking to do so in the future.*

Executive Editors

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 290 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
March-2022

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Research in Language and Literature: Scope, New Trends and Application | Dr. Shriram G. Gahane | 05 |
| 02 | Life Care and Socio-Philosophical Elements in Sadhana Amte's Samidha: A Critical Study | Mrs. M.D.Chitalkar | 09 |
| 03 | Research in Gender: Indian Perspectives | Mr Durgesh R Kshirsagar | 12 |
| 04 | A Cross Cultural Encounter of Interpreter Of Maladies | Dr Shailendra Kumar Chourasia | 14 |
| 05 | Reconstruction of Past in Amitav Ghosh's The Calcutta Chromosome | Dr Shailendra Kumar Chourasia | 20 |
| 06 | Handling of English Language on Social Media | Dr. Nisha Bhagwat Gosavi | 26 |
| 07 | An Eco-Critical Study of Amitav Ghosh's Gun Island | Mr. Dnyaneshwar Karbahri Nikam, Dr. Rajendra Dattatraya Gholap | 28 |
| 08 | Importance of Parts of Speech Acquiring English Language | Dr. Nitesh Nilkanthrao Telhande | 32 |
| 09 | Teaching Poetry with Music Method | Raju Raosaheb Salve,Dr. Mahendra Sahebrao Shinde. | 38 |
| 10 | The Phenomenon of Honour Killing and Honour-Based Violence: A Study of Bapsi Sidhwa's The Pakistani Bride | Mr. Kishor B. Ahire, Dr. Rajendra Dattatraya Gholap | 42 |
| 11 | साहित्य में अनुसंधान : समस्या और समाधान | डॉ. लक्ष्मीकान्त चंदेला | 47 |
| 12 | अर्थशास्त्रातील संशोधनाच्या नव्या दिशा - एक अध्ययन | डॉ. विजय आनंदराव दरवडे | 53 |
| 13 | सामाजिक संशोधनातील टप्पे किंवा पायऱ्या | डॉ. सोमा पी. गोंडाणे | 58 |
| 14 | सामाजिक शास्त्रातील संशोधन आणि त्याचे उपयोजन – एक चिकित्सक अध्ययन | डॉ.विनायक बाजीराव शिंदे | 65 |
| 15 | मानव विज्ञानशाखेअंतर्गत संशोधनांची आवश्यकता | प्रा. डॉ. स्वामी विरभद्र गुरप्पा | 70 |
| 16 | बालकामगार समस्येवरील समाजशास्त्रीय सैद्धांतीक परिप्रेक्ष | प्रा.गजेंद्र कढव | 76 |
| 17 | भारतीय इतिहासलेखनावर मार्क्सवादाचा प्रभाव | प्रा. रमेश नरसिंग थोरात | 81 |
| 18 | उच्च शिक्षण व संशोधन संस्थांमधील विद्यार्थ्यांना संशोधनाद्वारे राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासात सहभागी करून घेणे. विशेष संदर्भ: महाराष्ट्र उन्नत अभियान | डिके विनोद रमेश | 84 |
| 19 | पारधी समाजातील महिलांचे अध्ययन: सामाजिक संशोधनाचा नवीन प्रवाह | दिपाली शंकर वाघमारे | 92 |
| 20 | संत साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा | डॉ.चंद्रशेखर भगत | 99 |
| 21 | भाषा व साहित्यातील संशोधनाच्या प्रेरणा | डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | 103 |
| 22 | जागतिकीकरण : मराठी साहित्यातील संशोधनाची दिशा | डॉ.गजानन कोर्तलवार | 108 |
| 23 | भाषा व साहित्य संशोधनाच्या प्रेरणा | डॉ. मीनाक्षी देव (निमकर) | 115 |
| 24 | मराठी आत्मचरित्रांच्या संशोधनातील नवे प्रवाह | डॉ जगदीश शेवते | 119 |
| 25 | मराठी भाषा संशोधनाच्या नव्या दिशा | प्रा.बाळू भंडारे | 123 |

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | लोककथा स्वरूप आणि प्रयोजन | प्रा. पूनम तडके | 127 |
| 27 | आधुनिक कालखंडातील मराठी साहित्यकृतीतून आलेले शिक्षणविषयक विचार | डॉ. संदीप वाकडे | 132 |
| 28 | १९७० नंतरच्या ग्रामीण कवितेमधून व्यक्त झालेले ग्रामीण जीवन | शुभम गावंडे | 136 |
| 29 | मध्ययुगीन साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा | डॉ. शरद खांडेमराड | 141 |
| 30 | मराठी भाषा व साहित्यातील संशोधनाच्या प्रेरणा | डॉ.सौ.विजया खामनकर | 144 |
| 31 | मराठी लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा | डॉ. नवनाथ अंगद शिंदे | 147 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

E-ISSN : 2348-7143
March-2022

# संत साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा

**डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत**
प्रभारी प्राचार्य
व्ही. पी. एस. कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स, लोणावळा, तालुका मावळ, जिल्हा पुणे, पिन 410 401,
महाराष्ट् राज्य, फोन नंबर 9226852552
इ मेल आयडी bhagatsir.kp@gmail.com

**प्रास्ताविक :**

संत साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा या विषयावर शोधनिबंध सादर केला आहे. यात संत साहित्याच्या पूर्वपीठिकेपासून मध्ययूगीन काळातील संत साहित्याचे विविधांगी झालेल्या संशोधन व संशोधकांचा थोडक्यात आढावा यात घेतला आहे.

संत साहित्य हे कालातीत असल्यामुळे आज पाचशे वर्षा नंतरही संत साहित्या वर अभ्यास होत आहे. या अभ्यासाला नव्या दिशा लाभण्यासाठी काही संसाधने आधूनिक बदल सुविधा यांचा वापर करून संशोधन होणे गरजेचे आहे. जागतिक पातळी वर संत साहित्याची उपयुक्तता व मूल्यात्मकता आजही अधोरेखित केली जाते. म्हणून संत साहित्य समाज यांचा परस्पर संबंध स्पष्ट करण्यासाठी नव्या संशोधनाची नवी दिशा यात शोधली आहे.

**संत साहित्याच्या संशोधनाची पूर्वपिठीका :**

मराठी वांड.मयाच्या संशोधनाला खरी चालना मिळाली ती 19 व्याशतकात. पाश्चात्य धर्मोपदेशकांनी देशीय लोकांचे हस्तलिखित काव्य मुद्रणकलेच्या आधारे जतन करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यामध्ये डॉ. विल्सन, एलफिस्टन, मालकम इत्यादींच्या कार्यातील मराठी भाषेचा इतिहास, वांड.मयाच्या संशोधनाला चालना मिळाली.

एतदेशीय स्वरूपात तात्या गोडबोले, माधव डुकले यांनी संतकवींच्या काव्यरचना संग्रहित करून मासिकात छापल्या. प्राचीन वांड.मय संग्रहित करून संशोधनपर ग्रंथ प्रकाशित करणेची दिर्घ परंपरा वि. का. राजवाडे, वि. ल. भावे यांचे पासून थेट शं. गो. तुळपुळे इत्यादीं पर्यत सुरू झाली. यामध्ये संत कालिन सामाजिक परिस्थिती, भाषा, पाठशुध्दप्रती, पंथीयदृष्टी, संत जीवन चरित्र उपलब्ध झाले. संत साहित्याच्या संशोधनाला चालना मिळाल्यामुळे पंडित कवी व शाहिरी वांड.मयालाही या काळात संशोधनाची दिशा लाभली.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात विद्यापीठांच्या स्थापन झाल्या. त्यामुळे विद्यापीठांमध्ये संत साहित्यावर प्रबंधात्मक लेखन झाले. यात ल. रा. पांगारकर, श्री. म. वर्दे, श्री य. न. केळकर, श्री म. ना. सहस्त्रबुध्दे, श्री रा. श्री जोग इत्यादींनी तुलनात्मक, रसग्रहणात्मक, चिकित्सक संशोधन केले. पुढे संशोधनाच्या दिशा व वाटा विस्तृत होत गेल्या. संतांची धर्म संस्कृती तत्कालीन लोकश्रध्दा, प्रतिके, प्रतिमा, माध्यम लोकरंजन इत्यादी अनेक पैलूवर द. भि. कुलकर्णी, रा. चि. ढेरे, यू. म. पठाण, अ. ना. देशपांडे, सरोजिनी बाबर, प्रभाकर मांडे, इत्यादी अनेकांनी संत साहित्याच्या विद्यापीठ स्तरावरील प्रबंध स्वरूपातून संत साहित्याला नवे आयाम दिले.

संत साहित्य संशोधनाच्या पूर्वपीठिकेमध्ये जुन्याकाळातील जी जी हस्तलिखिते, बाड, लिखाण उपलब्ध होत गेले. त्याचा उपयोग मुद्रण करणे करिता इतकाच दिसुन येतो. पोथ्या, पुराणे छापून त्याचे जतन करणे हा प्रारंभिक हेतू होता. मुद्रणकलेमुळे ग्रंथांच्या प्रती छापणे, त्या प्रती वाचकांच्या हाती सोपविणे सोईचे झाले. त्यातून अभ्यासकांची संख्या वाढली. पाठचिकित्सा स्वरूपात असणारा हा अभ्यास पुढे तुलनात्मक, वर्णनात्मक,

E-ISSN : 2348-7143
March-2022

पंथीयपरंपरा, लोकाभ्यासाच्या दिशेने अनेक संतांच्या जीवनचरित्र वांङ.मयावर संशोधनात्मक स्वरूपात येऊन थांबला. हे या काळाचे प्रमुख वैशिष्टय मानावे लागेल.

**संत साहित्यातील मध्ययुगीन काळातील संशोधन :**

संत साहित्यातील मध्ययुगीन काळात अभ्यासाच्या दिशा बदलल्या. प्राचीन व मध्ययुगीन साहित्य यांचा तुलनात्मक चिकित्सक अभ्यास करणा–या अभ्यासकांची, शोधनिबंध सादर करणा–या अभ्यासकांचा ओघ वाढला. या काळात संत साहित्याची भाषा, चरित्रे, इतिहास, साहित्य प्रकार, स्थान, त्यातील वर्णने, शैली, सामाजिकता इत्यादी अंगांनी संशोधन केले गेले.

मध्ययुगीन कालखंडातील बरेचसे संशोधन हे महाराष्ट् सारस्वतकार वि. ल. भावे यांनी आपल्या मांडलेल्या 'मराठी सारस्वत' या ग्रंथातील पुरवणीच्या आधारे झाले. त्यातील उल्लेखानुसार एकनाथ समकालीन योगवासिष्ठकार कवी रंगनाथ, अवधुतगीता, गणेशगीता, टीकाकार कवी मेरू. स्फुट रचनाकार ब्रह्मगुणदास नागो आया, अमृतानंद, माधवेंद्र इत्यादींचा अभ्यास होत गेला. त्याच प्रमाणे सोळाव्या शतकातील अनंतबोध, अमृत जयानंद, राघवदास, विप्रनारायण, एकनाथ शिष्य शामराज इत्यादी कवींच्या काव्यांचा गुणरचनात्मक आणि संशोधनात्मक अभ्यास झाला. संत तुकारामांचे शिष्यमंडळ, अर्थात समकालीन कवींच्या स्फूटरचनांचा शोधघेऊन त्यावर संशोधनात्मक लेखन केले गेले.

याच काळात संत ज्ञानेश्वरां भोवतीचे जे प्रभावलय होते त्यांचे समकालीन संतांना कवीत्व प्राप्त झाल्यामुळे संत ज्ञानेश्वरांना केंद्रिभूत धरून परस्पर संबंधातील काव्यानुबंधाचाही शोध घेण्यात आला. तेच तत्व नामदेवांच्या सहित्यातही अर्थात नामदेव समकालीन कवी यांचा अभ्यास केला गेला. परभाषांचा प्रभाव व परिणाम संतांच्या साहित्य निर्मितीची दखल या काळात मोठ्या प्रमाणात घेतली गेली. पण साहित्य गुणांचा विचार करताना प्रेरणा, प्रवृत्ती, पर्यावरण आदि परिस्थितीचा किंवा घटकांचा सखोल पध्दतीने अभ्यास झाला नाही. उदाहरणार्थ एकनाथांच्या कवीत्वातील प्रवृत्ती आणि वैशिष्टये आणि तुकारामांच्या काव्यातील प्रवृत्ती व वातावरण भिन्न आहेत. म्हणून याचा सप्रमाण अभ्यास करणे गरजेचे आहे.

संत साहित्याचा विचार करताना मराठी संत साहित्य आणि इतर प्रांतातील साहित्यिक यांचा तौलनिक स्वरूपात अभ्यासाची गरज होती. परंतु काही निवडक कवींचाच अभ्यास यात झाला. यामध्ये कन्नड, हिंदी, पंजाबी संत कवींचा मराठी वरील प्रभाव यात पहायला मिळतो. परंतु हा अभ्यास अत्यल्प आहे. तत्कालीन परिस्थितीत संस्कृत वाणी ही देशपातळी वर प्रमुख भाषा म्हणून परिचित असल्यामुळे किंबहुना संस्कृतोदभव अनेक शब्द मराठी भाषेमध्ये रूढ असल्यामुळे भाषाशास्त्रीय दृष्टयाही यात अभ्यास केला गेला.

**नव संशोधन गरज आणि उपयुक्तता :**

संत साहित्याचा अभ्यास आज नव्या दिशेने होणे गरजेचे आहे. परंतु नव्या दिशा म्हणजे नक्की कोणत्या दिशा 1 हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. आधुनिक काळामध्ये सुधारणा आणि सामाजिक बदलते स्तर याचा अभ्यास संत साहित्यातून तुलनात्मक दृष्टया करणेची गरज आहे. आजपर्यत अनेक लेखक, कवी, संशोधकांनी संत साहित्यातील प्रमुख दिपस्तंभ म्हणून ज्या ग्रंथांचा आधार घेतला त्यातील अग्रक्रमाने मराठी साहित्य परिषदेने प्रकाशित केलेला डॉ. वसंत जोशी व अदवंत यांनी संपादित केलेला, 'भाषा व साहित्यः संशोधन' खंड 1, 2, 3 यातील तिस–या खंडात प्राध्यापक गो. म. कुलकर्णीचा लेख, 'संत साहित्य विचारातील काही दुर्लक्षित दिशा' अभ्यासण्यासारखा आहे. यांनी आपल्या लेखात 'संत साहित्याचा परामर्श घेताना मराठी समीक्षेने त्याची योग्य ती दखल घेतली नाही. त्याला योग्य तो न्याय दिला नाही.' ही खंत व्यक्त केली आहे. 'राजकारण', 'समाजकारण' या संदर्भात मराठी समीक्षेने संत साहित्यावर घेतलेले आक्षेप, संत साहित्याने समाजाला निष्क्रिय बनविण्याची

शिकवण दिल्याचा आक्षेप अशा काही आक्षेपांचा त्यांनी या लेखात विचार केला असून, ते आक्षेप कितपत योग्य वाटतात याची त्यांनी मीमांसा केली आहे. संत साहित्याचा विचार करताना संतकाळ, संतकालीन साहित्य परंपरा, साहित्य निर्मिती, शिक्षण पध्दती, संतकालीन श्रध्दाविश्व, साहित्यविषयक धोरण व विविध वितरण – माध्यमे या सर्वांचे साकल्याने व सामर्थ्याने विश्लेषण केले, तरच संत साहित्याला खरा न्याय मिळकल हा त्यांचा विचार काही तरी नवीन सांगून जातो. संत साहित्याकडे पाहण्याची एक नवी दृष्टी या दृष्टीने यातील विचारांना महत्व आहे. तसेच ''संतसाहित्यः अभ्यासाच्या काही दिशा' हा कल्याण काळे व रा. शं. नगरकर यांनी संपादित केलेला ग्रंथ प्रमुख मानावा लागेल. या ग्रंथामध्ये संत साहित्यातील दुर्लक्षित विषयांचा आढावा घेतलेला आहे. यात संत साहित्याशी निगडीत अनेक अभ्यास विषयांचे विवेचन आहे. वरील दोन्हीही ग्रंथ सुमारे पंचवीस वर्षापूर्वीचे असले तरीही अद्यापही त्यातील अनेक विषयांवर संशोधन होणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ संत साहित्यातील भाषिक अभ्यास, परंपरा, संप्रदाय आणि लोकपरंपरा इत्यादी.

आज एकवीसाव्या शतकात ज्ञानेश्वरीची पारायणे करणारी अनेक माणसे आहेत. मात्र विद्यापीठातील मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांचा ओघ कमी होत चालला आहे. या करिता संत साहित्याचे नव्या दिशेने संशोधन करणा–या अभ्यासकांची गरज आहे. महाराष्ट्रात संत विद्यापीठाची स्थापना झाली आहे. त्यामध्ये संतांची स्थाने आणि कार्यात्मक प्रवास यांचा भौगोलिक आराखडयासह शोध घेऊन ऐतिहासिक दस्तऐवजांचा पृथकरणात्मक अभ्यास होणे गरजेचे आहे. यामुळे अनेक संतांच्या जन्म स्थळाचे वाद, संतांच्या ग्रंथांच्या निर्मितीचे वाद याचे स्पष्टीकरण होईल. आजही प्राचीन मराठी वांड.मयातील अनेक गावांच्या नावांची पुनरावृत्ती असल्यामुळे स्थळ, काळ निश्चितीला जे बंध आहेत ते मुक्त होऊन त्यावर आधुनिक सखोल साधनांच्या सहायाने लेखन करता येईल.

जागतिकीकरण व आधुनिक तंत्रज्ञान यांची जोड एकवीसाव्या शतकातील संत साहित्याला असल्यामुळे इंटरनेटवर संत साहित्याचे विविधांगी लेखन (ब्लॉग) आढळतात. या साहित्याची खरी सुरूवात गॅटस करारामुळे झाली. गॅटस करारामुळे शिक्षणातील आंतरराष्ट्रीय स्तरावर बदल होत गेले. त्यात देशी, विदेशी अभ्यासक संत साहित्याचा शोधघेण्यासाठी पुढे येत आहेत. मराठी भाषेचा अभ्यास करणारी 'मराठी संशोधन मंडळ' हया संस्थेने पंच्याहत्तरी पार केली आहे. या संस्थेअंतर्गत सोळाव्या, सतराव्या शतकातील पुस्तकांचे नव्याने प्रकाशन केलेले आहे. यामध्ये त्या काळात प्रियोळकरांनी भारतभर फिरून अनेक हस्तलिखिते बोली भाषेचे नमुने जुन्या काव्याच्यासंहिता तयार केल्या. त्यांची ही परंपरा एकोणीसाव्या शतकात प्राध्यापक स. गं. मालशे यांनी सुरू ठेवली. त्यांनी आजही देशभरातील मराठी साहित्य मिळवून त्याचे मुद्रण, छपाई करण्यासाठी परराज्यातून प्रवास केलेला आहे. आधुनिक वाढत्या प्रवासाच्या साधनांमुळे आज आपल्याला गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश, गोवा आदि राज्यातील संत साहित्य संकलित करणे व प्रसिध्द करणे सोईचे होईल. परंतु या दिशेने अभ्यास होणे गरजेचे आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा विचार केल्यास प्रिंटर, स्कॅनर सारख्या संसाधनांचा वापर स–हासपणे केला जातो. परंतु संत साहित्याच्या उपयुक्ततेच्या दृष्टीने दिनेश वैद्य यांच्यासारखी एखादीच व्यक्ती आढळते. त्यांनी नाशिकमध्ये प्राचीन हस्तलिखितांचे, पोथ्यांचे जतन करून लिमका बुक ऑफ रेकॉर्ड केले आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे प्राचीन साहित्याचे भांडार सर्वांना पि. डी. एफ. स्वरूपात उपलब्ध झाले आहे. त्यांचे हे कार्य म्हणजे संत साहित्याचे जतन व संवर्धन इतक्या पुरतेच मर्यादित न राहाता राष्ट्रीय अंतरराष्ट्रीय पातळीवर ते उपलब्ध करून दिलेले आहे. त्याचा अभ्यास करून संत साहित्यातील नव्या वाटा शोधायला पाहिजेत.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 290 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
March-2022

आजच्या विज्ञान युगात संत साहित्य आणि विज्ञान, वैज्ञानिक तथ्ये, विज्ञानाच्या प्रमुख तीन शाखा म्हणजे नैसर्गिक विज्ञान, सामाजिक विज्ञान, औपचारिक विज्ञान इत्यादींच्या हजारो उपशाखांवर संतांनी माडलेले विचार शोधून मांडले पाहिजेत. उदाहरणार्थ 'प्रकाशाची अक्षरे' हया डॉ. अडसुळेंच्या ग्रंथात ज्ञानेश्वरीतील भौतिक विज्ञान, डॉ. मेघनाथ सहा यांच्या मनोवैज्ञानिक अभ्यासाची गरज, डॉ. रामचंद्र देखणे यांच्या संत साहित्यील पर्यावरण इत्यादी अनेक ग्रंथ नव विज्ञानाचे संत साहित्याशी नाते दाखवतात.

थोडक्यात संत साहित्य हे भक्ती, मोक्ष, अध्यात्माचे साहित्य असा गैरसमज केला गेल्यामुळे त्याची उपयुक्तता कमी होत आहे. शैक्षणिक अभ्यासक्रमातील त्याचा सहभागही अत्यल्प आहे. कलावंत, खेळाडू, राजकीय नेत्यांचे जीवन चरित्रा बरोबर संत साहित्याचा अभ्यासक्रमात अंतर्भाव होणे गरजेचे आहे. उच्च शिक्षणात संत साहित्याचा अंतर्भाव नसल्यामुळे तरूणांच्या अनेक समस्या पहायला मिळतात. समाजात सामाजिक मूल्ये, मानसिक व्यवस्थापन, राष्ट्रीय एकता, संवेदनशील जाणिवांची दृष्टी लोप पावलेली दिसते. पाश्चात्य भौतिक संस्कृती मानवतेची भावना तळाशी गेल्यामुळे पाश्चात्यांना भययुक्त जीवन संघर्षाला सामोरे जावे लागते. म्हणूनच त्यातील अनेक अभ्यासक सर्वांगाने संत साहित्याचा अभ्यास करायला येतात. पाश्चात्य अभ्यासक जी. ए. डलरी (फ्रेंच), प्राध्यापक सोन्थायमर (जर्मनी), जॉर्जिया झोग्राफ (रशिया), विनान्द कॅलेवट (बेल्जियम), विदुषी डॉ. चिहिरो कोईसा (जपान) इत्यादी मराठी भाषेचा प्रामुख्याने संत साहित्याच्या अभ्यासासाठी आपल्याकडे आलेले आहेत. त्यांनी भाषा, समाज, संस्कृती, संत साहित्यातील तत्वे यांचा परिपूर्ण अभ्यास करून मराठी साहित्याला नवे वळण दिले आहे. याच साहित्याचा आज अनेक अंगांनी दिशा, उप दिशा शोधून अभ्यास करायला पाहिजे. अखेर राहूल विश्वनाथ कराड यांनी म्हटल्या प्रमाणे, ''संत साहित्य जगण्या बाबत सम्यक दृष्टी देते. सध्याच्या भौतिक युकात त्याचा अभ्यासक्रमात समावेश केल्यास सर्वांगीण उन्नतीला ते उपयुक्त ठरेल'' (दैनिक सकाळ 10 ऑगस्ट, 2021)

**निष्कर्ष :**

( 1 ) संत साहित्याचा अभ्यास एकोणीसाव्या शतकात सुरू झाला.
( 2 ) वीसाव्या शतकात वैशिष्टयपूर्ण अभ्यासकांनी यात मोलाचीभर घातली.
( 3 ) एकवीसाव्या शतकात तंत्रज्ञान, तत्वज्ञान, विज्ञान या अंगांनी विविध आधुनिक संसाधनांचा वापर करून संशोधनाला दिशा मिळाली आहे.
( 4 ) जागतिक पातळीवर संतसाहित्यातील मानवीमूल्यांची उपयुक्तता अधोरेखित होत आहे.
( 5 ) वरील सर्व कारण आणि सद्यस्थितीचा विचार केल्यास संत साहित्यावर संशोधनाच्या नव्या दिशांचा सखोल अभ्यास करण्याची नितांत गरज आहे.

**संदर्भ :**

( 1 ) भावे वि. ल., महाराष्ट्र सारस्वत, पॉप्युलर प्रकाशन, पुणे. आवृत्ती पाचवी, 1885
( 2 ) पौराणिक हस्तलिखितांचे डिजिटलायझेशन, मराठी सृष्टी (ब्लॉग), 3 मार्च, 2012
( 3 ) जोशी वसंत, म. ना. अदवंत (संपादक) 'भाषा व साहित्य संशोधन', मराठी साहित्य परिषद, पुणे, प्रथम आवृत्ती, 1989
( 4 ) काळे कल्याण, नगरकर रा. शं., 'संत साहित्य अभ्यासाच्या काही दिशा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 1992
( 5 ) अडसुळे प्रभाकर, व. दि. कुलकर्णी 'प्रकाशाची अक्षरे', मॅजेस्टीक प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 2002
( 6 ) मालेगावकर शांता (संपादन) 'आजचे शिक्षण : एक वास्तव', विद्यार्थी सहाय्यक समिती प्रकाशन पुणे, पुर्नमुद्रण डिसेंबर, 2008

विद्यावर्धिनी संचालित,
अण्णासाहेब वर्तक मानव्य, केदारनाथ मल्होत्रा वाणिज्य व ई. एस. अंड्राडिस विज्ञान महाविद्याल
वसई रोड (प.), जि. पालघर - ४०१२०२
(मुंबई विद्यापीठाशी संल

मराठी विभाग
आणि
भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

Indian Council of Social Science Research

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता

International Peer reviewed Research Journal





## ।। संत साहित्याची समकालीनता ।।

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

शनिवार दि. १७ डिसेंबर २०२२

समन्वयक
डॉ. शत्रुघ्न फड
(मराठी विभाग प्रमुख)
९४२२६७०५३०

सहसमन्वयक
डॉ. सखाराम डाखोरे
(सहाय्यक प्राध्यापक)
९८५०११६६४५

प्रा. शैलेश औटी
(सहाय्यक प्राध्यापक)
९८३३४८७४६८

निमंत्रक
डॉ. अरविंद उबाळे
(प्राचार्य)

विद्यावर्धिनी संचालित,
अण्णासाहेब वर्तक मानव्य महाविद्यालय,
केदारनाथ मल्होत्रा वाणिज्य महाविद्यालय व
ई. एस. अंड्राडिस विज्ञान महाविद्यालय
(मुंबई विद्यापीठाशी संलग्न) आणि
कनिष्ठ महाविद्यालये, वसई रोड (प.) जि. पालघर – ४०१२०२

VIDYA VARDHINI

मराठी विभाग
आणि
भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

Indian Council of Social Science Research

# ।। संत साहित्याची समकालीनता ।।

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

शनिवार दि. १७ डिसेंबर २०२२

# प्रमाणपत्र

श्री / श्रीमती डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत

महाविद्यालय व्ही. पी. एस. कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, लोणावळा.

यांनी एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात [redacted] / [redacted] / शोधनिबंध वाचक / [redacted] म्हणून सहभाग घेतला आणि

संत ज्ञानदेव पुरस्कृत वारकरी संप्रदायाने घडविलेल्या महाराष्ट्राचा लोकोद्ध

या विषयावर शोधनिबंध वाचन केले, त्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. शत्रुघ्न फड | डॉ. सखाराम डाखोरे | प्रा. शैलेश औटी | डॉ. अरविंद उबाळे |
| समन्वयक | सहसमन्वयक | सहसमन्वयक | निमंत्रक |
| (मराठी विभाग प्रमुख) | (सहाय्यक प्राध्यापक) | (सहाय्यक प्राध्यापक) | (प्राचार्य) |

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

**Special Issue-01**
**Dec. 2022**

**विद्यावर्धिनी शिक्षणसंस्था वसई**

**आणि**

**भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR),**
**पश्चिम विभागिय केंद्र, मुंबई**

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

## 'संत साहित्याची समकालीनता'

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Date of Publication
Dec. 2022

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता® .कॉम

YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT FACTOR 8.14 iijif

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

Harshwardhan Publication Pvt.Ltd. • International Multilingual Research Journal • CERTIFIED QUALITY MANAGEMENT SYSTEM ISO 9001:2015

http://www.printingarea.blogspot.com

# शुभेच्छा संदेश

**माननीय श्री. विकास नरसिंह वर्तक**
(अध्यक्ष, विद्यावर्धिनी शिक्षण संस्था, वसई)

विद्यावर्धिनी शिक्षणसंस्था वसई आणि भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), पश्चिम विभागिय केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'संत साहित्याची समकालीनता' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रासाठी शुभेच्छा देत असताना मला मनापासून आनंद होत आहे.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या भूमीत संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ,संत तुकाराम अशा अनेक महान संतांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून प्रबोधनाची परंपरा सुरू ठेवली. महाराष्ट्राचा उल्लेख नेहमी पुरोगामी राज्य असा केला जातो. याचे कारणही संतांनी समाजप्रबोधनाचा चालवलेला वारसा हेच आहे. संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या समकालीन संतांनी पंढरपूरमधील चंद्रभागेच्या वाळवंटात आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. येथे संत चोखामेळा, संत कर्ममेळा, संत बंका, संत नरहरी सोनार, संत सावता माळी, संत सेना न्हावी, संत गोरा कुंभार, संत शेख महंमद अशा विविध जाती धर्माचे संत व समाजातील लोक एकत्र येऊन सर्वांच्या कल्याणाची प्रार्थना करताना दिसतात. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेला 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ सातशे वर्षानंतरही जुना वाटत नाही. हा ग्रंथ अभ्यासक आणि वारकरी संप्रदायातील अनुयायी यांच्या घरांमध्ये अतिशय आदराने आणि प्रेमाने वाचला जातो. संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाचा विचार पंजाबपर्यंत नेला. शीख बांधवांच्या 'गुरूग्रंथसाहिब' या ग्रंथात त्यांच्या रचना वाचावयास मिळतात. संत एकनाथांनी आपल्या भारूडांच्या माध्यमातून तत्कालीन समाजातील अज्ञान आणि अंधश्रद्धांवर हल्ला केला. सर्वसामान्य माणसांचे मनोरंजन करीत—करीत प्रबोधन केले. संत तुकारामांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून समाजातील ढोंगीप्रवृत्ती, दांभिकता, जातिभेद अशा समाजातील दोषांवर कठोर प्रहार केले.या संतांबरोबरच संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सोयराबाई, संत निर्मला, संत बहिणाबाई, संत वेणाबाई इत्यादी संत कवयित्रींनी आपल्या मनातील भावभावना मुक्तपणे अभिव्यक्त केल्या आहेत.

जगामध्ये सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठी भाषेचाही क्रमांक लागतो. महाराष्ट्राची लोकभाषा असलेल्या मराठी भाषेला समाजमनात रूजविण्याचे आणि वृद्धिंगत करण्याचे महत्त्वाचे कार्य संत साहित्याने केले आहे. आजच्या वर्तमान परिस्थितीत मराठी भाषेवरील इतर भाषेंची आक्रमणे पाहता आपल्या महाविद्यालयाने आयोजित केलेले 'संत साहित्याची समकालीनता' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र म्हणूनच संत साहित्याच्या व एकूणच मराठी भाषेच्या जतनासाठी उपयुक्त ठरेल अशी आशा बाळगतो व आपल्या चर्चासत्रासाठी पुन्हा एकदा मन:पूर्वक शुभेच्छा देतो!

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

Special Issue-01
Dec.2022



# प्राचार्यांचे मनोगत

**डॉ. अरविंद उबाळे**
(प्राचार्य, अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसई)

भारत हा धर्मनिरपेक्ष देश असल्यामुळे सर्व जातीधर्मांची माणसे इथे सुखाने नांदतात. विविध भूप्रदेशावर राहणाऱ्या समाजाच्या रूढी–परंपरा भिन्न–भिन्न असून त्यांच्या संस्कृती व बोलींचे वेगळेपण निश्चितच महत्त्वाचे आहे. समाजाच्या ह्या विविधतेला समतेच्या एका सूत्रात बाधण्याचे मौलिक कार्य विविध संतांनी केले आहे. तत्वज्ञ चार्वाक, संत बसवेश्वर, संत चोखामेळा, संत ज्ञानेश्वर, संत कबीर, संत तुकाराम अशा विविध संतांनी भारतीय समाजव्यवस्थेतील दांभिकतेवर कठोर प्रहार करून समाजात समता, मानवता, बंधुभाव रूजविण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रत्येक काळात संतांच्या ह्या विचारांवर सखोल चिंतन झालेच आहे असे नाही, त्यामुळेच विविध प्रांतातील भारतीय संतांच्या विचारांवर प्रकाश टाकता यावा, त्यांच्या लेखनातील सामाजिक मूल्ये पुन्हा समाजोपयोगी बनावित या उद्देशाने आपण संत साहित्याची समकालीना ह्या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

पद्मश्री भाऊसाहेब वर्तक यांच्या प्रयत्नांतून घ्क्तघ मध्ये उभ्या राहिलेल्या विद्यावर्धिनी शिक्षण संस्थेच्या मागील ह्व् वर्षांच्या वाटचालीतही शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक अधिष्ठानांना अग्रस्थान दिलेले दिसून येते. ठाणे, पालघर व मुंबई उपनगरांच्या परिसरात राहणाऱ्या सर्वसामान्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणावे, मुलींना आपल्या स्वअस्तित्वाची जाणीव व्हावी ह्या उद्देशाने कार्यरत असलेल्या संस्थेच्या विविध महाविद्यालयांनी नेहमीच विविध उपक्रमांतून आपले सामाजिक भान जपले आहे. मराठी विभागातर्फे ह्रञ्ह्र–ह्रञ्र्ह 'मध्ये घेण्यात आलेल्या 'आदिवासी साहित्य आणि लोककला' ह्या राष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातूनही महाराष्ट्र व भारतभरातील आदिवासी समाज, साहित्य व त्यांच्या बोलींची सर्वसामान्यांना व अभ्यासकांना ओळख झाली. आज घक्त डिसेंबर ह्रञ्ह्रह्र रोजी पार पडणाऱ्या 'संत साहित्याची समकालीनता' ह्या विषयाच्या अनुषंगानेसुद्धा महाराष्ट्रातील व देशभरातील संतांच्या विचारांतील विविधता लक्षात येणार आहे.

भारतीय संतांनी नेहमीच आध्यात्मिकता जपतानाच त्या–त्या काळातील जातीभेदावर प्रहार केले आहेत, समानतेची बिजे पेरली आहेत, मानवसमूह एकतेने नांदावेत यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांच्या ह्या समतामूल्यवादी विचारांची आजच्या समाजव्यवस्थेला पुन्हा गरज असल्याचे जाणवते आहे, म्हणूनच आपल्या अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे आयोजित ह्या एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रासाठी व चर्चासत्रास भरभरून प्रतिसाद देणाऱ्या सर्व अभ्यासक व शोधनिबंध वाचकांना मन:पूर्वक शुभेच्छा!

# संपादकीय

भक्ती आणि नीतीच्या मार्गावर वाटचाल करताना संतांना जी अनुभूती आली त्याचा उत्कट आविष्कार म्हणजे भारतीय संत साहित्य. 'अनुभव आले अंगा । ते या जगा देत असे ।।' या भूमिकेतून संतांनी साहित्य लेखन केले. मानवतेच्या उन्नयनासाठी चिरंतन सत्याचा व्रतस्थपणे घेतलेला शोध म्हणजे संत साहित्य आहे. म्हणून संत साहित्यातून प्रकट झालेली मूल्ये ही चिरंतन स्वरूपाची आहेत. यामुळे काळाच्या उदरातून उद्‌भवलेल्या नवनवीन प्रश्नांची उत्तरे ही भारतीय संत साहित्यात सापडत असल्यामुळे ते नेहमीच समकालीन ठरते. काळाच्या सीमा ओलांडत विश्वातील सबंध मानवजातीला सर्वांगीण उन्नतीची सम्यक दिशा देण्याचे सामर्थ्य भारतीय संत साहित्यात आहे. वर्तमान परिप्रेक्षातून संत साहित्याचा शोध घेण्याच्या भूमिकेतून आमचे अण्णासाहेब वर्तक मानव्य, केदारनाथ मल्होत्रा वाणिज्य व ई. एस. अंड्रांडिस विज्ञान महाविद्यालय, वसई रोड (प.), जि. पालघर आणि भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (पैं), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'संत साहित्याची समकालीनता' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापकांनी आणि संशोधक विद्यार्थ्यांनी पाठवलेल्या शोधनिबंधांचे संपादन म्हणजे प्रस्तुत ग्रंथ आहे.

विसाव्या शतकातील विज्ञान–तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे अवघ्या विश्वातील मानवी जीवन अंतर्बाह्य बदलले. जागतिकीकरण आणि दळणवळणाच्या क्रांतीमुळे जीवनाला प्रचंड गती आली. बघता–बघता अनेक गोष्टी कालबाह्य झाल्या पण संत साहित्य मात्र यास अपवाद ठरले. झपाट्याने बदलणाऱ्या या गतिमान युगात संत साहित्य कालबाह्य न होता उलट उत्तरोत्तर त्याची उपयुक्तता वाढू लागली. वर्तमानातील अनेक प्रश्नांची उत्तरे संत साहित्यातून मिळू लागली. एकाच वेळी सबंध जगाला हादरून टाकलेल्या अभूतपूर्व अशा कोरोना महामारीत मानसिक स्वास्थ्य स्थिर ठेवण्याच्या दृष्टीने भारतीय संत साहित्य हे निश्चितच उपयुक्त ठरले. मनातील सकारात्मक ऊर्जा वाढविण्याची दृष्टी संत साहित्यातून मिळाली.

आज माहिती तंत्रज्ञान आणि विविध समाज माध्यमांच्या क्रांतीमुळे संपूर्ण विश्व म्हणजे खेडे बनले आहे. भ्रामक समाज माध्यमांमुळे जग जवळ आले तरी घरातील आप्तस्वकीय आणि जवळच्या शेजाऱ्यांपासून मात्र माणूस मनाने खूप लांब जात आहे. माणसाची आत्ममग्नता उत्तरोत्तर वाढत असल्याने त्यातून एक सामाजिक बधिरता येत आहे. नातेसंबंधातला जिव्हाळा संपून एक कोरडी औपचारिकता येताना दिसते. सर्व सोयींनी सुसज्ज असलेले आलिशान बंगले आतून उदास वाटत असून वृद्धाश्रमांची गरज मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. सुखदुःख व्यक्त करायला आपण जागाच शिल्लक न ठेवल्यामुळे उदासीनता आणि वैफल्य मोठ्या प्रमाणात आले आहे. यातून समाजातील सर्व स्तरात मोठ्या प्रमाणात निराशेचे पीक येताना दिसत आहे. माणसाच्या उन्नतीचे मूळ असणाऱ्या शिक्षण व्यवस्थेचेच बाजारीकरण झाल्यामुळे सार्वत्रिक मूल्यह्रास झपाट्याने झाला. आपल्या गुणवत्तेच्या बळावर एकीकडे स्त्री यशाची विविध शिखरे पादाक्रांत करत असली तरी दुसरीकडे स्त्रीचे वस्तुकरण तितक्याच गतीने होताना दिसत आहे. कडव्या धर्मांधतेतून दहशतवादाला खतपाणी मिळत आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रातील आदर्शावरचा विश्वास उडत असून एक स्वैर अराजकता वाढत आहे.

अस्वस्थ वर्तमानाच्या उदरातील विविध समस्यांचा वेध घेत त्या समस्यांची उत्तरे संत साहित्यात शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत ग्रंथातील विविध शोधनिबंधातून करण्यात आला आहे. या ग्रंथात संपादित करण्यात आलेले शोधनिबंध हे केवळ महाराष्ट्रातील संतपरंपरेपुरतेच सीमित नसून कर्नाटकातील महात्मा बसवेश्वर, कन्नड शरण दासय्या, उत्तर भारतातील संत मीराबाई आणि कबीरांच्या विचार संपदेचा शोध घेणारी आहेत.

संस्कृत साहित्य आणि संत साहित्याचा अनुबंध शोधण्याचाही येथे प्रयत्न करण्यात आला. लिंगभावाच्या पलीकडे जाऊन स्त्रीकडे पाहण्याची संतांची दृष्टी आजच्या काळात उपयुक्त असल्याचा विचार या ग्रंथातील काही शोधनिबंधातून अधोरेखित झाला. ढासळत्या पर्यावरण संतुलनाच्या पार्श्वभूमीवर संतांचा पर्यावरण विचार येथे मांडण्यात आला आहे. आज शिकलेली माणसेच अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकत आहेत या पार्श्वभूमीवर संतांची विवेकनिष्ठा विचारात घेण्यात आली आहे. हा ग्रंथ म्हणजे अस्वस्थ वर्तमानाच्या पार्श्वभूमीवर भारतीय संत साहित्याचा विविध अंगाने घेतलेला शोध आहे. मानवविज्ञान शाखेतील विविध विषयात अभ्यास करणाऱ्या पुढील संशोधकांच्या दृष्टीने हा ग्रंथ निश्चितपणे उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

या चर्चासत्राचे आयोजन करण्यासाठी आमच्या विद्यावर्धिनी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. विकास नरसिंह वर्तक, कार्याध्यक्ष श्री. अरुण गणेश वर्तक , उपाध्यक्ष मा. श्री पांडुरंग गजानन नाईक , मा. श्री. शांताराम बापूजी जाधव, मा. श्री. पु. द. कोडोलीकर, कार्यवाह श्री. भाऊसाहेब मोहोळ, खजिनदार श्री. हसमुखभाई शहा यांनी सतत प्रोत्साहित केले. चर्चासत्राच्या आयोजनात कुठलीही कमतरता भासू दिली नाही, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचबरोबर आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र झाले पाहिजे यासाठी सतत पाठपुरावा करणारे आणि आम्हाला प्रोत्साहित करणारे आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांचेही मनःपूर्वक आभार. विशेष सहकार्य लाभलेल्या महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. जानकी सावगाव व उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके, महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. दिलीप वर्तक, माझे महाविद्यालयातील सर्व अध्यापक बंधू–भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी यांचेही विशेष आभार. या सर्वांच्या पाठिंब्याशिवाय हे चर्चासत्र आयोजित करणे अशक्य होते. या चर्चासत्रासाठी प्रामुख्याने उपस्थित असलेले उद्घाटक व बीजभाषक डॉ. दिलीप धोंडगे, मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभाग प्रमुख व मराठी अभ्यासमंडळ अध्यक्षा डॉ. वंदना महाजन तसेच सर्व सत्राध्यक्ष, साधनव्यक्ती आणि शोधनिबंधवाचक या सर्वांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, त्याबद्दल आम्ही या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

डॉ. शत्रुघ्न फड (संपादक)
डॉ. सखाराम डाखोरे (सहसंपादक)
प्रा. शैलेश औटी (सहसंपादक)

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
Special Issue-01
Dec.2022


# INDEX

01) संत साहित्य आणि पर्यावरण
अंगद श्रीपती भुरे, लातूर ||11

02) समाजविचार परिवर्तनात वारकरी संतसाहित्याची भूमिका :
डॉ. शत्रुघ्न फड, आरती विनोद ठाकूर, जि. पालघर ||14

03) संत साहित्यातील शाश्वतता
कु. प्राची विनोदराव मेंढे, (अकोला) ||20

04) संतसाहित्याचे कृषियोगदान
कु. वैखरी दिलीप नवेले, जि.पालघर ||23

05) संत तुकारामांच्या अभंगातील समाजप्रबोधन
प्रा. डॉ. आशा सोपान गिरी, परभणी ||29

06) संत साहित्य आणि समाजप्रबोधन
डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत, जि. सिंधुदुर्ग ||33

07) संत साहित्यातील संत कवयित्रींचे योगदान
Dr. N. V. Gawali, Vaibhavwadi ||39

08) संत ज्ञानदेव पुरस्कृत वारकरी संप्रदायाने घडविलेला महाराष्ट्राचा लोकोध्दार
डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत, जिल्हा पुणे ||43

09) संत साहित्यातून होणारे सामाजिक प्रबोधन
डॉ. ज्योती परब, मुंबई ||49

10) संत ज्ञानेश्वर व संत तुकारामांच्यावाङ्मयातील स्थलकालातीत विवेकवाद
डॉ.गीता मांजरेकर, आशा कुंभार, मुंबई ||54

11) संत एकनाथांची भारुडे म्हणजे नाथकालीन लोकजीवनाचे व लोकसाहित्याचे प्रकट दर्शनच !
डॉ. जगदीश लक्ष्मण पाटील, जि. जळगाव ||62

12) तत्त्वज्ञानातील 'सुखवाद आणि वारकरी संतसाहित्यातील 'सुखसंबंधित ...
प्रा.डॉ. ज्ञानेश्वर भोसले, जि. पालघर ||68

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

13) संत साहित्य आणि समाजप्रबोधन
डॉ. प्रताप गायकवाड, पुणे ||75

14) संत नामदेवांच्या अभंगातील सामाजिक विचार
प्रा. डॉ. डिगोळे बालाजी विठ्ठलराव, जि. लातूर ||80

15) शरण दसरय्या आणि पर्यावरण
प्रा.डॉ.म.ई. तंगावार, जि.लातूर ||84

16) संत नामदेवांच्या साहित्यातील समकालीनता
डॉ. सौ. मनिषा दयाघन पाटील, प्राचार्य. डॉ. भगवान अभिमानसिंग राजपूत ||86

17) माणदेशी मेंढपाळ धनगर जमात : लोकसाहित्य आणि संतसाहित्य
प्रा. डॉ. महादेव दिनकर इरकर, विरार ||89

18) संत साहित्याची समकालीनता
प्रा. डॉ. मीनाक्षी रा.देव निमकर, औरंगाबाद ||94

19) संत साहित्य आणि समाजप्रबोधन
डॉ. विवेक देशमुख, जि. अमरावती ||98

20) संत साहित्य आणि पर्यावरण
प्रा.डॉ.शंकर शिवाजी मुंडे, जि.रायगड ||101

21) संत एकनाथ व वर्तमान
डॉ.शरद वाघोळे, जि.वाशिम ||105

22) संत एकनाथांच्या अभंगवाणीतील कालातीत वैश्विक मानवी मूल्ये: एक अभ्यास
डॉ. शारदा विजय निवाते, जि. रायगड ||108

23) आजच्या प्रगत स्त्रीचे बीजे संत कवयित्रीमध्ये
प्रा. डॉ. शिल्पा म्हात्रे–काकडे, जि. बुलढाणा ||115

24) संत जनाबाई यांचे संत साहित्यातील योगदान
डॉ.सीमा मुसळे, मुंबई ||117

25) संत साहित्य : काल आज आणि उद्या
प्रा. डॉ.सौ.शुभांगी डोरले–परांजपे, नागपूर ||123

www.vidyawarta.com/03 _ http://www.printingarea.blogspot.com

26) संत साहित्य आणि समाजप्रबोधन
श्रीराम विलास तिडके, लातूर ||127

27) संत जनाबाई एक आकलन
निकिता अनिल शेंडगे, पुणे ||129

28) लोकसंस्कृती समृद्ध करणारे नाशिक संत भूमितील लोकोत्सव
डॉ. पौर्णिमा शिवाजी बोडके, पंकज केवळ पवार, नाशिक ||131

29) संत साहित्य आणि समाज प्रबोधन
पूनम साबळे, औरंगाबाद ||135

30) संत मीराबाई व संत मुक्ताबाई यांचे भक्तीविचार
प्रा. संदीप भागू चपटे, शिवळे ||137

31) संत साहित्यातील संत कवयित्रीचे योगदान
वीणा रमेश गुलदेवकर, औरंगाबाद ||143

32) संत जनाबाईच्या अभंगातील संत कबीरदर्शन
रोहिदास कुंडलिक खेडकर, पुणे ||146

33) संत ज्ञानेश्वर व संत एकनाथ यांच्या हरिपाठांचे काव्यसौंदर्य व त्यातील मिथकांचा अभ्यास
प्रा. डॉ. रवींद्र श्रीहरी सोमोशी, जिल्हा रायगड – महाराष्ट्र ||150

34) संतवाटिकेतील जाईची वेल: संत जनाबाई
प्रा. डॉ. हनुमंत भवारी, जि. पुणे ||153

35) संत कवयित्रींचे मराठी साहित्यातील योगदान
डॉ.दर्शना सलिल चौधरी, पालघर ||157

36) वारकरी आचार धर्मसंकल्पना, स्वरूप
प्रा.डॉ. नाथराव ज्ञानोबा गरजाळे, जि.बीड ||160

37) स्त्रीमनाचा हुंकार : संत जनाबाई
डॉ.रश्मी शेटये तुपे, माटुंगा ||165

38) महात्मा बसवेश्वरांची मूल्यदृष्टी
डॉ.शंकर हणमंतराव कल्याणे, जि.लातूर ||168

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

39) संस्कृत भाषा : मराठी संत साहित्याचा आधार
**डॉ.संजीवनी श्रीपाद नेरकर, देगलूर** ||171

40) संत चोखामेळा यांच्या अभंगातील विद्रोह
**डॉ. सखाराम डाखोरे, जि. पालघर** ||173

41) समाज प्रबोधनकार संत एकनाथ
**सहा.प्रा.जगदीश अनंत संसारे, विरार (प)** ||177

42) संत गाडगे महाराज यांचा मानवतावादी दृष्टिकोनाचा आढावा
**डॉ.सचिन कांतीलाल पिसे, वसई रोड पश्चिम** ||181

43) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व आदर्शग्रामराज्य
**बांगर नितीनकुमार बाबासाहेब, जि.पालघर** ||183

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

स्त्रीस्वातंत्र्य हे मोजता न येणारे असे शिखर दिवसेंदिवस माणुसकीपासून दूर दूर जाणारे पण तरी ते गाठण्यासाठी प्रवास मात्र सतत करावाच लागतो. हा प्रवास प्रत्येकीचा वेगळाच आहे. जनाबाई अतिशय समर्थपणे न डगमगता व्यक्त करते. तिच्या धिटाईचे अन मुक्तपणाचे लक्षणीय दर्शन घडते. स्वत:ला जाणवलेली उत्कृष्ट व झोकून देणारी प्रेमभावना व्यक्त करणे त्या काळात इतके सोपे नव्हते अन कवितेतून व्यक्त करणे फारच अवघ होते. परंतु दारिद्र्याच्या, उपेक्षेच्या एकाकीपणाच्या दबावाखाली दबून न जाता मुक्तपणे आविष्कृत करते. तिला स्त्रीस्वातंत्र्याचा विकास पाऊलवाटेवरून होतो आहे हे जाणवते. त्या काळात परमार्थ हीच खरी सर्वश्रेष्ठ मुक्ती असल्याने स्त्रिया परमार्थाकडे वळलेल्या आहेत. त्यांचे यश घवघवीत आहे. भारतीय संस्कृतीशी ते सुसंवादी आहे.

❑❑❑

**08**

# संत ज्ञानदेव पुरस्कृत वारकरी संप्रदायाने घडविलेला महाराष्ट्राचा लोकोध्दार

**डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत**
प्राचार्य,
विद्या प्रसारिणी सभेचे कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, लोणावळा, तालुका मावळ, जिल्हा पुणे

**********

**प्रास्ताविक :**

श्री आण्णासाहेब वर्तक मानव्य केदारनाथ मल्होत्रा वाणिज्य व ई. एस. अंड्रडिस विज्ञान महाविद्यालय आणि भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, मुंबई यांनी आयोजित केलेल्या एक दिवसीय राष्ट्रीय चर्चा सत्राकरिता मी, 'संत ज्ञानदेव पुरस्कृत वारकरी संप्रदायाने घडविलेला महाराष्ट्राचा लोकोध्दार' या विषयावर शोधनिबंध सादर करण्याचे निश्चित केले आहे.

या शोधनिबंधात संत ज्ञानेश्वर हे स्वत: नाथपंथी अनुग्रहित असूनही त्यांनी महाराष्ट्रात नाथ पंथाचा प्रसार केला नाही. त्यांनी भक्त पुंडलिकाच्या भागवत धर्माला अग्रस्थानी मानले. पण त्या धर्माचे प्रमाण ग्रंथ भागवत व महाभारत यापेक्षा श्रीमदभगवदगीतेवर ज्ञानेश्वरी हा भाष्यग्रंथ लिहिला. त्यांनी ज्ञानेश्वरी हरिपाठ या ग्रंथा बरोबर वारकरी संप्रदायाचा पुरस्कार केला. या वारकरी संप्रदायाचे आज बाराशे वर्षा नंतरही पताका तेजाने झळकत आहे. संत ज्ञानेश्वरांनी घेतलेले हे त्रिविध धाडसी निर्णय — ग्रंथ (ज्ञानेश्वरी), पंथ (वारकरी) आणि भक्त (संत मेळा) यांच्या परंपरेची मोठी क्रांती महाराष्ट्राच्या लोकोध्दारा करिता कारणीभूत ठरली आहे. त्यांच्या या अलौकिक कार्याचा परामर्श या शोधनिबंधात मांडला आहे.

**बीजशब्द :** वारकरी संप्रदाय, संत ज्ञानेश्वर, भक्त पुंडलिक, नाथ संप्रदाय, संत मंडळी.

**संत ज्ञानेश्वर पूर्व महाराष्ट्र :**

आज ज्ञानेशांच्या अमृतवाणीचे गोडवे आपण गात असलो तरीही, ज्ञानेश्वरी हा दिव्य सुवर्णांकित साहित्यरत्नकार ग्रंथ तत्कालीन सामाजिक, धार्मिक, राजकीय अमृत मंथनाच्या मुशीतुन निर्माण झालेला महान ग्रंथ होय. ज्ञानेश्वरांचा कालखंड हा तेराव्या शतकातील आहे. तेराव्या शतकात महाराष्ट्रात देवगिरी रामदेवराव यादव यांची कारकिर्द सुरू होती. या काळात धर्माचे अवडंबर पराकोटीला पोहोचले होते. सुमारे दोनहजार पेक्षाजास्त व्रत वैकल्यात समाज गुरफटला होता. यज्ञयाग, जप, तप, उद्यापने, समाराधना यात धर्म श्रध्दा गुंतल्या होत्या. श्रेष्ठ, विद्वान धर्म श्रध्देत रूतले होते. मध्यमवर्गीय अज्ञानाला खिळले होते. सामान्य आणि शूद्र लोक भिती पोटी जाखाई, जोखाई, म्हसोबा, बहिरोबा, वेताळ, मंगळाई इत्यादी शूद्र देवतांच्या भक्तीत स्वत:ला धन्यमानून घेत होते. भूत, भविष्य, जारण मारण, मंत्र तंत्र, मोहिनीविद्या इत्यादींचा प्रभाव वाढला होता. उच्चवर्णीय ज्योतिषविद्या, हस्तमुद्रिका, गायन, वादन, पाककला इत्यादीं मध्ये रमले होते. एकूणच समाजातील ज्ञान विद्या, समाजातील स्वत्वाची बुध्दी लोप पावती होती. अशा परिस्थितीत अन्यधर्मीय या परिस्थितीचा गैरफायदा घेत होते.

संत ज्ञानेश्वरांच्या काळात राज्यातील गावा गावात नाना धर्म पंथांना पेव फुटला होता. हिंदू धर्मातील प्राचीन वैदिक धर्म, भागवतधर्म, नाथ संप्रदाय, दत्त संप्रदाय, समर्थ संप्रदाय, शाक्त संप्रदाय, कापालिक संप्रदाय, श्रावक संप्रदाय, वेदांती संप्रदाय, इत्यादी हिंदूंचे अनेक धर्म संप्रदाय कार्य करीत होते. जैनांचे श्वेतांबर व दिगंबर हे पंथ तर इस्लामांच्या सुफी सांप्रदायिक पंथांचाही प्रसार या काळात होत होता. त्यांचे चिश्ती संप्रदाय सुहरावर्दी संप्रदाय, कादरी संप्रदाय, नक्शबंदी संप्रदाय त्याच प्रमाणे द्वैतवादी व अद्वैतवादी अनेक संप्रदाय उदयाला आलेले होते. चैतन्य संप्रदायातील कवि महाप्रभू यांनी कृष्ण भक्तीला प्राधान्य देऊन आपला ग्रंथ प्रचार केलेला होता. त्यांचे चैतन्य व वैष्णव असे संप्रदाय होते. विरशैव हा बसवेश्वर यांचा संप्रदाय त्याच काळात जोम धरत होता. वैदिक धर्मा बरोबर त्यांचाही प्रसार शक्ती प्रधान म्हणून प्रमुखपंथ होता. या शिवाय शिवोपासक अनेक पंथ बौध्द आणि ख्रिस्ती धर्माचे कुशाण तर्क अकराव्या, बाराव्या शतकापासून हिंदू धर्मावर लक्ष केंद्रित करून काही प्रमाणात आपला धर्म प्रसार करीत होते.

देशातील देशी, विदेशी अस्मितेमूळे मराठी भाषा व धर्म यातील चैतन्य क्षिण झाले होते. समाज मनातील आत्मभाव नाहिसा झाला होता. काम, क्रोधादी षडरिपुंमूळे लोक सुख, सत्य, शांती याला पारखे झाले होते. अशा बिकट परिस्थितीत संत ज्ञानेश्वरांनी भागवत संप्रदायाचा पुरस्कार करून वारकरी संप्रदायाची अध्यात्मिक ध्वजा रोवली. त्यामूळे हिंदू धर्माला लागलेली ओहोटी थांबवून अध्यात्म विचारांची बैठक महाराष्ट्रात निर्माण झाली.

**भागवत धर्माचे पुर्वावलोकन :**

महाराष्ट्रात भागवत धर्माचा प्रचार हा सातवाहन राजांच्या काळापासून म्हणजे इसवी सन पुर्व २३० ते इसवी सन २३० पर्यत अस्तित्वांत होता. त्या नंतर राष्ट्कुट राजांच्या कालावधीतही भागवत धर्माचे अनुयायी होते. मात्र राष्ट्कुट वंशातील एकाही राजाने वैदिक प्रथेप्रमाणे यज्ञयाग किंवा अश्वमेध यज्ञ केलेला आढळत नाही. त्यांनी भागवतधर्मच अंगिकारलेला दिसतो. गावातील देवळांचा जिर्णोध्दार करणे, तळी सरोवर बांधणे, गरिबांकरिता अन्नछत्र उभारणे याला त्यांनी प्राधान्य दिले. ही कर्मप्रधान भागवत धर्मातील भक्ती त्या काळापासून देवगिरीराव यादवांपर्यत (इसवी सन ८५० ते १३१७) या काळापर्यत चालत आलेली दिसते. या काळात कल्याणीचे चालुक्य आणि देवगिरीचे यादव हे स्वत:ला सोमवंशी म्हणत. त्यांचे साम्राज्य नर्मदानदी पासून तुंगभद्रा नदीपर्यत दिसून येते. यादवांना वैदिक परंपरेचा अभिमान होता. चालुक्य अहोमल्ल याने अनेक यज्ञ याग केले होते. त्याने आपल्या उत्तर आयुष्यात तिव्र तापाच्या व्याधीत तुगभद्रेत जल समाधी घेतल्याचाही उल्लेख आढळतो. परंतु अशा प्रथा भागवत धर्मात दिसून येत नाहीत.

तत्कालीन भागवतधर्म म्हणजे भगवंताने सांगितलेला धर्म अशी समजूत होती. भगवंताचे वैष्णव स्वरूप असून हे विष्णुरूप कृष्णावतारी वासुदेव अशा रूपातील होते. म्हणून भागवतधर्म हा भक्तीप्रधान असला

तरी त्यात कृष्णभक्ती केली जाते. ईश्वर भक्तीमूळे माणसाला मोक्ष प्राप्ती होउ शकते असे या धर्माचे मूळ तत्वज्ञान आहे. यातील आचरणाच्या तत्वानुसार साधूसंत हे हिन जातीत जन्माला येऊ शकतात. शिवाय स्त्रि, शूद्र, पशुपक्षी यांना मोक्षाचा अधिकार आहे. भक्ती मध्ये जाती, कुळ, वर्ण, वंश, देश यांचा भेदभाव नसावा. कर्मकांड आणि आचार धमपिक्षा व्यक्तीच्या नैतिक कर्तव्याला श्रेष्ठ मानले गेले पाहिजे अशी विचारसरणी या पंथाची होती. भागवत धर्माचे आदर्श महाभारतातुन दिसून येतात. यातील विचारांचे मतभेद खंडन भगवदगीतेद्वारे केलेले आढळते.

संत ज्ञानदेव हे नाथपंथी योगी होते. ते आपली गुरू परंपरा कथन करताना आदिनाथ —— मत्स्येंद्रनाथ —— गोरक्षनाथ —— गहिनीनाथ —— निवृत्तीनाथ —— ज्ञाननाथ उर्फ ज्ञानेश्वर अशी सांगतात. नाथपंथाचे शक्तीयुक्त शिव हे प्रमुख तत्व होते. नाथपंथ हा भारतातील प्राचीन पंथ आहे. नाथ म्हणजे पाळणारा, रक्षण करणारा या अर्थाने शब्द वापरला जातो. नाथ पंथाचे श्री दत्त व आदि शिव आणि शक्ती हे प्रमुख दैवत आहेत. हा एक योग संप्रदाय असून योग, ध्यान, उपासना, संन्यास, भ्रमंती, तीर्थयात्रा, गुरूभक्ती इत्यादीला प्राधान्य देणारा पंथ आहे. नाथ पंथाच्या अनेक शाखा, उप शाखा आहेत.

संत ज्ञानेश्वर हे नाथपंथी असले तरीही त्यांनी भागवत संप्रदायाचा प्रसार, प्रचार करून वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक म्हणून गाजले होते. नाथपंथीयांचे शैव हे प्रमुख दैवत असूनही संत ज्ञानेश्वरांनी वैष्णव धर्माचा पुरस्कार केला. स्वत: संन्यास धर्म स्विकारलेला असतांनाही लोकांसाठी त्यांनी प्रापंचिकतेचा अंगीकार करणारा वारकरी संप्रदायाचा स्विकार केला. संत ज्ञानेश्वर स्वत: नाथपंथी होते. नाथ पंथातील कठोर आचरण, संन्यासत्वाची दिक्षा, तपाचरण हे सामान्य जनांना कष्टप्रद होईल. शिवाय गृहस्थाश्रमापासून कुटुंबाची फारकत होईल याची त्यांना जाणीव होती. म्हणून समाज उध्दारा साठी त्यांनी वारकरी संप्रदायाचा पुरस्कार केला. वारकरी संप्रदाय हा भागवत धर्माचा उपपंथ म्हणता येईल.

वैदिक धर्माची प्राचीन परंपरा रूढी प्रियता भागवत धर्मामध्ये शिथिल झाली असली तरीही संत ज्ञानेश्वरांनी हा भागवतधर्म जसाच्या तसा पुढे रूजवला नाही. यातील त्रुटी आणि उणिवा दूरकरून बहुजनांचा उध्दारव्हावा या हेतुने वारकरी संप्रदायाचा पुरस्कार केला. हा वारकरी संप्रदाय सर्व समाजा करितासोपा व सुलभ धार्मिक पंथ म्हणून सर्वश्रूत झाला.

**पुंडलिक ते ज्ञानेश्वर भागवताचे दूत :**

संत ज्ञानदेव हे नाथपंथाचे अनुग्रहित होते. त्यांचे ज्ञानेश्वर हे नामकरण वारकरी संप्रदायात झाले. वारकरी पंथातुन भागवत धर्माचे विश्वरूप दर्शन लोकांना घडले. भागवतधर्म हा प्राचीन धर्म असला तरी त्या काळात हवा तितका लोकांमध्ये रूढ झालेला दिसून येत नव्हता. भक्त पुंडलिक हे भागवत धर्माचे आद्य प्रवर्तक होत. ते शिव भक्त होते. त्यांना हर प्रसन्न होऊन त्यांनी एक लोहदंड दिला. हा लोहदंड म्हणजे आदिशक्ती शिवाची कश्पा होती. भगवंताने त्यांना सांगितले की, हा लोहदंड पाण्यात जेथे तरेल तेथे तुला हरिहराचे दर्शन घडेल. त्या प्रमाणे तो लोहदंड पंढरपूरात तरला. त्याच क्षणाला भक्त पुंडलिकाने वाळवंटात ईश्वरा समोर लोळण घातली. तेव्हा पासून नारायण पंढरीत प्रगट झाले असे म्हटले जाते. याचेच वर्णन संत ज्ञानेश्वर आपल्या अभंगात, आला पुंडलिक भक्त राज । तेणे विठठल वोळला सहज । दिधला विठठल मंत्र बिज तेणे झाले सकळ काज गा ।। त्याच वेळी पुंडलिकाने भगवंताला अशी विनंती केली की, सर्व सामान्य मनुष्यमात्रांची संसार बंधने तुटतील, जडजिवांचा पंचमहापातकातुन उध्दार होईल याकरिता आपण मार्ग दाखवावा. त्या वेळेला परमेश्वराने या इच्छा विठठल दर्शनाने पूर्ण होतील असा वर दिला आणि म्हणून तेव्हा पासून भक्त पुंडलिकाला भेटलेला भागवतातील नारायण संत ज्ञानेश्वरांनी सर्व जनांच्या उध्दाराकरिता संत मेळा तयार करणेचा यज्ञ सुरू केला. त्यांनी स्वकश्तीतुन सर्वांना चोख आचरणाचा धडा दिला. वाणी शुध्द आणि प्रभावी असावी, मनुष्य सहकुटुंब भक्ती रसात डुंबणारा असावा, भजन किर्तन नामस्रण हा नित्यनेम असावा. जाती बंधाचे कोणतेही अडसर नसावेत. म्हणून त्यांनी संत मंडळींना सोबत घेऊन रसाळ भाषेत ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहुन वारकरी संप्रदायाची परंपरा सुरू केली. या संतमंडळीत रसाळ भाषेत

रामायणाची रचना करणारा अठरा पगड जातीचे संत होतेच. शिवाय साळया रसाळ तसेच वयाच्या अकराव्या वर्षी वाळवंटात सापडलेला आणि संत संगतीतुन मोठा झालेला वत्सराही होता. कुर्मदास लक्षाधिपती धनी असूनही द्रव्याचा व्यवसायिक जगामित्र नागा हाही संत मंडळीत होता. जोगा परमानंद हा मंगळवेढयाचा संत तर जातीने महार असलेला चोखामेळा. त्याची पत्नी सोयरा, मुलगा कर्मा, बहिण निर्मला यांनी अनेक तीर्थयात्रा केल्या. पण अखेर चोखा म्हणे पाहतां । पंढरी भुवैकुंठ । मनाचे हे कष्ट । दूर झाले । असे म्हणून पंढरपूरचा गौरव केलेला आहे. संत ज्ञानेश्वरांनी पुंडलिकाची भागवत भक्ती समाजा पुढे आदर्शवत ठेऊन वारकरी संप्रदायाचा विशाल वक्ष उभा केला. यामूळे महाराष्ट्राला धार्मिक, अध्यात्मिक वैभव प्राप्त झाले. पण त्या शिवाय छत्रपती शिवाजी महाराजां सारखे राजकीय जाणते राजे लाभले.

**वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू : संत ज्ञानेश्वर :**

भक्त पुंडलिक हे भागवत धर्माचे संस्थापक होते. परंतु भागवत धर्माला वारकरी पंथाद्वारे पूर्णत्व संत ज्ञानेश्वरांनी दिले. संत ज्ञानेश्वरांनी संत मंडळींना सोबत घेऊन वारकरी संप्रदायाचा मेळा उभा केला. याचे वर्णन, संत कृपा झाली। इमारत फळा आली । ज्ञानदेवे रचिला पाया । बांधियेले देवालया । नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार । जनार्दनी एकनाथ । स्तंभ दिला भागवत । भजन करा सावकाश । तुका झालासे कळस । वरील अभंग हा भागवत धर्माच्या परंपरेचा ज्ञानदेव ते तुकारामांच्या कार्याचा उल्लेख केलेला आहे. संत ज्ञानेश्वरांनी संत मंडळींच्या कश्पेने भागवत धर्माची पताका हातात घेतली. संत ज्ञानेश्वर हे संन्यासी होते. त्यांनी गश्हस्थाश्रमीय लोकांना उपदेश करण्यापेक्षा वैराग्य प्राप्ती कशी होईल याचे ज्ञान दिले व कुटुंब वत्सलतेचा अनुभव संत नामदेव आपल्या अभंगातुन सांगतात. ही जगरहाटी न टाळता संसार पूर्ण कसा करावा याचे महत्व एकनाथांनी आपल्या अभंगातुन मांडले. पण संसाराचा लोभ न धरता भक्ती आणि ज्ञान कसे मिळवावे, आप्तेष्टांची काळजी घेऊन स्वत: मध्ये निस्सिमता कशी येईल याचे उदाहरण तुकाराम आपल्या जिवनातुन मांडतात. म्हणूनच वरील अभंग हा भागवत भक्तांनी भागवत धर्माचे मंदिर कसे उभारले याचे वर्णन करणारा आहे. तो वारकरी संप्रदायाचा आदर्श आहे. संत ज्ञानेश्वरांनी त्या काळातील सर्व संतांकडून कमी अधिक प्रमाणात भजन किर्तन अभंग रचना करून घेतल्या. त्यामूळे वारकरी संप्रदाय अधिक लोकप्रिय झाला. प्रत्येक संतांना काव्यस्फूर्ती देऊन महाराष्ट्रातील जनतेला आधार दिला. म्हणून वारकरी संप्रदायाचे संत ज्ञानेश्वर हे अध्वर्यू होते.

वारकरी संप्रदायाच्या परंपरेमध्ये अनेक संतांचे कार्य मोलाचे आहे. त्या संतांनी वारकरी संप्रदायाला खऱ्या अर्थाने समृध्दी प्राप्त करून दिली. वारकरी संप्रदायातील संत आणि त्यांची परंपरा काळानुरूप ओळखली जाते. सर्व प्रथम ज्ञानदेव ते नामदेवांचा कालखंड. हा कालखंड सुमारे तेरावे ते चौदाव्या शतका पर्यतचा मानला जातो. या कालखंडात संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाची एक स्वतंत्र किर्तन परंपरा सुरू केली. ही परंपरा आजही प्रचलित आहे. पंढरपूरमध्ये विठठलाचे किंवा संतांचे महात्म्य सांगणे ही प्रथा त्यांनी सुरू केली. नामदेवांनी या पंथाचा प्रसार पंजाबापर्यत पोहोचवला. त्यांनी अनेक संतांची चरित्रे, आत्मचरित्रे लिहिली. या काळात संत गोरोबा काका, संत सावता माळी, संत चोखा मेळा, नरहरी सोनार, सेना न्हावी, सोपानदेव, सोयराबाई, विसोबा खेचर, चांगदेव, परिसा भागवत, बंका महाराज आणि इतर अनेक संत होते. या संत परंपरेत त्यांचे कुटुंबही उदाहरणार्थ एकनाथ महाराजांचे आजोबा भानुदास व अनेक कुटुंबिय सहभागी होते. ज्ञानदेव, नामदेवांचा हा कालखंड म्हणजे वारकरी संप्रदायाचा श्रीगणेशा होता.

वारकरी संप्रदायाच्या पंधराव्या सोळाव्या शतकामध्ये संत एकनाथांचा कालखंड उदयाला आला. संत एकनाथ हे पैठण निवासी होते. अध्यात्म्याची बैठक आणि वैदिक धर्माचा अभ्यास याचे ते जाणकार होते. एकनाथ महाराजांनी सनातनी क्षेत्रात राहूनदेखील कर्मठतेला विरोध करणारा वारकरी संप्रदाय स्विकारला. त्यांनी ज्ञानेश्वरीची शुध्द प्रत तयार केली. एकनाथी भागवत हा त्यांचा प्रमुख ग्रंथ होता. त्यांनी केलेल्या रचना व अभंग यामूळे संत एकनाथांनी वारकरी संप्रदायाचा भागवत रूपी खांब उभा केला असे म्हटले जाते.

संत एकनाथां प्रमाणेच भागवत धर्माला आपले आयुष्य पूर्णपणे वेचणारे संत म्हणजे संत तुकाराम महाराज होय. संत तुकारामांनी विठ्ठल भक्तीचा जणुकाही कळसच उभा केला. संत तुकारामांच्या काळात संताजी जगनाडे, रामेश्वर भटट, निळोबा राय, आदि संत पुरूष होऊन गेले. यांनी वारकरी संप्रदायाचा मोठा प्रचार व प्रसार केला. तुकारामांच्या उत्तर काळात संत नामदेवांच्या वंशजांनी गावोगाव फड उभे केले. त्यातून भगवदभक्ती, वारकरी संप्रदाय याचे किर्तन, भजन सुरू ठेवले. महाराष्ट्रातील अनेक गावागावातुन ही परंपरा सुरू झाली. ही परंपरा आजपर्यत समाजामध्ये प्रचलित आहे.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकात वारकरी संप्रदायाचे उदात्तीकरण झाले. यामध्ये ब्रिटीश काळातील अनेक जाणकार अभ्यासू यात सहभागी झाले. महिपतीबुवा ताहराबादकर, निळोबाराय, मल्लापा वासकर यांच्या पासून गोपाळबुवा, हैबतराव बाबा इत्यादींनी वारकरी संप्रदायाच्या लेखनाची परंपरा अबाधित ठेवली. या शिवाय पुंडलिक बुवा, प्रल्हाद भाऊ बडवे, बाबा पाध्ये, सखाराम बुवा अंमळनेरकर, मार्तंड बापू आळंदीकर, वासुदेव बुवा देहूकर वगैरे मंडळी होऊन गेली. विसाव्या शतकामध्ये भाऊसाहेब काटकर, नाना महाराज साखरे, विष्णुबुवा जोग यांनी वारकरी संप्रदायाचा, त्यातील विशेषत: ज्ञानेश्वीरचा अभ्यास करून भजन, किर्तनाचा व वारी प्रथेचा पुनरूच्चार केला.

वरील संतांच्या जन्म स्थानी आजही यात्रा भरतात. या यात्रेतुन वारकरी पंढपुरला येतात. म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्रातुन वारकरी संप्रदाय वाढीस लागलेला आहे. वारकरी संप्रदायाचे आज प्रमुख चार संप्रदाय आहेत. (१) चैतन्य, (२) स्वरूप, (३) आनंद, (४) प्रकाश. यांचा प्रमुख मंत्र रामकृष्णहरी असून काही ठिकाणी ओम नमो भगवते वासुदेवाय दिसून येतो. वारकरी संप्रदायातील प्रमुख संतांचे समाधी स्थान आजही प्रसिध्द असून त्या त्या स्थानातुन पंढरपूरकडे आषाढी एकादशीला वारी निघते व तीच वारी कार्तिक महिन्यात संतांच्या मूळ समाधी स्थळी परत येते. ती प्रमुख स्थाने खालील प्रमाणे :

निवृत्तीनाथांचे त्रयंबकेश्वर, ज्ञानेश्वरांची आळंदी, सोपानदेवांचे सासवड तर मुक्ताबाईची दिंडी एदलाबाद येथून येते. विसोबा खेचर, नामदेव यांची वारी पंढरपूरातुन निघते तर गोरा कुंभारांची तेरढोक, जिल्हा उस्मानाबाद येथून निघते. सावतामाळींची अरणभेंडी तर नरहरी सोनार, चोखा मेळा, जनाबाई यांची पंढरपूरातुन निघते. जगमित्रा नागा यांची निघणारी वारी ही परळी वैजनाथ येथून निघते. कुर्मदास यांची लऊळ वरून आणि चांगदेवांचे पुणतांबे येथून वारी निघते. भानुदास व एकनाथ यांची पैठण वरून वारी निघते. राघव चैतन्य यांची ओतुर वरून तर केशव चैतन्य यांची गुलबर्गा (कर्नाटक) येथून वारी पंढरपूरला येते. संत तुकारामांची देहूमधून वारीनिघते तर निळोबाराय यांची पिंपळनेर वरून येते. बोधले बुवा हे तुकारामांचे समकालीन असून मुकुंदराजांची वारी अंबेजोगाई येथून पंढरपूर कडे येते. या सर्व वा—या मिळुन लाखो भाविक आषाढी एकादशीक पंढरपूर मध्ये येतात. या प्रमुख वाऱ्या असून या शिवाय इतरही अनेक ग्रामस्थातुन वाऱ्या काढल्या जातात व या सर्वाचा एकच वारकरी मेळा पंढरपूरात एकादशीच्या दिवशी श्री पांडुरंग भक्तीने एकरूप होतो. भक्त पुंडलिकाने लावलेली भागवताची वेल संत ज्ञानेश्वरांनी गगना वर जाणारे रोप तयार केले. आज एकविसाव्या शतकातही सुमारे बाराशे वर्षा नंतर लाखो भाविक ज्ञानोबा तुकोबांच्या नावाने पंढरपूरात एकरूप होताना दिसतात. ही वारी परंपरा आज आंतरराष्ट्रीय स्तरा वर पोहोचलेली आहे.

महाराष्ट्रातील धार्मिक, राजकीय, आर्थिक स्वरूपातील मोठी उलाढाल या काळात होते. वारकरी संप्रदायाच्या वारीचा अभ्यास हा पाश्चात्य देशातील अनेकांचा कौतुकाचा विषय आहे. वारी या विषयातील अर्थ व्यवस्था, व्यवस्थापन, समायोजन आणि नियोजन अशा विविध उप विषयांवर शोधनिबंध सादर करण्यात आलेले आहेत. सन २०१५ मध्ये मुंबई येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठालतील सहाय्यक प्राध्यापकांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर शोधनिबंध सादर केला. त्याचे सादरीकरण इंग्लंड मधील ऑक्सफर्ड विद्यापीठ व दिनांक ५, ६ जुलै, २०१५ रोजी जर्मनी मधील बर्लिन येथे जागतिक परिषदेत सादरीकरण केले. या शिवाय अनेक विद्यापीठांमध्ये संतसाहित्य, वारकरी संप्रदाय,

वारकरी परंपरा यावर प्रबंध सादर करण्यात आलेले आहेत. या शिवाय बदलत्या काळातील परंपरा लक्षात घेऊन मामासाहेब तथा शं. वा. दांडेकर यांनी किर्तनाच्या प्रशिक्षणा साठी जोगमहाराज वारकरी शिक्षण संस्था स्थापन केली. या संस्थेने शतक महोत्सव साजरे केले असून अनेक संतांचे वंशज या संप्रदायाला सामर्थ्य देण्यासाठी अभ्यास व परंपरा लोकां पर्यत पोहोचवत आहेत. वारकरी संप्रदाय हा प्राचीन संप्रदाय राहिला नसुन तो आधुनिक काळातील समाजप्रिय व लोकप्रिय संप्रदाय ठरलेला आहे. या संप्रदायाचे, 'देव गुज सांगणे पंढरीस जारे । प्रेमसुख घ्या रे नाम माझे । असे संत नामदेव महाराजांनी म्हटलेले पंढरपूरचे वर्णन आजही अनुभवाला मिळते. तेथील विठठलाचे दर्शन म्हणजे संत तुकाराम महाराजांनी म्हटल्या प्रमाणे 'गिता जेणे उपदेशिली । तेची विटेवरी माउली । याची प्रचिती आजही येते. म्हणूनच संत ज्ञानेश्वरांनी सुरू केलेला वारकरी संप्रदाय आज केवळ वारकरी यांच्या पुरता मर्यादित न राहाता तो सर्वश्रुत झाला आहे.

**वारकरी संप्रदाय प्रसार आणि प्रचार :**

वारकरी हा शब्द वारी या शब्दा वरून प्रचलित झाला आहे. वारीला ज्ञानेश्वरी येरझारा असा शब्द प्रयोग केलेला आहे. वारी म्हणजे नियमितपणे यात्रेला जा ये करणे तसेच व्रत, यात्रा, फेरी म्हणून समानार्थी शब्द वापरले जातात. वारकरी संप्रदाया मध्ये आषाढी व कार्तिकी एकादशी निमित्त दर्शनाला जाण्याची प्रथा आहे. त्या करिता प्रत्येक गावातुन पदयात्रेने निघणा–या भक्त मंडळींच्या जत्थेला वारी असे म्हटले जाते. आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर पर्यत केलेली पदयात्रा म्हणजे वारी होय. वारी करणारा तो वारकरी. पायी वारी करण्याची प्रथा ज्ञानेश्वर पुर्व काळा पासून दिसून येते. संत मेळ्यातील प्रमुख संतांच्या गावातुन आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूराच्या दिशेने पालखी निघते. त्याला आषाढी वारी असे म्हणतात. त्याच पालख्या पंढरपूरातुन संतांच्या मूळ स्थानी परत येतात. त्यांना कार्तिकी वारी असे म्हणतात. वारी मध्ये केवळ वारकरीच सहभागी असतात असे नसून गावातील धार्मिक मंडळे व संस्था भक्त मंडळी विठठलाला दैवत मानणारे सहभागी होतात. म्हणून या वारीला दिंडी असे म्हटले जाते. या दिंडीचे नियोजन पूर्णपणे केलेले असते. त्यांचे निवास, प्रस्थान, भोजन, इतर व्यवस्था जागोजागी अगोदरच केलेली असते. दिंडी मध्ये त्याची व्यवस्था पाहाणारे प्रमुख नेमलेले असतात.

वारकरी हा भगवान विष्णुचा अवतार मानला जातो. त्यांची प्रमुख देवता विठठल किंवा विठोबा असल्यामूळे विष्णु व श्रीकृष्णाचे रूप, वासुदेवाचे रूप मानले जाते. याच अर्थाने पंढरपूरला भारतातील दक्षिण द्वारका असे संबोधले जाते. वारकऱ्यांचा पोषाख हा शुभ्र धुत व स्वच्छ असतो. वारकरी नित्य नेमाने नामस्मरण करणारा हरिनाम घेणारा असतो. भगवंताचे विस्मरण होउ नये म्हणून त्याने गळयात तुळशीची माळ घालुन त्याचा वापर जपा करिता करावा असे संकेत आहे. वारकरी संप्रदायाच्या भाळी गोपीचंदनाचा टिळा नित्य नेमाने असावा असा दंडक आहे. हरिपाठ, संतग्रंथ, भजन, किर्तन यात त्यांनी रमावे. वारकरी संप्रदायाचे महावाक्य हे पुंडलिक वरदा हरी विठठल श्री ज्ञानदेव तुकाराम पंढरीनाथ महाराज की जय हे असून प्रत्येक वारक–याच्या मुखी राम – कृष्ण – हरी हे नाम सदोदित असावे. वारकरी संप्रदायाच्या मते विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म । भेदाभ्रद भ्रम अमंगळ । हे तत्व सर्वत्र सांभाळले जाते. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेला ज्ञानेश्वरी ग्रंथ व हरिपाठ हे वारकरी संप्रदायाचे प्रमुख ग्रंथ असून या ग्रंथाने सुमारे बाराशे वर्ष महाराष्ट्रा वर अधिराज्य गाजवले आहे. ही संत ज्ञानेश्वरांची वारकरी संप्रदायाची किमयाच म्हणावी लागेल. हा वारकरी संप्रदाय आजही प्रचलित असून जागृत संप्रदाया पैकी एक प्रमुख पंथ म्हणून मानला जातो.

संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा अंगिकार केला नसता तर महाराष्ट्राला धार्मिक प्रथां पासून लांब जावे लागले असते. अथवा वैदिक परंपरांच्या रूढी प्रथांच्या अधिन रहावे लागले असते. राजकीय आणि सामाजिक परिस्थिती बघता महाराष्ट्राला ज्ञानेश्वरांनी दिलेली ही धार्मिक देणगी म्हणजे महाराष्ट्राच्या लोकोध्दारासाठी घडविलेली मोठी क्रांती आहे. वारकरी संप्रदाया शिवाय महाराष्ट्र हा परकीय आक्रमणांच्या किंवा परावलंबीत्वाच्या छाये खाली लुप्त झाला असता. सर्वसामान्य लोकांच्या मनात स्वत्वाची जाणीव मीत्वाचे अधिकार केव्हाही जागृत झाले नसते. म्हणून ज्ञानेश्वर हे खऱ्या अर्थाने ज्ञानदेव होत. महाराष्ट्राचे व वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू आहेत.

**निष्कर्ष :**

(१) संत ज्ञानेश्वरांनी पारंपारीक नाथ संप्रदायाला स्वत: दिक्षा घेतलेली असूनही पुढे न आणता भागवतधर्म स्विकारला. परंतु भागवतधर्माचीगीता राष्ट्रासमोर

ठेऊन क्रांतीकारी (टाळकरी नव्हे) वारकरी महाराष्ट्र उभा करण्यासाठी ईश्वरी अवतार घेतला होता.

(२) संत ज्ञानेश्वर हे केवळ संत नव्हते तर ते दूरदृष्टी असणारे धर्म संस्थापक होते.

(३) संत ज्ञानेश्वरांनी पारंपारीक धर्म संप्रदायांना छेद देऊन वारकरी संप्रदायाची गुढी उभी केली.

(४) या संप्रदायाने तत्कालीन महाराष्ट्रातील हतबल, दिशाहिन समाज मनाला जागे करून पताका खांदयावर दिल्यामूळे महाराष्ट्राच्या राष्ट्र उभारणीचे मोठे कार्य घडले.

(५) वारकरी संप्रदाय हा आज बाराशे वर्षानंतरही खंबीरपणे उभा आहे व राष्ट्र समाज उभारणीसाठी काळानुरूप बदल घडुन पुढे वाटचाल करीत आहे. त्यामूळे संतकार्य आजही यातुन दिसून येते.

(६) वारकरी संप्रदायाने घडविलेला महाराष्ट्र हे लोकोध्दाराचे एक प्रमुख आदर्शरूप मानावे लागेल. कारण अन्य संप्रदाय काळाच्या ओघात क्षिण झालेले दिसतात.

**संदर्भ :**

(१) भावे, वि. ल. महाराष्ट्र सारस्वत, आवृत्ती पाचवी. संपादक श्री शं. गो. तुळपुळे. १८८५, पुणे.

(२) नासिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वांडमयाचा इतिहास. अजब पुस्तकालय, प्रथम आवृत्ती, १९७२, कोल्हापुर.

(३) सहस्त्रबुध्दे उ. ग. महाराष्ट्र सामाजिक सांस्कृतिक स्थित्यांतराचा इतिहास, खंड १, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

(४) मोरे सदानंद, देहूकर श्रीधर बुवा, श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा, उगम व विकास, श्री विठठल रखुमा देवी देवस्थान, देहू. प्रथम आ, १९९५, पुणे.

(५) पेंडसे रा. दा. महाराष्ट्राची भागवतधर्म, ज्ञानदेव आणि नामदेव कॉंटीनेंटल प्रकाशन, आवृत्ती दुसरी, १९७२

(६) देशमुख न. बा. श्री ज्ञानेश्वर दर्शन, वांडमय उपासना मंडळ, अहमदनगर, आवृत्ती पहिली, १९३४

(७) भावे वा. कृ., मुसलमान पुर्व महाराष्ट्र, खंड १, श्री संभाजी साहित्यमाला, आवृत्ती पाचवी, पुणे, १९४६

**09**

# संत साहित्यातून होणारे सामाजिक प्रबोधन

**डॉ. ज्योती परब**
शैलेंद्र एज्युकेशन सोसायटी,
दहिसर (पूर्व), मुंबई

*********

**प्रास्ताविक :**

संत साहित्य आणि समाज या संबंधाबरोबरच प्रबोधन याचा काही परस्परसंबंध आहे काय? असा एक प्रश्न उपस्थित केला जातो 'प्रबोधन' याचा अर्थ मध्ययुगीन काळात समाजाच्या शरीरात साठलेले जडत्व आणि विस्कळीतपणा यांच्याविरुद्ध उसळलेली प्रतिक्रिया म्हणजे प्रबोधन अभिप्रेत आहे. समाजहितांचं उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून त्यासाठी लोकमानसात केलेल्या जागृतीला संतांचं समाजप्रबोधन म्हणायला हरकत नसावी. पारमार्थिक सुखाची प्राप्ती हे अंतिम उद्दिष्ट असले तरी त्यांच्या पारमार्थिक दृष्टीला लौकिक जीवनाचे अधिष्ठान होते भौतिक दुरावस्था व मानसिक गुलामगिरी यामुळे सामान्य जनता अगतिक बनली होती. या केविलवाण्या स्थितीतून तिला मुक्त करण्यासाठी वा सामाजप्रबोधनासाठी संतांची भक्ती चळवळ उदयाला आली भक्ती चळवळीतून सामाजिक जीवनातील मूलभूत प्रश्नांचा प्रत्यक्ष हात घातलेला नाही किंवा आर्थिक संघर्षालाही वाचा फोडली नाही तरीही शास्त्रप्रामाण्याला व जातिव्यवस्थेला धक्का न लावता स्त्रीशूद्रांदिकांना आत्मविकासाच्या मनोबलाचा मार्ग खुला करण्याचा प्रयत्न केला हे सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. लौकिक जीवनातील कर्तव्ये दुर्लक्षित करावे असे संतांनी म्हटले नाही. गृहस्थाश्रमाची कर्तव्ये पार पाडून लौकिक सुखदुःखे भोगूनच परमार्थमार्गाची वाट धरावी अशी त्यांची भूमिका राहिलेली आहे.

ही पार्श्वभूमी समजून घेतल्याशिवाय संतांनी

# Hemchandracharya International E - Journal of Research

Most Referred & Peer Reviewed Multi Disciplinary E-Journal of Research


## Certification of Publication

The Board of

Hemchandracharya International E - Journal of Research is hereby awarding this certificate to

**Dr. Chandrashekhar Atmaram Bhagat**

In recognition of the publication of the paper entitled

**"कोरोनाच्या जागतिक आपत्तीमुळे महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेवर झालेला परिणाम"**


Published In Hemchandracharya International E - Journal Of Research, UGC Approved ISSN: 2456-558X Published in Volume 6, Issue 11, January 2022.


**EDITOR IN CHIEF**

**Certificate No.: 6110122103**

January, 2022
Volume-6, Issue-11
ISSN 2456-558X

# HEMCHANDRACHARYA INTERNATIONAL E JOURNAL OF RESEARCH

Most Referred & Peer Reviewed
Multi Disciplinary E Journal of Research

**Chief Editor**
**Dr. Dinesh R. Chavda**
**(M.com., B.ed.,GSET.,M.phil.,Ph.D)**
Assistant Professor,
**(Accountancy)**
**Department of Commerce & Management,**
**Bhakt Kavi Narsinh Mehata University,**
**Junagadh, Gujarat, (India)**

CO-EDITOR
**P. R. Sharma**

Director
Dr. Rajeshkumar A. Shrimali

HEMCHANDRACHARYA
INTERNATIONAL
E JOURNAL OF RESEARCH

JANUARY: - 2022,
VOLUME-6, ISSUE-11

# INDEX

| Sr. | Title | Page |
|---|---|---|
| 1. | A Case Study on Asian Paints Industry by SWOT Analysis<br>- Vinod K. Parghi, Dr. Dineshkumar R. Chavda | 01-11 |
| 2. | ઉમરગામ તાલુકાની ઉચ્ચત્તર માધ્યમિક શાળામાં અર્થશાસ્ત્ર વિષયમાં અધ્યયન - અધ્યાપનની સમસ્યાઓનો અભ્યાસ<br>- આહિર રમેશભાઇ ડાહ્યાભાઇ | 12-18 |
| 3. | Impact of Financial Leverage on Valuation of Firm of Selected FMCG Companies of India<br>- Mr. Amitkumar B. Vegad, Dr. Alok Chakrawal | 19-25 |
| 4. | A Study On Impact Of Digital Marketing On Market Innovation<br>- Ankita Bhatt | 26-30 |
| 5. | ડાંગ જિલ્લામાં આદિજાતિ લોકો પર થયેલ જંગલ આધારિત પ્રવૃત્તિની અસરોનો અભ્યાસ. (એ.કે.આર.એસ.પી. (આઈ) ના કાર્યાન્વિત ગામોના સંદર્ભમાં)<br>- શ્રી ભાગ્યવાન સોલંકી, ડૉ.દિપકભાઈ ભોયે | 31-35 |

| Sr. | Title | Page |
|---|---|---|
| 6. | An Analytical Study on Impact of Demonetization on Indian Economy<br>-Bhautik K. Nagariya, Dr. Kapilkumar Dave | 36-45 |
| 7. | 'નદીગાન' - નૈસણગિક મનરૂપણના મનબાંધો<br>- ચાંડપા ભાવના | 46-49 |
| 8. | ગુજરાતી સાહિત્યમાં રામાયણ અને મહાભારતનો પ્રભાવ<br>- ચુડાસમા નિર્મળા દુદાભાઈ | 50-52 |
| 9. | महीप सिंह की कहानियों में शिक्षा जगत की स्थिति<br>-देवांगी ए. राजन | 53-55 |
| 10. | Research paper on Innovation and Current trends in E – Commerce<br>- Dhara Chauhan, Dr. Urvashi J. Devmurari | 56-62 |
| 11. | A Study of Educational Problems Faced by Students Under Integrated Education Programme<br>- Dharmin H. Patel | 63-69 |
| 12. | Analytical Study of Issues and Challenges of Higher Education in Pandemic Situation of Covid-19<br>- Dharmisthaben R. Chauhan | 70-74 |
| 13. | વર્ષા અડાલજા કૃત"ઝાંઝર"વાર્તામાં વાર્તાનાયિકાનો મનોસંઘર્ષ<br>- દીપીકા જી. સોલંકી | 75-77 |

| Sr. | Title | Page |
|---|---|---|
| 14. | પર્યાવરણ ચેતના<br>- Dr. Malti Patel | 78-81 |
| 15. | Investment, Innovation and Growth: Mutual Fund as A Growth Indicator in India<br>- Dr. Kirit Makwana, Tushar K. Rana | 82-91 |
| 16. | Declining Cities in The Race to Improve Quality of Life Environmental Sustainability<br>- Dr. Jayaben H. Vadhel | 92-99 |
| 17. | પ્રાથમિક શિક્ષણમાં નવિનીકરણનો પાયો- રાષ્ટ્રીય શિક્ષણનીતિ-2020<br>- Sangitabahen Natvarbhai Chaudhary, Dr. Pritiben Chaudhari | 100-105 |
| 18. | National Education Policy (NEP 2020) and Higher Education<br>- Dr. Shaheena Rasool, Dr. Sabina Rasool | 106-109 |
| 19. | Innovations and Innovative Practices in Teaching at Undergraduate Level<br>- Ms. Shital Prabhakar Aher, Mr. Vikas Nimba Bachhav | 110-113 |
| 20. | A Study of Difference in Learning of Grade XI Commerce Students Based on Gender through audio- visual method in Panchmahal District, Gujarat<br>- Ms. Ekta Shah, Dr. Bharati Thaker | 114-119 |
| 21. | SOLUTION OF RICCATI TYPE DIFFERENTIAL EQUATIONS<br>- Gaurav N. Darekar, Dr D. P. Patil | 120-123 |
| 22. | भारतीय ऑटोमोबाइल उद्योग का इतिहास एवं विकास क्रम- एक अध्ययन<br>- गोरधन जाटव | 124-130 |

| Sr. | Title | Page |
|---|---|---|
| 23. | ગુજરાતનાં રાજ-રજવાડાંઓએ શાસ્ત્રીય સંગીત ક્ષેત્રે આપેલ અનન્ય પ્રદાન - હયાતી ડી. વૈદ્ય, ડૉ. શ્વેતકેતુ એ.વોરા, & ડૉ. વિરાજ અમર | 131-138 |
| 24. | Earning Language And Literature Through Film Adaptations - Imteyaz Ahmad Khan | 139-143 |
| 25. | An Analytical Study On Csr Activities Of Selected Companies Listed On Bombay Stock Exchange - Jinal P. Solanki, Prof. P.S. Hirani | 144-148 |
| 26. | A Study of Perception on Role of Auditors: An Analysis of Major Scams of India - Kinjal Mistry, Dr. Jayendrasinh Jadav | 149-156 |
| 27. | Nutritional Interventions During Pregnancy and Its Effects - Ms. Krishna D. Thakkar, Dr. Mita R. Rajpura | 157-162 |
| 28. | IMPACT OF 8 WEEKS AEROBIC AND YOGIC TRAINING ON PERIPHERAL OXYGEN SATURATION - Loitongbam Baby Sujata Devi, Takhellambam Inaobi Singh | 163-172 |
| 29. | Modern and Effective Teacher - Dr. Mukeshbhai Naginbhai Tandel | 173-178 |
| 30. | Evaluating impact of GST on Selected Sectors of Indian Economy - Mahebubkhan A. Baloch, Dr. Arvind M. Gajera | 179-185 |
| 31. | Relationship Between Working Capital Management and Profitability of Pharma Companies - Mahipal Bharatbhai Ram | 186-192 |

| Sr. | Title | Page |
|---|---|---|
| 32. | Role of Panchayati Raj Institutions in the struggle against Covid -19 (Special study with reference to the state of Rajasthan)<br>- Mangi Lal | 193-198 |
| 33. | The Problems of Teaching and Learning English Language in Rular Area of Selected District of Gujarat<br>- Manisha J. Baldaniya | 199-207 |
| 34. | SOCIAL DISPARITY AND IDENTITY CRISIS DEPICTED IN KIRAN DESAI'S HULLABALOO IN THE GUAVA ORCHARD AND THE INHERITANCE OF LOSS<br>- Mehulbhai P. Makwana, Dr. Manish A. Vyas | 208-215 |
| 35. | Financial Inclusion and Fintech solutions in sailing through the Covid 19 Pandemic<br>- Mr Chicoh Kampaundi | 216-221 |
| 36. | COMPARATIVE ANALYSIS OF CAPIAL STRUCTURE OF SELECTED STEEL COMPANIES IN INDIA<br>- Mrs. Charmy R. Gandhi | 222-231 |
| 37. | CUSTOMER SATISFACTION IN BANKING SECTOR - A CASE STUDY OF STATE BANK OF INDIA<br>- Ms. Jignasha. V. Patel, Dr. Chetankumar C. Patel | 232-246 |
| 38. | ADOPTION OF E-COMMERCE AND ITS IMPACT ON BUSINESS PERFORMANCE OF MSME'S SUBTITLE: A STUDY WITH REFERENCE TO MANGALURU TALUKA<br>- Ms. Meghana, Ms. Harini P Poojary | 247-252 |

| Sr. | Title | Page |
| --- | --- | --- |
| 39. | Self-Actualization in Graduate Students among Bhuj City<br>- Garva Neha Ramjibhai | 253-257 |
| 40. | A STUDY ON THE IMPACT OF COVID-19 ONINVESTMENT BEHAVIOUR OF INDIVIDUALS IN GUJARAT STATE<br>- Neha Ratapia | 258-269 |
| 41. | THE IMPACT OF CREDIT MANAGEMENT IN ICICI BANK<br>- Oriya Surabhi Hareshkumar | 270-275 |
| 42. | ધોરણ ૭નાં ગુજરાતી વિષયનાં પાઠ્યપુસ્તકમાં આવરાયેલી ભારતીય સંસ્કૃતિની લાક્ષણિક્તાઓ<br>- Pareshkumar J. Kalsariya | 276-283 |
| 43. | TEACHING SOFT SKILLS THROUGH ENGLISH LANGUAGE TO MAXIMIZE CAREER SUCCESS FOR ENGINNERING STUDENTS: THE NEED OF AN HOUR<br>- Prashanth N S, Rajashekara M N | 284-288 |
| 44. | Anthropometry of Hand in Stature Determination – A review of Literature<br>- Pratiksha Mer, Dr. Ankita Patel | 289-299 |
| 45. | Virtual Labs-A Technological Innovation in Science Experiments<br>- Pravinkumar Jadhav, Smt. M.S. Sonawane | 300-305 |
| 46. | Analytical study on Torrent Pharmaceuticals by using Data-Envelopment Analysis Model<br>- Ramani Harsha | 306-311 |

| Sr. | Title | Page |
|---|---|---|
| 47. | Safe and Reliable Land Title Registration using Blockchain<br>- Asst. Prof. Rameshwari M. Hullule | 312-323 |
| 48. | AN ANALYTICAL STUDY ON CASH MANANGEMENT PRACTICES OF SELECTED FMCG COMPANIES<br>- Nakum Dilipkumar Hansraj Dr. K. P. Damor | 324-334 |
| 49. | Teacher education in the light of NEP 2020<br>- Sana Bashir | 335-349 |
| 50. | A study of personality traits of students of Standard -10<br>- Sheetal Jagdishchandra Soni | 350-357 |
| 51. | Bhagavad Gita: Mahatma Gandhi's believe, belief, and Bonafide theosophical Treatise<br>- Parth R. Maheta | 358-362 |
| 52. | Comparative Cash Flow Statement Analysis between Pharmaceuticals Companies: Sun Pharma Ltd and Cipla Ltd<br>- Sikh Simran Bhupender Singh | 363-374 |
| 53. | ગ્રામ પંચાયત અને સામાજિક ન્યાય<br>- સિધ્ધાર્થકુમાર કે. ચાવડા | 375-386 |
| 54. | Awareness towards Digital Citizenship of Secondary and Senior Secondary School Students<br>- Subhashini Sundara Raman | 387-401 |

| Sr. | Title | Page |
|---|---|---|
| 55. | A way of living: Aristotle's view<br>- Sudharshan Das | 402-407 |
| 56. | An Analytical study of liquidity position of selected private sector banks in India<br>- Urvashi Chhaiya, Kiran Somaiya | 408-420 |
| 57. | A STUDY ON FACTORS AFFECTING BRAND LOYALTY IN CASE OF FMCG IN RAJKOT CITY<br>- Vandna H. Gurubaxani | 421-427 |
| 58. | STUDY THE EFFECT OF COVID-19 IN INDIAN BANKING SECTOR<br>- Varshabahen C. Patel | 428-433 |
| 59. | Study on pre-purchase behaviour of consumers for the purpose of purchasing life insurance products - in the context of Rajkot city<br>- Vasani Sureshbhai V. | 434-442 |
| 60. | Analysis and correlation of Microwave dielectric constant and Physicochemical Properties of soil around industrial area in NMDC Dantewada of India<br>- Vijay Sahu, Ashutosh Pandey | 443-451 |
| 61. | SARS - CoV-2: Understanding the Amino Acid sequence and Protein Folding using Bio-python<br>- Viraaj Kumar Kulshreshtha | 452-468 |
| 62. | Political Leadership in India<br>- Virendra Murlidhar Gharde | 469-475 |

| Sr. | Title | Page |
|---|---|---|
| 63. | શિક્ષણ વિદ્યાશાખાના પ્રશિક્ષણાર્થીઓના વ્યક્તિત્વનો અભ્યાસ<br>- વ્યાસ અંકિતા આર. | 476-487 |
| 64. | गांधीजी एवं शिक्षा<br>- परेश एम. जोषी | 488-491 |
| 65. | માનવનું પ્રથમ રહેઠાણ: ગુફાઓ<br>- ડૉ. કુમારપાળ પરમાર | 492-494 |
| 66. | ભારતીય ટૂંકીવાર્તામાં સ્ત્રી સર્જકોનું પ્રદાન<br>- અમિતાકુમારી પ્રતાપભાઈ શાહુ | 495-504 |
| 67. | ધોરણ-6 ના વિદ્યાર્થીઓ પર ગુજરાતી વ્યાકરણ વિષયમાં ફ્લેશકાર્ડ અને વ્યાખ્યાન પદ્ધતિના ઉપયોગ દ્વારા અધ્યાપન કાર્યની અસરકારકતાનો તુલનાત્મક અભ્યાસ<br>- વેગડા આરતીબેન લાલશંકરભાઈ, શ્રી ડૉ.આર.એસ.માંકડ | 505-511 |
| 68. | STATUS OF GOVERNMENT UNIVERSITIES LIBRARIES AUTOMATION IN GUJARAT STATE<br>- Dr. Bharti L. Vaja | 512-521 |
| 69. | કોરોના કાળમાં પ્રાથમિક શાળાઓના વિદ્યાર્થીઓનું શિક્ષણ: પડકારો અને પ્રયાસો<br>- યામી નવનીતરાય જોષી | 522-530 |

| Sr. | Title | Page |
|---|---|---|
| 70. | Research paper on Innovation and Current trends in E – Commerce<br>- Dhara Chauhan | 531-538 |
| 71. | STUDY OF AWARENESS OF E-BANKING SERVICES IN INDIA<br>- Dipalee Makwana, Dr. Arvind M. Gajera | 539-545 |
| 72. | E RUPI: A VOUCHER SYSTEM AHEAD OF DIGITAL CURRENCY<br>- MS. Dipali Rajendrabhai Dashani | 546-448 |
| 73. | कोरोनाच्या जागतिक आपत्तीमुळे महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेवर झालेला परिणाम<br>- Dr. Chandrashekhar Atmaram Bhagat | 549-558 |
| 74. | Digital Disruptions -A Paradigm Shift in Management<br>- Dr. T. S. Poornachandrika | 559-562 |
| 75. | A Comparative Analysis of Financial Statement of GSFC and NFL<br>- Gohil Siddharajsin Ajaysinh, Dr. Dilip B. Joshi | 563-574 |
| 76. | Study of Multiple Intelligences of X Standard Students of Cbse School in Relation to Educational and Occupational Background of Their Parents<br>- Hanamesh. S. Dudyal, Dr. H. R. Gharpankar | 575-582 |
| 77. | શબ્દસૃષ્ટિ સામાયિકના હાઇકુ (૨૦૦૧ થી ૨૦૧૫)<br>- મનહર ટી સોલંકી | 583-589 |
| 78. | Frustration Among the School Teachers<br>- Naiya Shashikant Sajjan, Dr. Viral Jadav | 590-600 |

| Sr. | Title | Page |
|---|---|---|
| 79. | Neuroscience of Love: Scientific and Behavioural Study<br>- Rahul Sanjiv Vyas | 601-605 |
| 80. | Teaching and Learning Application of 6E+S Model in Teaching English subject in Grade 9<br>- Sathvara Varshaben Chandrakantbhai, Dr. Jagdish Bhai R. Mahida | 606-609 |
| 81. | 'વાડ' વાર્તાસંગ્રહમાં નિરૂપિત ગ્રામજીવન<br>- શ્રીમાળી દીપકકુમાર ખેમાભાઈ | 610-614 |
| 82. | સાહિત્યકૃતિ પરથી બનેલી ફિલ્મનો તુલનાત્મક અભ્યાસઃ 'તત્ત્વમસી' નવલકથા અને ફિલ્મ 'રેવા' સંદર્ભે<br>- કૃપલબેન ધીરજભાઈ ક્રિશ્ચિયન | 615-620 |
| 83. | A PARADIGM SHIFT IN THE CONCEPT OF CORPORATE SOCIAL RESPONSIBILITY: LESSONS FROM THE COVID-19 PANDEMIC<br>- Dhaval A. Zala, Dr. Dineshkumar R. Chavda | 621-629 |

# 73 कोरोनाच्या जागतिक आपत्तीमुळे महाराष्ट्तील शिक्षणव्यवस्थेवर झालेला परिणाम

**Dr. Chandrashekhar Atmaram Bhagat**
Principal
V. P. S. College of Arts, Science and Commerce,
Lonavala, Taluka Mawal, District Pune
E Mail id : bhagatsir.kp@gmail.com

## प्रास्ताविक:

कोरोनाच्या जागतिक आपत्तीमुळे महाराष्ट्ाच्या शिक्षण पध्दती वर झालेल्या परिणामांचा या शोध निबंधात अभ्यास व सविस्तर उहापोह करणेत आलेला आहे. या शोध निबंधाची अभ्यास पध्दती ही तुलनात्मक स्वरूपाची आहे. महाराष्ट्ातील पारंपारिक शिक्षण व्यवस्था आणि कोरोना काळातील आॅनलाईन शिक्षण व्यवस्था या दोन्हींची मांडणी सर्व प्रथम केली आहे. या शोध निबंधातुन कोरोनो उत्तर काळात केवळ पारंपारिक शिक्षण पध्दतीचा वापर न करता इंटरनेट वर असणा-या विविध संसाधनांचा शिक्षण पध्दतीत उपयोग केल्यास विद्याथ्र्यां करिता आजचे शिक्षण कसे प्रभावी ठरेल हे स्पष्ट केले आहे. आजच्या काळातील विद्यार्थी हे घरात बसुन मोबाईल च्या माध्यमातून झूम अॅप, गुगल मिट, यू टयुब, लाईव्ह व्हिडीओ, नवीन ब्लाॅग्ज, वेबसाईटस, विकीपिडीया या साधनां द्वारे आॅनलाईन शिक्षण घेत आहेत. त्यांचे शिक्षण या पेक्षाही भविष्य काळात अत्यंत प्रभावी होउ शकते. त्या करिता या संशोधनाची उपयुक्तता आहे.

बीज शब्दः कोरोना, शिक्षण व्यवस्था, पारंपारिक, आधुनिक वेबसाईटस

## कोरोना एक जागतिक आपत्ती :

कोविड - 19 हा एक विषाणू आहे. विषाणू म्हणजे विषयुक्त अणु होय. त्याचा आकार सत्तर ते ऐंशी नॅनोमीटर इतका सूक्ष्म आहे. (नॅनोमीटर म्हणजे एका मीटरचा एक अब्जावा भाग) मानवी केसाची जाडी साधारण ऐंशी हजार नॅनोमीटर असते. यावरून कोविड व्हायरसच्या सूक्ष्मतेची कल्पना आपल्याला करता येईल. या सूक्ष्मातीसूक्ष्म विषाणूने आज जगातील एकशे पंच्याऐंशी पेक्षा जास्त देशातील 3.52 करोड लोकांना लागण झाली आहे. या विषाणूमुळे जगातील सुमारे पाचलाख लोक मृत्युमुखी पडले आहेत. त्यामुळे जागतिक स्तरावर कोरोना व्हायरसची भिती सर्वत्र निर्माण झाली

आहे. या शिवाय दररोज रूग्णांची आकडेवारी वाढत असून यावाढत्या प्रभावामुळे, 'कोरोना एक जागतिक आपत्ती' म्हणून घोषित करणेत आली आहे. या आपत्तीमुळे जगातील उद्योग व्यवसाय, वाहतूक, पर्यटन आर्थिक आणि सामाजिक कार्यक्रम यांच्यावर प्रभाव पडल्यामुळे मानवी जीवन विस्कळीत झाले आहे. करोडो रूपयांच्या मालमतेचे, संपती साधनांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नुकसान झाले आहे. हे नुकसान म्हणजे युध्दजन्य परिस्थिती पेक्षाही मोठया प्रमाणात झालेले आहे.

जगातील या आपत्तीमुळे अनेक उद्योग व्यवसांय ठप्प झाले आहेत. उदाहरणार्थ बांधकाम, प्रशासन, पर्यटन, अर्थ व्यवस्था, शैक्षणिक, सामाजिक, सार्वत्रिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उपक्रम पूर्णपणे थांबले आहेत. याचा परिणाम आंतरराष्ट्रीय मूल्य व्यवस्थेवर सगळयात मोठा झालेला आहे. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने कोरोनाला पॅण्डेमिक जाहीर केले. पॅण्डेमिक म्हणजे असा आजार कि जो आंतरराष्ट्रीय सीमा पार करून इतर देशात कमी वेळात पसरतो. त्यामुळे कोरोना महामारी ही केवळ आपत्ती न राहाता कोरोना ही एक जागतिक आपत्ती बनली आहे.

## कोरोना आणि महाराष्ट्र :

कोरोनाचा प्रभाव महाराष्ट्रातही मोठया प्रमाणात आहे. महाराष्ट्रात सर्व प्रथम पुणे शहरा मध्ये दिनांक 9 मार्च, 2020 रोजी पहिला कोरोनाचा रूग्ण आढळला. त्या नंतर दिनांक 25 मार्च, 2020 ते दिनांक 14 एप्रिल, 2020 या कालावधीत प्रथमतः पूर्व खबरदारी म्हणून लॉकडाउन जाहीर करणेत आला. आज मितीला (दिनांक 21 मे, 2022) राज्यातील कोरोना बाधितांची संख्या 41,642 पेक्षा जास्त असून 28554 कोरोना बाधित रूग्ण आहेत. आज पर्यत 1,454 रूग्णांचा मृत्यु झाला असून अनेक शहरां मध्ये याची झपाटयाने वाढ होत असून सर्वाच्या चिंतेचा विषय झाला आहे.

कोरोना व्हायरसचा महाराष्ट्रा मध्ये उद्योग, व्यापार, सामाजिक क्षेत्रे आणि अर्थ व्यवस्था यावर सर्वात मोठा परिणाम झाला. या परिणामा बरोबरच शैक्षणिक व्यवस्थाही अस्थिर झालेली दिसते. महाराष्ट्रातील शैक्षणिक व्यवस्थेमध्ये शिक्षण संस्थांमध्ये आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. कर्मचारी वर्गा मध्ये वेतन, वेतनेतर प्रश्न उभे राहिले. शिक्षक, अध्यापक यांना शिकविण्याकरिता वेगवेगळे स्त्रोत तयार झाले. शैक्षणिक व्यवस्थेतील सर्वात मोठा प्रभाव हा ग्रामीण भागातील विद्याथ्र्यांच्या शिक्षणावर झाला. कारण ॲक्टीव्ह रिसर्च फोरम (ए. टी. एम.) या समुहाने केलेल्या

एका सवेक्षणा नुसार राज्यातील 27 टक्के पालकां कडे इंटरनेट सुविधा नव्हती व अँड्रॉईड फोन नव्हते. या शिवाय राज्यातील 48 टक्के शाळां मध्ये आजही इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षकांवर मोठी आपत्ती या काळा मध्ये निर्माण झाली. शिक्षण व्यवस्थेवरती कोरोनाचा प्रभाव वेगवेगळया पध्दतीतुन आपल्याला अभ्यासता येतो. त्या पध्दती खालील प्रमाणे:

### कोरोना आणि शिक्षण व्यवस्था :

महाराष्ट्रातील शिक्षण पध्दती ही पारंपारिक शिक्षण पध्दती आहे. या शिक्षण पध्दतीचा आकृतीबंध हा 1972 पासून जसाच्या तसा वापरला जातो. या आकृतीबंधा मध्ये 10 + 2 + 3 या पध्दतीचा अवलंब केला जातो. प्रत्येक विद्यार्थी हा पहिली ते दहावी पर्यतच्या शिक्षणा नंतर पुढे दोन वर्ष ही उच्च माध्यमिक शिक्षण घेत असतो. त्या पुढील तीन वर्ष ही पदवी शिक्षणा साठी मान्य केली जातात. थोडक्यात यातील पहिली ते बारावी पर्यतचा जरी विचार केला तरीही या शिक्षण पध्दतीतून आज पर्यत मिळणारे ज्ञान हे विद्यार्थी केंद्रित व गुणात्मकतेवर आधारित होते. त्यामुळे या शिक्षणा मध्ये विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत हजर असणे आवश्यक मानले जाते. विद्याथ्र्याच्या उपस्थितीची टक्केवारी महत्वाची मानली जात होती. या उपस्थितीच्या आधारावरच त्याची परिक्षा होत असे आणि त्या आधारे विद्याथ्र्याची गुणवत्ता ठरवली जात होती.

महाराष्ट्रात कोविडचा पहिला रूग्ण मिळाल्या पासून ऑनलाईन शिक्षण पध्दती सुरू झाली. विद्याथ्र्याना शाळेत जाणे बंद करणेत आले. या विद्याथ्र्यांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे पूर्व नियोजन किंवा प्रशिक्षण नसल्यामुळे ग्रामीण भागातील किंवा सामान्य स्तरातील विद्याथ्र्यांचे नुकसान झाले. महाराष्ट्राचा विचार करता आज महाराष्ट्रात प्रायमरी ते बारावी पर्यतच्या शाळांची संख्या 1,16,233 असून त्याशाळा राज्यातील छत्तीस विभागामधून विभागलेल्या आहेत. हिंदुस्थान टाईम्सच्या 2018 च्या सर्वेक्षणा नुसार महाराष्ट्रात 33,153 कायम विनाअनुदानीत शाळा आहेत. या शाळां मधून सुमारे 250 लाखाहुन अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हे शिक्षण घेताना अचानकपणे ऑनलाईन शिक्षणाची पध्दत सुरू झाल्यामुळे विद्याथ्र्याना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. पारंपारिक शिक्षणा मध्ये जे तीन प्रमुख घटक होते, अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापन हे घटक बाद झाले. या घटकां मध्ये अध्ययन म्हणजे विद्याथ्र्याना शिक्षकांनी

सांगितलेला अभ्यास किंवा त्यांनी वाचलेले, पाहिलेले, अनुभवलेले आणि त्या सोबत शिक्षकांनी दिलेला गृहपाठ याद्वारे त्यांचे शिक्षण होत होते. याच वेळेला अध्यापन करणारे शिक्षक हे आपल्या विद्याथ्र्याना जे समजेल, आकलन होईल त्या नुसार त्यांच्या मध्ये कौशल्य, वक्तृत्व किंवा कलागुण निर्माण करण्याकरिता प्रयत्न करत होते. तर शेवट परिक्षेच्या माध्यमातून विद्याथ्र्यांचे मूल्यमापन होत होते. आॅनलाईन शिक्षण पध्दती मध्ये समिश्र शिक्षण पध्दत अस्तित्वांत आली. ही पध्दती म्हणजे बंद शाळेतुन शिक्षण देण्याची प्रथा सुरू झाली. शिक्षकांनी डिजिटल लर्निंग याचा वापर सुरू केला. त्यामुळे मुलांमध्ये एकत्र येणे, गप्पा, खेळ, गोष्टी बंद झाल्या. त्याचा परिणाम त्यांच्या बौध्दिक क्षमते वर होत गेला. लिहिणे, वाचणे कमी होत गेले. या शिवाय मैदानातील क्रिडा प्रकार, सामुहिक खेळ पूर्णपणे बंदझाल्यामुळे विद्याथ्र्यांची शारीरिक क्षमता कमी होत गेली. सामाजिक वर्तनाचे नियम, शिस्त, परस्परातील संवाद जवळ जवळ बंद झाला.

शाळा, महाविद्यालयातून विद्याथ्र्यांवर आणि शिक्षण पध्दतीवर कोरोनाचा प्रभाव वाढत गेल्यामुळे शालेय व्यवस्थापन, सामाजिक व्यवस्थापन यांच्यातही बदल झाले. विद्याथ्र्यांचे शाळेत येणे बंद झाल्यामुळे शालेय व्यवस्थापन अडचणीचे होत गेले. विद्याथ्र्यांची येणारी फी, संस्था शुल्क, शासनाकडुन येणारे वेतन, वेतनेतर अनुदान उशिरा येउ लागले, सरकारी कार्यालये अर्ध वेळ सुरू असल्यामुळे क्रिडा फंड, अनुदाने पूर्णपणे बंद होती. सामाजिक संस्थांकडून किंवा कंपन्यां मधून मिळणारे एस. एस. आर. कमी किंवा बंद झाले. कारखान्यात, उद्योगांमध्ये कंपन्यां मध्ये आर्थिकमंदी आल्यामुळे सामाजिक संस्थांकडून येणा-या देणग्या, पारितोषिके, खेळा करिता दिले जाणारे प्रायोजकत्व बंद होत गेले. क्रिडास्पर्धांचे आयोजन आणि नियोजन बंद झाले. साहजिकच शाळांची आर्थिक परिस्थिती बिकट झाल्यामुळे अनेक शाळा बंद पडल्या. ग्रामीण भागातील शाळांना विज, टेलिफोन यांचे कर भरणे शक्य न झाल्यामुळे विद्याथ्र्याना सोई देणे शक्य नव्हते. या शिवाय ग्रामीण भागात इंटरनेट, टेलिफोन सेवा नसल्यामुळे अनेक शाळा व विद्याथ्र्यांचे नुकसान झाले. ग्रामीण भागातील वास्तव मांडताना माननीय आमदार श्री विवेक पंडीत यांनी आपल्या एका भाषणा मध्ये असे म्हटले होते की, "महाराष्ट्रात आजच्या घडीला 1,06,327 प्राथमिक शाळा आहेत. 27,446 माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आहेत. या शाळां मधून 2,24,00,000 विद्यार्थी शिकत आहेत. त्यातील ग्रामीण दुर्गम भागांतील शाळांची संख्या 99,144 आहे. त्यातील विद्याथ्र्यांची

संख्या 74 टक्के आहे. दुर्गम आदिवासी क्षेत्रात 4,949 शाळां मध्ये आजही विजजोडणी झालेली नाही. राज्यातील एकुण शाळां पैकी 48 टक्के शाळां मध्ये संगणक आणि इंटरनेट यांची सुविधाच नाही." हे भिषण वास्तव असून या शिवाय ज्या शाळां मध्ये सोईसुविधा उपलब्ध आहेत तेथे कोरोनामुळे विद्याथ्र्याना शाळेत येण्यास बंदी करण्यात आली होती. त्यामुळे त्या शाळांतील सोईसुविधा नादुरूस्त होणे, बंद पडणे अशा अनेक समस्या वेळोवेळी निर्माण होत होत्या.

शाळा, संस्था यांच्या प्रमाणेच विद्याथ्र्याना शिक्षण देणा-या शिक्षकांनाही कोरोनामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. आॅनलाईन शिक्षणाचे शिक्षण देण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने सर्वप्रथम चाळीसहजार शिक्षकांना आॅनलाईन क्लास देण्याचे प्रशिक्षण दिले. परंतु हे प्रशिक्षण कमी काळात किंवा अत्यल्प काळात पूर्ण करणे शक्य नव्हते. कारण शासकीय नोंदणी नुसार त्याच वेळेला 80,000 शिक्षकांनी या प्रशिक्षणा साठी नावनोंदणी केलेली होती. या शिक्षकांना गुगल क्लासरूम द्वारे कसे शिक्षण द्यावे, पारंपारिक शिक्षण पध्दती बदलून नव्याने शिकायचे होते. या शिक्षण पध्दतीत नवीन तंत्रज्ञान, व्हिडीओ प्लॅटफाॅर्म, व्हच्युअल लर्निंग, सोशल मिडिया यांचा वापर करून आधुनिक थ्री डी, आॅडिओ, व्हिडीओ, पि. पि. टी., पाश्र्वसंगीतमय क्लीप, काही प्रत्यक्ष डाॅक्युमेंटरी यांचा अंतर्भाव या आॅनलाईन शिक्षण पध्दती मध्ये करायचा होता. हे सर्व करतांना विद्याथ्र्यां मध्ये मोबाईल द्वारे शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे व योग्य प्रकारे त्यांच्या पर्यत ज्ञान पोहोचले पाहिजे ही धडपड म्हणजे तारेवरची कसरत करावी लागत होती. कारण अनेक शिक्षकां कडे लॅपटाॅप किंवा संगणक उपलब्ध नव्हते. शिवाय आॅनलाईन शिक्षण देताना विद्यार्थी उर्पिस्थत आहे किंवा नाही, त्याचे अभ्यासाकडे लक्ष आहे किंवा नाही याची खात्री करता येत नव्हती. त्यामुळे अनेकदा विद्याथ्र्याचे अध्ययन, अध्यापन परिणामकारक होत नव्हते. या शिवाय विज पुरवठा खंडीत होणे, इंटरनेटच्या सुविधा न मिळणे, ब्राॅडबँड किंवा फायबर आॅप्टीक यांचा स्पीड कमी असणे, मोबाईलची क्षमता कमी असणे, विद्याथ्र्यांशी संवाद साधणेसाठी प्रभावी माध्यम नसणे यामुळे या संमिश्र शिक्षण पध्दतीत अनेक वेळा अडथळे येत होते. असे असले तरीही आॅनलाईन शिक्षण पध्दती ही महाराष्ट्ा मध्ये प्रभावी ठरली आणि विद्याथ्र्यां मध्ये गुणवत्ता वाढ झालेली दिसुन येते.

आॅनलाईन शिक्षणातील नवीन पध्दती / ट्ेड :

आॅनलाईन शिक्षण पध्दती महाराष्ट्ात सुरू होत असतांनाच केंद्र सरकारने शालेय शिक्षणा बाबतचा एक नवा आराखडा तयार केला होता. केंद्रा द्वारे ई लर्नींग करिता अनेक उपक्रम सुरू केले होते. त्या पैकी बरेचसे उपक्रम राज्यस्तरावर राबविणेत आले. शिक्षकांना प्रशिक्षीत करणे, त्यांना सेवा उपलब्ध करून देणे, हजेरी किंवा उपस्थिती बाबत अटटाहास न धरता स्वातंत्र्य देणे, विद्याथ्र्यां कडे असणा-या मोबाईल वर शिक्षण देणेची मुभा देणे या सारख्या सोईसुविधा शिक्षकांना उपलब्ध करणेत आल्या. यामुळे कोरोनाच्या प्रादुर्भावा नंतर शिक्षणाचे एक नवे युग उदयाला येत होते. मोबाईल द्वारे घरात बसुन षिकवण घेण्याची व ज्ञान संपादन करणेची एक नवी पिढी उदयाला येत आहे. या नव्या पिढीने झूम अॅप, आॅनलाईन वर्ग, यू टयुब, लाईव्ह क्लास, नवीन ब्लाॅग, विकीपिडीया याचा भरपुर वापर करून शिक्षण घेणे पसंत केले होते. यातीलच स्वयं नावाचे अॅप हे केंद्र सरकारने सुरू केलेले असले तरी याचा मोठा फायदा सर्व स्तरावर होत होता. शैक्षणिक साहित्य निर्माण करण्या करिता राष्ट्ीय पातळीवरील नउ संस्था एकाच व्यासपीठावर आलेल्या होत्या. त्यामध्ये ए. आय. सि. टी. ई, एन. सि. ई. आर. टि., यु. जि. सी. इत्यादी. या सारख्या संस्थांमधून विद्याथ्र्याकरिता विविध आॅनलाईन परिक्षा, चाचण्या, स्पर्धा, सर्वेक्षण, मत चाचणी, या शिवाय अध्ययन, अध्यापनाचे बहु विविध प्रकार अभ्यासक्रमाची पि. पि. टी. आणि पि. डी. एफ. तयार करून ते विद्याथ्र्यांपर्यत पोहोचविणे याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणात केला होता. गुगल प्लॅटफाॅर्म आणि ई लर्निंग सारख्या आॅनलाईन मोठया प्रमाणातील माध्यमांमुळे एकाच वेळेला हजारो विद्याथ्र्यांपर्यत लर्निंग प्लॅन किंवा लर्निंग पाथ विद्याथ्र्या पर्यत पोहोचत होता. विद्याथ्र्यांची क्षमता, त्यांची गुणवत्ता आणि त्यांचा वर्ग या नुसार शैक्षणिक बदल सर्वत्र केले जात होते. विविध प्रांतातील विद्याथ्र्यानी या नवीन शैक्षणिक प्रवाहाचा अगर पध्दतीचा मना पासून अवलंब केला. त्यामुळे आज याचे बहुविक पर्याय महाराष्ट्ात वापरताना पाहायला मिळतात. फळा आणि पुस्तकाचे शिक्षण मागे पडले असून संगणक, मोबाईल, इंटरनेट याच्या द्वारे घरात बसुन आॅनलाईन, ई लर्निंग शिक्षण विद्याथ्र्याना जास्त प्रिय झाले आहे.

## ई लर्निंगची नवीन साधने :

महाराष्ट्ातील शिक्षण पध्दती मध्ये ई लर्नीगच्या अनेक सोई नव्याने निर्माण करण्यात आल्या आहेत. ज्या प्रमाणे केंद्र सरकारचे दिक्षा अॅप आहे त्याच प्रमाणे विद्याथ्र्यानी शिक्षणा करिता

स्वाध्याय उपक्रम अभ्यासमाला टेलिव्हिजनच्या माध्यमातुन शैक्षणिक कार्यक्रम वेबिनार तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्थांचे आॅनलाइन सर्टिफिकेशन कोर्स विद्याथ्र्याकरिता उपलब्ध करण्यांत आले. शाळा, महाविद्यालयातील विद्याथ्र्याकरिता शालेय शिक्षाक प्रशासना कडुन अनेक नव्या वेबसाईट, गुगल प्लॅटफाॅर्म आणि इतर स्त्रोतांचा वापर करण्यास सुरूवात केली. वास्तविक भारतेतर देशांमध्ये आॅनलाईन शिक्षणाची प्रथा अगोदर पासून अस्तित्वांत असल्यामुळे गुगलवर हजारो वेबसाईट शिक्षण देणा-या पहायला मिळतात. परंतु त्याचा वापर व उपयोग करण्याची वेळ कोरोनामुळे अनेक राज्यांवर आली. त्यातील काही वेबसाईट किंवा ब्लाॅगचा अभ्यास केला तरी आॅनलाईन शिक्षण किती समृध्द होउ शकते याची आपल्याला कल्पना येउ शकते. जगभरात लहान विद्याथ्र्या पासून महाविद्यालयातील विद्याथ्र्यांपर्यत विविध विषय, विविध वर्ग व वेगवेगळया वयोगटातील विद्याथ्र्याकरिता वेबसाईट द्वारे ई लर्निंगचे स्त्रोत पहायला मिळतात व या सर्वातून घरात बसुन शिक्षण घेता येते. यातील अनेक वेबसाईट या निशुल्क असून त्यातील ज्ञान हे सर्वसामान्य व्यक्तीपासून उच्च शिक्षितांपर्यत सर्वाना घेता येण्यासारखे आहे. त्यातील काही निवडक वेबसाईट, लर्निंग देणा-या सेवा सुविधा खालील प्रमाणे:

1. अॅटरीक्सवेअर / Atrixware : या कंपनी द्वारे शिक्षकांना व विद्याथ्र्याना सादरीकरणा करिता मार्गदर्षन केले हाते.

2. निनजाएस्सेस / NinjaEssays : या कंपनी द्वारे विद्यार्थी किंवा कर्मचा-यां करिता वेगवेगळया प्रकारची टुल्स देण्यात आली आहेत. त्या टुल्सच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःची क्रिएटीव्हीटी सर्वा पर्यत पोहोचवु शकतात.

3. स्टडी गाईड झोन / Study Guide Zone : या वेबसाईट द्वारे विद्याथ्र्यांच्या विनामूल्य चाचण्या व अभ्यास घेता येतील. ही सर्वात जुनी वेबसाईट असून या वेबसाईट द्वारे विविध परिक्षांचा अभ्यासक्रम हा चाचण्यांसह समाविष्ट केलेला आहे. विशेष म्हणजे विद्याथ्र्यांकरिता विनामूल्य आहे.

4. कंपास लर्निंग / Compass Learning : विद्याथ्र्याना त्यांची बलस्थाने, पे्ररणा, गरजा समजावुन देउन त्यांचा परिपूर्ण शैक्षणिक विकास करणारी ही वेबसाईट असल्यामुळे विद्यार्थी व शिक्षक यांना उपयुक्त आहे.

5. नाॅलेजनेट / KnowledgeNet : यामध्ये वेगवेगळया विषयाची आय. टी. क्षेत्रातील उपयुक्त व्याख्याने उपलब्ध आहेत.

6. कोॅरूसेरा / Coursera : ही वेबसाईट सर्वात महत्वाची आहे. यामध्ये विविध विद्यापीठांचे अभ्यासक्रम तसेच त्या अभ्यासक्रमां वर आधारित असणारी संपूर्ण माहिती यामध्ये समाविष्ट केलेली आहे. शाळां करिता लागणारे विविध प्रकल्प यामध्ये आपल्याला पहायला मिळतात.

7. अलीसन / Alison : ही एक मोफत वेबसाईट असून नवनवीन गोष्टी विषय यांचे ज्ञान या वेबसाईट वरून आपल्याला पहायला मिळते.

8. फाईड टयुटोरियल्स डाॅट काॅम / Find Tutorials.com : विविध परिक्षा, चाचण्या, टेस्ट यांचे आराखडे यामध्ये पहायला मिळतात. तसेच विद्याथ्र्यां करिता विविध परिक्षांची तयारी सुध्दा प्रश्नोत्तर स्वरूपात मिळते.

9. खान अॅकॅडेमी / Khan Academy : यामध्ये गणित, विज्ञान, कला, भाषा आणि सामाजिक भावनिक शिक्षण या बददलच्या व्हिडीओ आणि बहूपर्यायी उपक्रम यामध्ये आहेत.

10. अॅचिव्ह 3000 / Achieve 3000 : हा प्लॅटफाॅर्म वीस वर्षा पासून अस्तित्वांत असून गणित, विज्ञान आणि सामाजिक विषय प्रभावीपणे मांडण्यासाठी याचा उपयोग करता येतो.

11. आॅडिबल / Audible : डिजिटल युगातील अनेक लोकप्रिय शेकडो पुस्तके वाचायला आणि ऐकायला मिळतात.

12. बंझाई / Banzsai : ही एक विद्याथ्र्यां साठी उपयुक्त वेबसाईट असून विद्याथ्र्यानी आपल्या खर्चाचे नियोजन कसे करावे, घरी व वर्गात कसे वागावे या बददलच्या अनेक सुचना व जाणिवायातून शिकायला मिळतात.

13. बर्ड ब्रेन टेक्नाॅलाॅजीस / Bird Brain Technologies : ही संशोधन करणारे विद्याथ्र्यां करिता उपयुक्त वेबसाईट आहे. यामध्ये अभियांत्रिकी आणि रोबोटिक्स या बददलचे ज्ञान मिळते.

14. स्टारफाॅल / Starfall : याचे वेैशियष्ट म्हणजे यातील वर्कशिट आपण प्रिंट करू शकतो. आॅनलाईन सोप्या पध्दतीने एमपी - 3 प्रभावासह शिक्षण देणारी ही एक वेबसाईट आहे.

15. क्लासरूम चँपियन / Classroom Champions : विद्‌याथ्र्याना त्यांच्या क्षमते पर्यत पोहोचविणेकरिता शिक्षण फौंडेशन द्‌वारे या वेबसाईट मधून मार्गदर्शन केले हाते. यातील मार्गदर्शक हे आॅलंपिक मधील तज्ञ मार्गदर्शक असतात.

16. डयुलिंगो / Duolingo : सर्व वयोगटातील विद्‌याथ्र्याकरिता ही एक उपयुक्त वेबसाईट आहे. याद्‌वारे भाषा व शब्दांचे ज्ञान शिकता येते. जगातील विविध भाषांचा यातून परिचय होतो.

वरील प्रमाणे माहितीच्या महाजालात हजारो वेबसाईट, अॅप आणि ब्लाॅग्ज शिक्षण व्यवस्थेला समांतर उपयोगी पडणारी आहेत. खाजगी विनाअनुदानीत शाळा, महाविद्‌यालये, क्लासेस यांचा वापर करतात. परंतु भारतीय शिक्षण पध्दतीत या साधनांचा वापर अत्यल्प होत असल्यामुळे आॅनलाईन शिक्षणाचा अनुभव विद्‌याथ्र्याना प्रत्यक्षपणे मिळत नाही. शिक्षक पारंपारिक पध्दती प्रमाणे वर्गात बोलल्या प्रमाणे मोबाईल समोर फळा व पुस्तक घेउन शिकविणारा आढळतात. त्यामध्ये कोणत्याही कल्पकतेचा किंवा नाविन्याचा अविष्कार नसल्यामुळे विद्‌यार्थी किंवा पाहाणारे कंटाळुन जातात. अभ्यासक्रम हा अपूर्ण किंवा कमी वेळात पूर्ण केला जातो. मात्र ही पध्दती बदलून वरील वेगवेगळया संसाधनांचा उपयोग केल्यास ख-या अर्थाने विद्‌यार्थी ज्ञानी होईल व भविष्य काळातील आॅनलाईर्न शिक्षण हे सार्वत्रिक सोईचे शिक्षण होईल. कारण या शिक्षणातुन हजारो मैल दुर असणारे तज्ञ, अभ्यासु, ज्ञानी आणि विद्‌वान यांचा प्रत्यक्ष अनुभव, ज्ञान विद्‌याथ्र्यांपर्यत सहजपणे पोहोचु शकते. या शिवाय अनेक किचकट आराखडे, आकृत्या, आलेख, नकाशे, ऐतिहासिक घटना तसेच गोष्टी प्रत्यक्षपणे सहज सोप्या पध्दतीने विद्‌याथ्र्याना उदाहरणासह दाखविता येतील. ही नवी दृष्टी कोरोना कालखंडाने शिक्षण व्यवस्थेला दिली आहे. या दृष्टिचा दृष्टिकोनात बदल करणे व क्षेत्रैक्षणिक धोरणात सहभाग करणे हे आपणा सर्वाचे कर्तव्य व काळाची गरज आहे.

## संदर्भ सुची:

1. डाॅ. श्री अमोल अन्नदाते, सेल्फ पब्लिश, समजावून घ्या कोरोना, प्रथम आवृत्ती, 2020

2. श्रीमती स्नेहलता जाधव, साधना प्रकाशन, साप्ताहिक साधना, आॅनलाईन शिक्षण आणि आपण. दिनांक 21 जुन, 2020

3. श्री संदिप लांडगे, दैैनिक सकाळ, औरंगाबाद, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर असे असावे नवीन शैक्षणिक वर्ष .... दिनांक 12 एप्रिल, 2021

4. श्री प्रविण शिंदे, टिव्ही - 9, आॅनलाईन शिक्षण उपक्रम चांगला मात्र ग्रामीण भागातील विद्यार्थी वंचित राहातील: श्री विवेक पंडीत, शनिवार दिनांक 13 जुन, 2020

5. संपादित, शिक्षण मित्र, राज्यातील शिक्षकांना मिळणार आॅनलाईन गुगल क्लासरूम प्रशिक्षण, दिनांक 22 डिसेंबर, 2021

6. श्री प्रसाद शिरगावकर, आॅब्झव्हर रिसर्च फौंडेषन - सवेक्षण, दिनांक 22 जुन, 2022

ठिकाण: लोणावळा